ए

['ए' पासून सुरू होणारे काही शब्द येथे न आढळल्यास 'ये', 'वे' खाली पहावेत.]

ए मराठी अक्षरमालेतील दहावे अक्षर. मराठी स्वरमालेतील दहावा स्वर. परंपरेप्रमाणे अ नंतर इ किंवा ई तसेच आ नंतर इ किंवा ई आल्याने बनणारा संयुक्त स्वर. संस्कृतमध्ये पुढील स्वराशी संधी होताना अय् असे रूप होते. स्थानपरत्वे ऱ्हस्व किंवा दीर्घ. उदा. वे, हे, घे, वेष यांत दीर्घ. देतो, केळं, पेला, शेंग यांत ऱ्हस्व. पुढे आ आल्यास त्याचा य होतो. जसे : – दे + आ = द्या, घे + आवा = घ्यावा.

ए उद्गा. परिचयातील माणसाला हाक मारण्यासाठी योजायचे एकवचनी, उभयलिंगी संबोधन. जसे : – अरे, अग. [सं.]

एउता क्रिवि. इकडे; या बाजूला, दिशेने : 'आणि पात्र : तेया एउते लोटीति ।' – लीच ४.३५. [क. इत्त] [सं. अत्र]

एक वि. आद्यसंख्यावाचक; सर्व संख्यांमध्ये पहिली संख्या; अंकगणिताचा मूळ संख्याघटक. २. एकटा; अद्वितीय; कोणी बरोबरीचा नसणारा. ३. अपरिचित नामाबद्दल प्रारंभी वापरण्यात येणारा शब्द. जसे : – कोणी तरी, अमूक, एखादा. ४. विवक्षित एक; सर्वांत वरचढ. उदा. एक शहाणा, एक लबाड. ५. सारखे; एकरूप; एकच. ६. अतिशय किंवा एकसारखा; अव्याहत. जसे : – एक पाऊस = न थांबणारा, एकसारखा पडणारा पाऊस, एक घोळ, एक गोंधळ. ७. (संख्यावाचक अथवा प्रमाणवाचक शब्दाबरोबर योजतात) अजमासे; जवळजवळ; सुमारे; कमजास्त. जसे : – शंभरएक रुपये शिल्लक असतील, पाच एक, वीस एक इ. ८. न फिरणारे; निश्चित; अन्यथा न होणारे; सतत एक. उदा. एकवचनी, एकपत्नी. ९. दुसरा; निराळा; स्वतंत्र; वेगळा; भिन्न; एक नव्हे असा. [सं.] (वा.) (आपल्या ठिकाणी) **एक म्हणविणे –** स्वत:बद्दलचा अभिमान किंवा मोठेपणा राखणे, प्रस्थापित करणे; आपण कोणी मोठे आहोत असे मानणे. **एक असणे, एक होणे, एक पडणे –** एकजूट करणे; एकत्र असणे; एकी असणे. **एक धरून बसणे** – विशिष्ट गोष्टीसंबंधी हेका धरून बसणे; हट्ट धरणे. **एक करता बेक होणे –** इच्छित न घडता भलतेच होणे; एक करायला जाता दुसरे काहीतरी होणे. **एकाचे एकवीस होणे –** वंशविस्तार होणे; एकाचे दोन करणे; भलतेच सांगणे; वाढवून सांगणे. **एकाचे एकवीस पाचाचे पंचवीस करणे –** फुगवून सांगणे; पदरचे घालून सांगणे; तंतोतंत खरे न सांगणे. **एक नाही दोन नाही –** मौन स्वीकारणे; गप्प बसणे; कोणाच्या अध्यातमध्यात नसणे (तटस्थ वृत्ती स्वीकारणे). **एका माळेचे मणी** –(शब्दश: एका माळेतील एक सारखे मणी). एका वृत्तीचे, स्वभावाचे, पेशाचे वगैरे; सदृश अशा अनेक व्यक्ती; समानधर्मी.

एकअक्षीय वि. एकच आस असलेला; एका आसावरच पडलेला (दाब).

एकउंटी वि. (बुद्धिबळ) आपला एक उंट शिल्लक ठेवून प्रतिपक्षावर प्यादेमात करणे.

एकएक वि. प्रत्येकजण; एकएकटा; एका वेळी एक; प्रत्येकातला, अनेकातला एक; एकामागून एक; एकेकजण; निरनिराळा; स्वतंत्र; वेगळा.

एकएकटा, एकएकला, एककटा, एककला वि.१ पहा : **एकएक** २. एकला; स्वत:च एकटा; वेगवेगळा; बरोबर कोणी नसलेला; सोबत–मदत पाहिजे असलेला; दुसऱ्याची जरूर असलेला.

एकक न. १. एकच एक वस्तू किंवा व्यक्ती. एकेक, प्रत्येक. २. ज्यांचे अस्तित्व एकच मानले जाते अशा व्यक्तींचा, वस्तूंचा समूह. ३.मोजण्याचा किंवा मापण्याचा मूलभूत घटक : 'फ्यादमचा एकक म्हणून उपयोग केला जातो.' – महासागर १९१. ४. मात्रा; नग.[सं.]

एकक घटक (शाप.) ज्याचे पुन्हा विभाजन करता येत नाही असा वस्तुमान, वजन इ. मोजण्यासाठी वापरायचा लहानात लहान घटक.

एककट्टा क्रिवि. एकमताने : 'मंडलिकाच्या बाजूने एककट्टा राहिलेल्या या मतदारांच्या ...' – के ३१.१०.१९३९.

एककतार उद्गा. कवाइतीमधील एक हुकूम, बोल. हा हुकूम मिळाल्यावर सर्वांनी एका सरळ रेषेत एकमेकापासून ६ इंच अंतरावर आणि सर्वांत उंच मनुष्याच्या डाव्या हाताला, उंचीच्या प्रमाणात एकाखाली एक असे उभे राहणे.

एक करणे क्रि. मिसळणे; एकत्रित करणे.

एककरपद्धति–ती स्त्री. (अर्थ.) सर्व कर काढून टाकून फक्त जमिनीच्या उत्पन्नावरच कर बसविण्याचे तत्त्व; सर्व करांचे एकीकरण. [सं.]

एककल्ली वि. १. हेकेखोर; संकुचित मनाचा; एकाच ठरावीक मतांना, सवयींना, पद्धतींना किंवा गोष्टींना अगदी हट्टाने चिकटून राहणारा; प्रसंगानुसार वागण्याचे ज्ञान नसलेला; कोत्या मनाचा; तारतम्य विसरणारा : 'कादर, इतका कसा एककल्ली झालास तू !' – एल्गार. २. एकाच विषयाकडे स्वाभाविक कल असलेला; एकांगी; एकदेशीय.

एककानी वि. एक काना असलेली (बंदूक).

एककामी वि. एकच काम करण्यास लायक. हरकामीच्या उलट.

एककालिक वि. १. एकाच कालखंडात घडणाऱ्या (घटना इ.); एकाच कालाशी संबंधित. २. ज्यात परिवर्तनाची शक्यता नाही असा अतिशय मर्यादित वेळात घडणारा. [सं.]

एककालिक, एककालीन वि. समकालीन; एकाच वेळचे; एका वेळी झालेले, आलेले; समवयस्क; समशिक्षित. [सं.]

एककालिक अभ्यास (समाज.) एकाच कालखंडातील सामाजिक घटनांचा अभ्यास, संशोधन इत्यादी.

एककांद्या लसूण पु. स्त्री. न. एकच कुडी (पाकळी) असलेला, एक प्रकारचा लसूण. यात अनेक पाकळ्या नसून एकच गड्डा असतो.

एककी रीति–ती (ग.) एककाचा उपयोग करून उदाहरण सोडवण्याची पद्धत.

एककेंद्री वि. सर्व अधिकार असणारी एकच मध्यवर्ती सत्ता आहे असा.

एककेंद्रीय वलये (भूमिती) एकच मध्यबिंदू असलेली वर्तुळे.

एकक्रयाधिकार पु. (अर्थ.) एखाद्या वस्तूसाठी असलेल्या बाजारपेठेत त्या वस्तूचा एकच खरेदीदार असण्याची स्थिती. [सं.]

एकखटा–ट्टा क्रिवि. एकत्र; एका ठिकाणी करून; आखबंद; घाऊक; ठोक. [सं. एक+कृत]

एकखती - खंती वि. दुसऱ्या विजातीय रंगाची एकेरी छडी, रेघ, सळई उठविलेला (रेशमी खण, लुगडे). [म. एक+अर. खत्त=रेषा]

एकखंडात्मक वि. (ग्रंथ.) ज्याचा एकच खंड असतो असे (पुस्तक,ग्रंथ).

एकखांबी वि. १. एकाच खांबावर उभा असलेला (तंबू, घर वगैरे). २.(ल.) एकटाच कर्ता पुरुष असलेले (कुटुंब, घर). (वा.) **एकखांबी तंबू** - एकाच माणसाच्या खटपटीने, आधाराने उभी असलेली संस्था, चळवळ इ. : ' 'समाजस्वास्थ्य' हा एकखांबी तंबूच होता.' - उद्र २५.

एकखेप क्रिवि. एकपाळी; एकवार; पुन्हा एकदा.

एकगजब पु. एकगर्दी; गोंधळ; हलकल्लोळ; पहा : **गजब**

एकगजर पु. एकत्रित जोराचा आवाज; आरडाओरड; कल्ला; गलका.

एकगट, एकगट्ट–गट्टा क्रिवि. १. एकत्र; एका ठिकाणी; सर्व मिळून. २. एकजुटीने; सर्व एकत्रित होऊन; संघ करून.

एकगाहा क्रिवि. एकजूट; एकत्र : 'जाट व ही फौज एकगाहा करून मातबर झुंज शत्रूशी करून नामोहरम करावा असें आहे.' - ऐलेसं ३४.

एकगुणी वि. एकपट : 'तुम्हा जाली एकगुणी : आम्हां जाली दुणी :' - लीचउ १४३.

एकगेळी वि. अखंडखुरी; खूर विभागले नाहीत असा (घोडा) : 'त्याच्या (घोड्याच्या) पायाचा आकार मूळचाच चांगला असून एकगेळी पसरट खुराच्या योगाने पाय फार सुंदर दिसतात.' - मराठी तिसरे पुस्तक (१८७३) १०६.

एकगोत्री वि. सगोत्री; एकच गोत्र असलेले.

एकघटकी वि. एक परिणामी.

एकघाई स्त्री. नगाऱ्याची घाई. जोरात आणि जोशात वाजविणे (नगारे) : 'एकघाई लागली वाद्यांतराची कैसी : कानी पडिले नाइकीणे द्वारकेसी' - रुस्व ९२८.

एकघात शून्य (ग.) ज्याच्या मागेपुढे कोणतीही संख्या नाही असे शून्य.

एकच वि. पूर्ण; विलक्षण.

एकचएक वि. केवळ एक; अगदी एक; निव्वळ एक; दुसरे जोडीला नाही असे. [एकचे द्वि.]

एकचक्रीय वि. (वन.) १. प्रत्येक प्रकारच्या अवयवाचे एकच मंडल असलेले. उदा. धोतरा, सदाफुली इ. चे फूल. २. एक वर्ष किंवा त्याहूनही कमी जीवनकाल असलेली (वनस्पती); वर्षायू.

एकचढ वि. वरचढ; एकाहून एक श्रेष्ठ.

एकचढ एक एकावर एक ताण : 'काय एकाचढी एक कारटीं निपजलीं आहेत.' - भाबं ४४.

एकचर वि. एकलकोंडा; एकटा फिरणारा; तुटक राहणारा. [सं.]

एकचाकी गाडी स्त्री. एक चाक असलेली गाडी; ढकलगाडी.

एकचार पु. १. एकी. (गो.) २. संकर; मिश्रण. [सं. एक+आचार]

एकचाल – ली वि. १. एका चालीचा, सवयीचा, (गाण्यात) रागाचा, धाटणीचा. २. एकमार्गी; ठरावीक मतांना, सवयींना, पद्धतींना चिकटून बसणारा; एककल्ली. ३. सरळ; प्रामाणिक; छक्केपंजे माहीत नसणारा.

एकचित्त वि.१. एकमताचे; एकमेकांशी जुळणारे; सर्वसंमत. २. एकाग्र; सावधान; लक्षपूर्वक.

न.१ एकाग्र असणारे चित्त; ऐकमत्य; सर्वांची एकदम तयारी. २.(ल.) जेवायला बसलेली मंडळी उठताना सर्व एकदम जेवून उठतात त्यावेळी सर्वांचे झाले काय या अर्थी एकचित्त झाले काय? असे विचारतात : 'सर्वांचे भोजन संपलें असें पाहून नैमित्तिक गोठगस्ते कामदार यांनी एकचित्त जाहल्याबद्दल हात जोडून श्रीमंतांस कळविले म्हणजे श्रीमंत खाशा स्वाऱ्या हात धुऊन ऐनेमहालाच्या बाहेर जातात.' - ऐरापु २.१७. [सं.]

एकछत्री वि. एकाच राजाच्या किंवा मालकाच्या ताब्यातील, अधिकारातील; एकतंत्री; एकसत्ताक (कारभार, राज्य इ.).

एकछत्री राज्य १.एका सार्वभौमाच्या सत्तेखालचा अंमल, प्रदेश; ज्या प्रदेशावर दुसऱ्या कोणाची सत्ता नाही असा प्रदेश. : 'हें भरतखंड इंग्लिश लोकांच्या एकछत्री राज्याखालीं आहे.' - के २ (ल.) एकजण करील ती पूर्वदिशा.

एकजखी वि. एकाच शाखेचे वंशज : 'दादोबा व आपण एकजखी भाऊ, दोघांचे आजे सखे एकोदर बंधू आहेत.' - शारोज १७५.

एकजड क्रिवि. एकत्र; एका ठिकाणी; संघटितपणे : 'ते आल्यावर सर्व जमाव एकजड करून बेदरावर रवाना करणार.' - मइसा ५.१२७.

एकजती, एकमती स्त्री. एकमत; एकी; एकोपा (अनेक व्यक्तींमध्ये);पूर्ण मतैक्य; अविभक्तता.

क्रिवि. एकमताने; एकजुटीने.

एकजथा पु. एकत्व; एकोपा (जातीचा, कुळाचा); एककुटुंब; एकजात. क्रिवि. एकगड्डा; घाऊक; ठोक.(गुज. एकजथे.)

एकजदी वि. एका ठिकाणी असलेले; एकत्र : 'त्यांनीं एकजदी भाऊ निमे कुलकर्णीचें विभागी म्हणोन कलह मांडला.' - समारो ३.१२३.

एकजन्मी वि. १. सबंध आयुष्यभर पुरणारे; अतिशय टिकाऊ; पुष्कळ काळ चालणारे. २.आयुष्यात एकदाच केलेले; ज्याची जन्मात पुनरावृत्ती होत नाही असे. ३. जे करण्याला, पार पाडण्याला सबंध आयुष्य लागते असे.

एकजरा क्रिवि. अणुमात्रही; मुळीच; जरासुद्धा; यत्किंचितसुद्धा : 'यांस तफावत एकजरा न करणें.' - मइसा ८.१५९. [फा. यक्+जर्रा]

एकजात वि. १. एकाच जातीचा, नमुन्याचा; एकसारखा. २. (ल.) सजातीयात निर्भेळ; चांगले. ३. सुंदर. ४. सजातीय; एकापासून उत्पन्न झालेले (बंधू, बांधव).

क्रिवि. निव्वळ; केवळ; सर्वच्या सर्व. [सं. एक + जाति]

एकजातीय वि. एकप्रकारचे, तऱ्हेचे, जातीचे, वर्णनाचे, धर्माचे, वर्गाचे, नमुन्याचे, एकसारखे.

एकजातीयता स्त्री. गुणधर्म व घटक या दृष्टीने सारखे असणे.

एकजिनसी वि. एकाच प्रकारचा, तऱ्हेचा प्रवृत्तीचा : 'महाराष्ट्रातील समाज एकजिनसी व्हायचा असेल ....' - आव्हान ८७.

एकजिनसीपणा पु. १. एकाच प्रकारचा, तऱ्हेचा असणे; सारखेपणा : 'पोशाख, आहार यांच्यात एकजिनसीपणा येतो.' - समाज ७६. २. (अर्थ.) परिपूर्ण स्पर्धा व परिपूर्ण बाजार या संकल्पनेमधील एक गृहीतक. एखाद्या वस्तूची सर्व परिमाणे सर्वार्थाने समान, परस्परांमध्ये

संपूर्ण पर्यायी असतात. वस्तुपरिमाणाची सरूपता.

एकजिन्नस वि. एकाच प्रकारचा, तऱ्हेचा; एकजात; एकाच साच्यातला. (माल, वस्तू वगैरे); सर्व ठिकाणी सारखा.

एकजीव वि. पूर्ण मिसळलेले; पूर्ण एक झालेले : '(आमची आळी) समाधानी, संकुचित आणि एकजीव ...' – डाली ११.

एकजूट स्त्री. एकी; मिश्रण; एकोपा; एकजथा; पूर्ण ऐक्य : 'ही एकजूट झाली तर आपलंही स्वप्न साकार (होईल).' – श्रीयो २.२९५. क्रिवि. एकमताने; एकोप्याने.

एकझडपी वि. एकच फळी किंवा झडप आहे असे (दार, खिडकी).

एकट, एकटका क्रिवि. एकटा; दुसरा कोणी बरोबर नसताना; एकला : 'झालिया राज्यलोट । चोराकुळित होईल वाट । कोणी नवजावें एकट । अवघी एकवाट करावी ।।' – एभा ३०.३५९; 'हिंडे मार्ग भ्रमोनि एकटका ।' – मोआदि ३१.३६.

एकटक, एकटंक क्रिवि. टक लावून; सतत; एकसारखे; खळ न पडता (पाहणे, रडणे, वर्षणे); स्थिर नजरेने; रोखून : 'राजे एकटक पंताजींच्याकडे पाहत होते.' – श्रीयो २३४.

एकटणे उक्रि. १. एकवटणे; एकत्र करणे; वेचणे; गोळा करणे (फुले, धान्य इ.) २. कासावीस होणे; गुदमरून येणे.(व.) पहा : **एकाटणे** ३. गर्दी होणे; एकत्र होणे; सरभेसळ होणे; मिसळणे.

एकटदुकट क्रिवि. एकटाच; एकट्याने; बरोबर इतरांना न घेता : 'महार–जागले खळें मागण्याला एकटदुकट कधीही जात नाहीत.' – गांगा ६९.

एकटप्पी क्रिवि. एका टप्प्यात; न थांबता; एकाच पल्ल्यात.

एकटप्पी–प्प्या वि. एक टपाचा; आतील किंवा खालचा टप (कलंडा) आणि वरील टप यांपैकी कोणता तरी एक टप असलेला (तंबू.)

एकटा वि. एकला; दुसरा कोणी बरोबर नाही असा.

एकटाक वि. एकला; दुसरा कोणी बरोबर नाही असा; सोबत नाही असा; निराधार; ज्याला कुणाची मदत नाही असा.

एकटाकी वि. १. एका आकाराचा, घाटाचा, रंगाचा; (सामा.) एका स्वरूपाचा. २. खंड न पडता लिहिलेला; एकाच व्यक्तीने लिहून पूर्ण केलेला; एकाच मनुष्याने एकाच टाकाने लिहिले असताना सारख्या वळणाचे दिसणारे (अक्षर) किंवा अशा अक्षरांचा (लेख, पुस्तक): 'मराठ्यांचा एकटाकी संपूर्ण इतिहास लिहून काढलेला आहे.' – मागोवा ८३. ३. एकच टाका दिलेला (द्रोण इ.).[सं. एक + टंक्]

एकटाकी मोर्तब हात न उचलता लिहिलेला मोर्तब.

एकटा टिकोजी, एकटा प्राणी, एकटा एकसुरा १. फटिंग; एकलकोंडा; एककल्ली; माणूसघाण्या. २. ब्रम्हचारी; प्रपंच नसणारा मनुष्य.

एकटादुकटा वि. एखाददुसरा; बहुतेक एकटा क्वचित दुकटा.

एकटांगी रोग (पशु.) कमी वयाच्या गुरांत किंवा वासरांत दिसून येणारा रोग. या रोगात जनावर लंगडते. स्नायू असलेल्या भागावर सूज येते.

एकटांग्या वि. १. एक पाय असलेला; एका दिशेने जाणारा.(व.) २. (ल.) एककल्ली (मनुष्य).

एकटिका एकटा; एकला; अन्य कोणी बरोबर नसलेला : 'तो गातां तरि एकटिका । परि स्वरें पुरुतां नोका ।।' – शिव १६८.

एकठय, एकठांय, एकठावण, एकठे क्रिवि. एकाच ठिकाणी; एका स्थळी; एकत्र. (क्रि करणे.) (कु.गो.)

एकठशी वि. एकाच प्रकारचा; चाकोरीतला; ज्यात काही बदल नाही असा : 'एकठशी जीवनाला वैतागलेल्या ...' – माजी १८४.

एकठोक क्रिवि. १. सर्व एकत्र; सरसकट; एकदम. २. घाऊक; एकसट्टा; ठोकळ; किरकोळ नव्हे असे.

एकडकाठी स्त्री. (विणकाम) हातमागावरील ओव्या किंवा वह्या ज्याला टांगायच्या अशी धनुकली किंवा गज; ढेकणी; कपाळकाठी.

एकडा क्रिवि. एकदा : 'पण एकडा हुषार झालेला महादा ...' – वानगी ८८.

एकडा पु. एक; एकाचा आकडा.

एकडाल (संगीत) स्वरक्रमात बदल न करता मंद्र अथवा मध्य सप्तकातील स्वरापासून आरंभ करून निदान सात स्वरांची घेतलेली (तान.)

एकडाव क्रिवि. एकदा; एकवेळ : 'एकडाव मला शृंगारपूर बघायचं होतं.' – श्रीयो १.३२४.

एकडेंगा पु. खेकडा : 'मऊ मऊ चिखल .. त्यावरील तुरूतुरू धावणारे एक –डेंगे.' – शेलूक ९.

एकडोळसा न. एक जातीचा मासा. (कु.)

एकडोळा पु. १. एक डोळा. २. (ल.) एकुलता एक मुलगा. वि. एकच डोळा असलेला.

एकडोळी करोटी, करवंटी शेंडीकडील बाजूची, एकडोळा (भोक) असलेली, नारळाची करवंटी; नरोटी.

एकढाळी छप्पर (स्था.) एकाच बाजूने उतरते असलेले छप्पर.

एकतत्त्ववाद पु. अद्वैतवाद; जगात एकच सत्यस्वरूप आहे, मग ते भौतिक असो, अगर आध्यात्मिक असो असा सिद्धांत. [सं.]

एकतत्त्वी क्रिवि. एका बाबतीत; एका गोष्टीत; एका ठिकाणी; एका मुद्द्यावर (जीव धरणे, मन लावणे, अनुसंधान धरणे, चित्त देणे इ.) [सं. एक + तत्त्व]

एकतत्त्वी होणे एकाचाच किंवा एका पक्षाचाच कारभार चालणे : '.. एकतत्त्वी जाले हें बरें.' – ऐलेसं ९७.

एकतया क्रिवि. एकाग्रपणे; एकचित्ताने : 'त्यांची नामें कोण कोण । तेंही ऐके एकतया ।' – मुआदि १४.३५. [सं.]

एकतरफा वि. १. एका धन्याचा, राजाचा (प्रदेश). २. एका बाजूचा; पक्षपाती; एकदेशीय (विधान).
क्रिवि. १. एका बाजूस; एका भागी. २. एका बाजूचा; प्रतिपक्षी हजर नसताना (न्याय).

एकतरफी–तर्फा–तर्फी वि. १. एकाबाजूचा; पक्षपातीपणाचा : '...आणि तोंवर तीच एकतर्फी निर्णय घेऊन म्हणाली ....' – इंधन ३२. २. प्रतिपक्षाच्या अनुपस्थितीत दिलेला (निर्णय, निकाल): दुसरी बाजू ऐकून न घेता दिलेला (निर्णय). पहा : **एकतरफा** 'या दुसऱ्या मुद्द्याकडे प्रकृत निबंधांत फारसें लक्ष दिलें नाही त्यामुळें हल्लींचा लेख जरा एकतर्फी झाला आहे.' – लोटिकेले ४.११७.

एकतऱ्हा स्त्री. एक (विचित्र, चमत्कारिक, नवीन) प्रकार, रीत, धाटणी, पद्धत : 'परंतु दिवस एकतऱ्हेचे होते.' – ऐलेसं ५२४.

एकतऱ्हेचा वि. वेगळ्या प्रकारचा; चमत्कारिक; विचित्र; विक्षिप्त.

एकतळ वि. एकपदरी; एकेरी : 'सियाळेया दिसां एकतळेन वस्त्रेंसीं असति.' – लीच १६.

एकतंड क्रिवि. एकसारखा; सतत; अखंड. (व.)[सं. एक +तन्]

एकतंत क्रिवि. अखंड; एकसारखा; सतत (वेळ, जागा, क्रिया इ.)

एकतंत्र क्रिवि. एकदम; एका वेळी; एकाच साधनाने; एकसूत्री; एकसाधनी.
वि. एकसत्ताक; एकसूत्री; अनियंत्रित; एकमुखी; एकाच व्यक्तीच्या धोरणाने, तंत्राने; पहा: **एकतंत्री** : 'सर्व कारभार एकतंत्र करण्याची जी इंग्रजी कामगारांची हौस आहे.' – लोटिकेले १.१२२. [सं.]

एकतंत्री वि. १. एकाच सत्तेचे; एकाच तंत्राने चालणारे; एकहाती; एकमार्गी; एकतंत्र. २. एकपक्षीय; हुकूमशाही (राजवट). ३. (ल.) (चांगल्या अर्थी) सुरळीत; व्यवस्थित. ४. (ल.) (वाईट अर्थी) अनियंत्रित; स्वैर; जुलमी.

एकता स्त्री. एकोपा; एकी; ऐक्य; एकरूपता; सारूप्य : 'न भिन्न तनु त्या भले भजति एकता पाहुनी.' – केका १०८. [सं.]

एकताटी, एकताट्या वि. १.एकाच ताटातील; एकाच ताटात जेवणारे २. (ल.) एकाच जातीचे; समानधर्मी; समान आचाराचे. (वा.) **एकताटी जेवणे** – अगदी सलोख्याने असणे; भेदभाव न ठेवणे.

एकतान वि. एकाग्र; तन्मय; लक्षपूर्वक; एकाच गोष्टीकडे मन लागून असलेले. जसे: – गायनेकतान, शृंगारेकतान, अध्ययनेकतान, विषयेकतान, परमार्थेकतान, सत्कर्मेकतान : 'साऱ्या वृत्ती श्रद्धा आणि भक्तीने एकतान झालेल्या. ' – जज ५३.

एकतानता, एकतानपणा स्त्री. पु. एकाग्रता; तन्मयता; अनन्यवृत्ती : 'वेळ आपल्या गतीनें एकसारखा एकतानपणें जातच असतो.' – वज्रा २१३.

एकतार, एकतारा, एकतारी वि. १. एका – एकेरी तारेचा; एका धाग्याचा; दोन धागे पिळून दुहेरी न केलेल्या धाग्याचा (विणलेला पितांबर, वस्त्र वगैरे). २. एका नमुन्याचे, फर्म्याचे, मजकुराचे; एकसारखे; एकाच प्रकारचे : 'मग कैसा केला विचार । पत्रें लिहिली एकच तार ।' – ऐपो १०६. ३. एकच एक; तेच तेच; कंटाळवाणे.

एकतारा, एकतारी पु. स्त्री. वीण्यासारखे एक तंतुवाद्य. याचा भोपळा गोल व चापट असतो, दांडी कळकाची असून बोटभर व्यासाची व हात दीडहात लांबीची गोल असते. भोपळा एका बाजूने कातड्याने मढविलेला असतो. घोडी भोपळ्याच्या मध्यभागी लावतात. दांडीला एक खुंटी लावून तिला एक तार गुंडाळलेली असते व ती षड्जात लावलेली असते. ती घोडीवरून भोपळ्याच्या बुडाशी जो दांडीचा भाग असतो त्याला लावलेल्या बारीक खुंटीला खिळवितात. भजनी लोक, गोसावी, भिकारी वगैरे गाताना या वाद्याचा उपयोग करतात.

एकतारी स्त्री. १.(संगीत) बांबूच्या ३ फूट लांबीच्या नळीवर खालच्या बाजूला चामड्याच्या पातळ पडद्याने मढवलेला भोपळा बसवलेला असतो. या दोन्हीवर एकच तार ताणून बसवतात. गायकाचा हिच्यात मिळवलेला स्वर छेडण्यासाठीच तिचा उपयोग असतो. हिला 'एकतंत्री वीणा' असेही म्हणतात. २. एकनिष्ठा : '... तेण्हेच प्रमाणा पुढेंही एकतारीने चाकरी करूं.' –मइसा १.४५.

एकताल पु. (संगीत) एका तालाचे नाव. यात मात्रा बारा व विभाग सहा आहेत : 'मंगलाचरणाला एक जीवाचा एकताल आणि भरतवाक्याला रुद्रताल हा ठरलेला.' – भा ३८. [सं.]

एकताल, एकताली वि. १. (संगीत) एक तालाचा (ध्रुपद इ.). २. ज्यातून एकच नाद निघतो असे वाद्य (तास, झंगट इ.).

एकताळामण पु. एक माप. या मणाचे वजन सुर्ती १५४० रुपये भार असे.

एकताळी पिटणे हाहाकार होणे : 'ऐसी एकताळी पीटली । सत्यलोकिं ।।' – राज्ञा १.१५७.

एकतीस वि.तीस अधिक एक मिळून होणारी संख्या; ३१ ही संख्या. [सं. एकत्रिंशत्]

एकतीस पाव पावणे आठ (पुरा मासा नाही, एक गुंज कमी); नपुंसक.

एकतुक वि. एकटा; एकला; एकाकी : 'अशी ग मी संसारी एक तुका । खर्च नाहीं केला रुका ।' – पला ४.२०.

एकतुका वि. सारखे; समान; सदृश : 'ऐसें एकतुकें पांचभौतिक। पडती बहुवस टांक।' – ज्ञा ७.२५.

एकतूक वि. सारख्या वजनाचा; सारखा. [क. तूक]

एकतोंडी वि. एका बाजूला तोंड असलेला, मोकळा असलेला.
क्रिवि. एका बाजूने; विरूद्ध बाजूला कोणी नसताना; एकांगी (वाद, तक्रार, पुरावा, कैफियत). (वा.) **एकतोंड करणे** – तोंड देणे; समोर होणे; रुजवात करणे.

एकत्यारी स्त्री. अखत्यारी; मुखत्यारी : 'कोणा एकाची प्राबल्यता होऊन एकत्यारी झाल्याविना स्थिरता होता दिसत नाहीं.' – ऐलेसं ८१३२.

एकत्र क्रिवि. १. एका जागी, ठिकाणी; मिळून. २. अविभक्त (कुटुंबाच्या संदर्भात); भागीदारीने. ३. एकीकडे; एका बाजूला:' एकत्र केशव वसे अपरत्र वैरी । अन्यत्र पर्वत शतक्रतु भीत भारी ।' – नीति १८.

एकत्र कुटुंब (कायदा) मूळ एखाद्या पुरुषापासून जो वंशविस्तार झालेला असतो त्या वंशातील पुरुष, त्यांच्या बायका व अविवाहित मुले असे सर्व मिळून बनलेले एक कुटुंब; ज्याच्या मालमत्तेची वाटणी झालेली नाही, असे कुटुंब.

एकत्र कुटुंबपद्धति–ती स्त्री. वाटणी वगैरे न करता एकत्र राहण्याची पद्धती; सर्व भावांनी आपल्या बायकामुलांसह एका घरात राहणे. [सं.]

एकत्रित वि.एकत्र केलेला; एकत्र झालेला. [सं.]

एकत्रीकरण न. एकत्र करणे; दृढीकरण. [सं.]

एकत्रीकृत वि. एकत्र केलेले; मिळवलेले; मिसळलेले. [सं.]

एकत्रीकृत निधी कर व इतर महसुली उत्पन्न ज्यात जमा होते तो निधी.

एकत्रीकृत शाळा (शिक्षण.) व्यवसायशिक्षण आणि नेहमीचे शिक्षण जिथे दिले जाते अशी शाळा.

एकथाट पु. सारखी किंवा एक प्रकारची व्यवस्था, चाल, रीत, मांडणी.

एकथोक, एकथोप क्रिवि. १. एकदम एका वेळी सर्व (घेणे, थोडेथोडे अनेकवार न घेता); एकरास. २. घाऊक; सरसकट; उक्ता; एकठोक.

एकदट क्रिवि. एकदम; एकमेकांस लागून; एका ओळीने; एकत्र : 'तंवं डौंडीची वीरघंटा । सनसनितीं जेंगटा । वाजितांती एकदटां । एके वेळें ।' – शिव ५२२.

एकदम क्रिवि. १. ताबडतोब; तत्क्षणी; अकस्मात; थेट; विलंब न लावता; न थांबता; विसावा न घेता; २. एका पर्यायात; एका दमात; एक सपाट्यात, झेपेत. ३. एका वेळी; एक समयावच्छेदेकरून.

एकदरें न. एका दांडीची शिडी : ‘मिया त्यागाचे केले एकदरें : जें टाकावेया चवरें मुक्तिदुर्गाचे.’ – उगी २२५.

एकदल वि. एकदळ. एक पानाचे, एक पाकळीचे (झाड, फूल इ.)

एकदशांश दहावा हिस्सा.

एकदंडी क्रिवि. एका हप्त्यात; एका दमात; एकाच वेळी; एका ठायी. पु. एकच काठी बाळगणारा संन्यासी. : ‘न्मस्कारी व्याकुल एकदंडी : जवलाची देओ देखति ना’ – वछा १९३.

एकदंत पु.(गणपतीला एकच दात असतो यावरून) गणपती; गजानन; विनायक : ‘प्रथम नमन तुज एकदंता ।– तुगा ४१९३. [सं.]

एकदा क्रिवि.१. एके वेळी; एके काळी. २. एकदम; एकसमयावच्छेदेकरून; युगपत. ३. एकवार; एकवेळ; पुन्हा नाही अशा रीतीने. ४. केव्हातरी. [सं.]

एकदाचा क्रिवि. कसेतरी; कसेबसे; सायासाने; एकवार; फक्त एकवेळ; पुन्हा कधीही नाही. (क्रि. होणे, करणे इ.) उत्सुकता, काळजी यांचा शेवट दर्शविणारा प्रयोग. [सं.]

एकदाट वि. भरगच्च; दाट : ‘कर्णेविण सोपटें । कणिसें लागलीं आथि एकदाटें ।’– राज्ञा ९.४२५. [क. दट्ट]
क्रिवि. एकदम : ‘बाण सुटती एकदाट.’ – उह १३५६.

एकदाणा पु. एक खडा असलेली नाकातील चमकी; मुगवट. (तंजावर).

एकदाणी वि. सर्व दाणे एकसारखे असलेले (धान्य) : ‘कुणब्याजवळील दाणा एकदाणी असतो.’ – गांगा १४९.
स्त्री. सोन्याचे मणी सोन्याच्या कड्यांनी गुंफून केलेला, स्त्रियांनी गळ्यात घालायचा दागिना; एकेरी मण्याची माळ; एक पोतीचा व एक सोन्याचा मणी ओवलेली माळ.

एकदाणे न. एकदाणी माळ; एक प्रकारची माळ. यात काचेच्या पोतीमध्ये मधोमध एक सोन्याचा मणी असतो : ‘एकदाण्याची खरबुजी तऱ्हा सादर ।’ – अफला ५५.

एकदिग्गत–दिग्गामी वि.एकाच दिशेने गेलेला. [सं.]

एकदिग्गामी प्रेरणा (यंत्र.) एकाच दिशेकडे कार्य करणारी प्रेरणा, शक्ती; सरूप प्रेरणा. याच्या उलट भिन्नदिग्गामी किंवा विरूप प्रेरणा.

एकदिन, एकदिवस क्रिवि. एके दिवशी; कधीतरी : ‘एकेदिनीं परंतू पिल्लास त्या कळाले.’ – गदिमा.

एकदिल, एकदील वि. एकमताचा, एक विचाराचा (स्नेही, समाज, गट इ.); एकचित्त; सर्वांचा एकच निश्चय किंवा ध्येय असलेला; एकनिष्ठ : ‘श्रीमंत व नबाब एकदील, तेव्हां हैदरखानाचा मज्कूर किती आहे.’ – ऐलेसं ६.२८९८; ‘नऊलाख सैन्य एकदिल घोडा शिरा । तीस हजार अबदागिरी बरोबर चाले ढिगारा ।।’ – ऐपो १११.
पु. स्नेह; ऐकमत्य; संतोष : ‘फौजेचा एकदील करून .... पत्राचे उत्तर जरबेचे आले असता इकडूनही सरंजाम जावयास दिवसगत लागणार नाही.’ – ऐलेसं ११.२१०२. [फा. यक्+दिल्]

एकदिली स्त्री. वि. स्नेह; ऐकमत्य; मैत्री. एकमताचा, एकविचाराचा : ‘सलूख एकदिली आहे.’ – दिमरा १.१२३.

एकदी क्रिवि. परवा; नुकतेच; एके दिवशी.

एकदीस क्रिवि. एके दिवशी. (कु.गो.)

एकदु:खसुख वि. सुखदु:खात वाटेकरी असणारे; समसुखदु:खी; ज्यांचे सुखदु:ख एक आहे असे. [सं.]

एकदेश पु. एक अंश; एक पक्ष; एक भाग : ‘गळां पडति ज्यांचिया तवगुणैकदेश भ्रमें । तिहीं तुजचि दाविता भजति’– केका ३२.

एकदेशत: क्रिवि. एकपक्षी : ‘वरील निरूपण केवळ एकदेशत: झाले ।’– ५२. [सं.]

एकदेशित्व न. मर्यादित्व; संकुचितता.

एकदेशी वि. १. एकाच देशाचे; समदेशी. ‘तेणें एकदेशियें परी व्यापिलें । लोकत्रय ।।’ – ज्ञा ५.३६. २. पूर्णपणे लागू न पडणारे; एकांगी; मर्यादित; एकरूपी (दृष्टांत, उपमा, तर्क इ.) : ‘अगा एकदेशी दृष्टांत । दृष्टीत कीर असे वर्तत ।।’ – विपु ७.३८. ३. एकाच बाजूचे; एकपक्षीय (विचार, विधान इ.) ४. आपले मत सिद्ध करण्यासाठी आपल्या विरुद्ध बाजूचे विचारात घेतलेले (मत). ५. एककल्ली; संकुचित विचाराचा; कोणाशी न पटणारा (माणूस, विचार, मत): ‘एकदेशी होतों अहंकारें आथिला । त्याच्या त्यागें झाला सुकाळ हा ।।’– तुगा ४०४६. ६. सार्वत्रिक, सार्वदेशीय नव्हे असा; एकाच जागेला चिकटून असलेला; अल्पव्यापी. ‘सर्वव्यापक अयोध्यावासी । किंवा आहे एकदेशी । सांगे मजपासी निश्चयें ।।’ [सं.]

एकदेशीय वि. एकदेशी असणारा; संकुचित विचारांचा; एककल्ली.

एकदेशीयता स्त्री. संकुचितपणा; एकांगीपणा; विशिष्ट विषयाबाहेर न जाणे : ‘आपल्या आचारविचारांना त्यांनी एकदेशीयतेची बाधा येऊ दिली नाही.’– संवासा २५.

एकदोरी स्त्री. १. एकसूत्र; एक ओळ. २. (ल.) एकमत; एकसत्ता. वि. सरळ; सारखे.

एकधा क्रिवि. एकप्रकाराने, मार्गाने: ‘एकधा दशधा विभागता । ऐक नृपनाथा सांगेन ।।’– एभा ३.१०६. [सं.]
वि. एका प्रकारचा.

एकधा, एकाधा वि. कोणी एक; कोणताही एक : ‘तेविंचि एकाधा प्रसादु ।’– राज्ञा १४.२३०.

एकधातुचलनपद्धति–ती स्त्री. (अर्थ.) नाणी पाडण्याच्या कामी एकाच धातूचा उपयोग ज्या पद्धतीत होतो ती पद्धती. केवळ सोने किंवा रूपे यांचे चलन असून सोने व रूपे यांचे एकसमयावच्छेदे चलन नसणे.

एकधातुमान न. (अर्थ.) चलनासाठी प्रमाणमूल्य म्हणून एकाच धातूचा– सोन्याचा किंवा चांदीचा उपयोग करणे.

एकधान्य न. ज्यामध्ये एकाच जातीचे धान्य खाऊन राहायचे असते असे चातुर्मासात आचरायचे व्रत; एकाच प्रकारच्या धान्यावर निर्वाह. [सं.]

एकधार क्रिवि. सतत; सारखा; न थांबता; अविरत : ‘पाऊस एकधार

लागला होता.'– राणीचे पुस्तक ६५. [सं.]

एकधारी वि. एका बाजूला धार असलेले; एका बाजूने चालणारे (हत्यार, तलवार वगैरे).

एकधारी रोखण सुताराचे एक हत्यार; रंधा. (कु.)

एकधाऱ्या पु. एक प्रकारचा रंधा. यात पाते डाव्या कडेला खेटून असते. त्यामुळे एका बाजूला खाच पाडता येते. (खा.)

एकधोतरी वि. एकच वस्त्र असलेला.

एकधोरणी वि. एकच हेतू, उद्देश, धोरण असलेला.

एकनती स्त्री. (भूशा.) खडकांचा क्षितिजसमांतर किंवा नकळत कलता थर एखाद्याच ठिकाणी जरा जास्त अंशाने कलता होऊन पुन्हा पूर्ववत होतो तेव्हा तयार होणारी रचना.

एकनळा क्रिवि. वि. १. लागोपाठ; खंड न पडता; एकामागून एक (मुलगे किंवा मुली होणे): 'लग्नाआधींच मी गर्भिण । एकनळ मुलगे झाले तीन ।' – पला ४.१९. २. एक नाळ असलेले जुळे (मूल).

एक नंबरचा वि. अव्वल दर्जाचा; पहिल्या प्रतीचा.

एकनाड, एकनाडी स्त्री. १. मुलगा किंवा मुलगी यांच्या जन्मनक्षत्रावरून आद्य, मध्य व अंत्य अशा तीन नाडी ठरलेल्या असतात. ज्या मुलामुलांची वरीलप्रमाणे एकच नाडी असेल त्यांचा विवाह होत नाही. २.(ल.) जवळचा संबंध : 'सामाजिक सुधारणा आणि कायदा यांच्यामध्ये अपरिहार्य एकनाड असल्यामुळे' – आलेख ९३.

एकनाड वि. १. एकनाड असलेले जुळे (मूल) २. (ल.) एकाच आवडीनिवडीचे, मताचे, कलाचे.

एकनिक वि. एकट; एकटा.

एकनिकी स्त्री. जूट; एकी, एकपणा.

एकनिगम पु. कंपनीप्रमाणे अधिकार मिळालेला पुरुष.

एकनिरवडी वि. एकाच वेळी, एकाच कामात, एकाच झटक्यात निरवलेले, संपविलेले, उरकलेले.

एकनिश्चय पु. दृढनिश्चय; निर्धार; दृढश्रद्धा; विश्वास.
वि. दृढनिश्चयी; करारी.

एकनिष्ठ वि. १. एकाच व्यक्तीवर, तत्त्वावर, वस्तूवर श्रद्धा असलेला; एकावरच दृढनिष्ठा ठेवून चालणारा; अढळ श्रद्धावान : 'श्रीकृष्ण बोलावें तुवां तैसें । एकनिष्ठ ।।' – ज्ञा ३.१८. २. (उप.) अट्टल; पक्का; पुरा. जसे :– 'एकनिष्ठ लबाड, एकनिष्ठ लुच्चा इ. [सं.]

एकनिष्ठ काशीकर पुरा लबाड; अविश्वासू.

एकनिष्ठता, एकनिष्ठा स्त्री. १. एकाच व्यक्तीवर, तत्त्वावर पूर्ण श्रद्धा, अढळ विश्वास असणे; एकनिष्ठ असल्याचा गुण; पुरी श्रद्धा; मन:पूर्वकता. २. एकस्थिती; अचांचल्य :'जयां विषयाच्या ठायीं । एकनिष्ठता कहीं नाहीं'– ज्ञा २.११३. [सं.]

एकनिष्ठपणे क्रिवि. एकाच तत्त्वाला धरून.

एकनेत्री वि. एकाच डोळ्याला होणारा (मोतीबिंदू); एकाच डोळ्याने पाहता येते असा; एकच भिंग असणारा (चष्मा वगैरे).

एकपट वि. एकदा घेतलेले; एक या प्रमाणात; एखाद्या संख्येला एकाने गुणून मिळणारे (उत्तर). [सं. एक +प्रति]

एकपण–णा न पु. एकत्व; ऐक्य : 'ऐसी सर्व भूतमात्रीं । एकपणाची मैत्री ।'– ज्ञा १२.१४८.

एकपतिपत्नित्व न. (समाज.) एका पुरुषाला एका वेळी एक पत्नी आणि एका स्त्रीला एका वेळी एक पती असण्याची प्रथा.

एकपत्नी वि. १. एकच बायको असणारा; दुसरे लग्न न करण्याचा बाणा बाळगणारा; एक बायको असताना दुसरी न करणारा. २.धर्मपत्नी वाचून इतर स्त्रियांशी संबंध न ठेवणारा; व्यभिचारी नसणारा.[सं.]

एकपत्नीव्रत न. १. संपूर्ण आयुष्यात एकाच स्त्रीशी विवाह करण्याचे व्रत; एकभार्याव्रत; एकविवाह व्रत. २. लग्नाच्या स्त्रीशीच संबंध ठेवायचा असा बाणा : 'एकबाण एकवचन । एकपत्नीव्रत पूर्ण । चौदा वर्षे भरल्याविण । कदापि आगमन घडेना ।।'– रावि १२.११२.

एकपथी वक्र (भूमिती) एकेरी प्राचलातून परिमितपणे दाखवता येणारे निर्देशक ज्याला असतात असा वक्र.

एकपद न. (बीज.) ज्या पदात एकच रक्कम असते ते पद. याच्या उलट संयुक्त पद जसे : –३ क्ष, ५ अब, ६ अबक ही एकपदे होत. परंतु अ+ब हे संयुक्त पद होय. [सं.]

एकपदरी वि. १. एका बाजूचा पदर चांगल्या प्रकारचा असून दुसऱ्या बाजूचा पदर साधा असणारे (लुगडे, पागोटे इ.) २. एकेरी; एका घडीचे (वस्त्र.) ३. एकच सर, पदर असलेला (गोफ, माळ इ.) ४. एकेरी; अरे तुरे असे (बोलणे). (वा.) **एकपदरीवर येणे–** (एखाद्याशी बोलताना) एकेरीवर येणे; अरेतुरे करणे.

एकपदी मार्ग एकाच माणसाला जाता येण्यासारखी वाट; पाऊलवाट; एका ओळीने जाण्यासारखा मार्ग; एक कतार (सैन्याचा रस्ता), ओळ.

एकपरी क्रिवि. एक प्रकारे; एका दृष्टीने : 'हे सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने एकपरी बरेच झाले.'– गांगा २.

एकपर्णी एका पानाचे. (झाड, फूल इ.)

एकपद्धति–ती स्त्री. (राज्य.) एकाच राजकीय पक्षाच्या हाती राज्याची सर्व सत्ता असून, इतर पक्षांना बंदी असलेली शासनपद्धती. [सं.]

एकपक्षी वि. विशिष्ट; एकजातीय; एका बाजूचे.
क्रिवि. एका अर्थी; एका बाजूने; एका दृष्टीने; कोणा एका पदावर अवलंबून (बोलणे, असणे इ.)

एकपंक्तिरचना स्त्री. संख्या, अक्षरे, वस्तू इत्यादींची सरळ रेषेत मांडणी.

एकपंगत स्त्री. एके ठिकाणी, एका पंक्तीला बसून जेवणे; एकत्र भोजन. [सं. एक+पंक्ति]

एकपंथी वि. एकमार्गी; एककल्ली; धोपटमार्गी; एका पद्धतीचा; साधा; एकच क्रम आचरणारा.

एकपाकळी वि. ज्या फुलाच्या पाकळ्या अगदी जुळलेल्या, एकमेकांना चिकटलेल्या असतात असे (फूल.) जसे : – गोकर्णी.

एकपाखी वि. एकच पाखे असणारे; ज्याच्या छपराला एकच बाजू आहे असे (घर) : 'दोनेक कासरे अंतरावर एक एकपाखी कौलारू झोपडं होतं.'– बाविबु १४२.

एकपाठी वि. १. एकवेळ वाचून किंवा ऐकून पाठ म्हणणारा. २. (ल.) अत्यंत बुध्दिवान; विलक्षण स्मरणशक्तीचा.

एकपाठी, एकपाठ्या वि. १. लागोपाठ; एकामागून एक; पाठोपाठ

जन्माला येणारी (भावंडे, एखाद्या कुटुंबातील मुले).

एकपाणी न. पाण्याचे एकच साधन (विहीर, तलाव इ.) असणे.

एकपात्र न. जेवणाचे पान आणि द्रोण एकाच जातीच्या पानाचे असण्याचे व्रत. त्याच्या उलट भिन्नपात्र.

एकपात्री वि. ज्यात एकच पात्र आहे असा; ज्यात एकच व्यक्ती, सर्व पात्राचा अभिनय करते असा (नाट्यप्रयोग).

एकपाददृष्टि –ष्टी स्त्री. (ज्यो.) पूर्ण दृष्टीचे एक चतुर्थांश फल असलेली दृष्टी. प्रत्येक ग्रह आपल्या स्थानापासून ३ऱ्या व १० व्या स्थानावर व तत्रस्थ ग्रहांवर एकपाद दृष्टीने पाहतो. प्रत्येक ग्रहाला द्विपाद, त्रिपाद व पूर्णदृष्टीही असते. [सं.]

एकपाद शिरासन न. १. (योग) उजवी मांडी मोडून बसून नंतर डाव्या पायाखालून डावा हात घालून तो पाय हळूहळू मानेवर चढविणे. २. (मल्लखांब) बोंडावर बसून डावा पाय मानेवर ठेवून हात जोडणे. [सं.]

एकपार्श्विक वि. एकच बाजू असलेला; एकाच बाजूस घडणारा.[सं.]

एकपावटी क्रिवि. एकवेळा; एकदा.

एकपावली वाट पहा: **एकपदी मार्ग**

एकपांक्त वि. एक जातीचा; ज्याच्याशी सहभोजन होते असा; एका पंक्तीत बसून भोजन करण्यास योग्य. [सं. एक + पंक्ति]

एकपिकी वि. वर्षातून एकवेळ पीक, बहर येणारी (जमीन, झाड); एकप्रसू.

एकपिंडता स्त्री. सेंद्रिय एकात्मता.

एकपुट क्रिवि. सबंध; एकदम; एकवेळ; एकठोक.(ना.)

एकपुटी वि. एकच पुट देऊन तयार केलेले. (रसायन इ.)

एकपुठा पु. एक जमाव, संघ; एका संस्थेची, कामाची, विचारांची मंडळी.

एकपुडी वि. एकपूड (कातडी आच्छादन); एकेरी कातडे असलेला. (मृदंग, पखवाज) [सं. एक+ पुट]

एकपुती वि. एकच मुलगा असलेली (स्त्री.) [सं. एक+पुत्र]

एकपेट्या, एकपेटा पु. एकी; एकात्मता; सख्य : 'सिंदे व नाना फडणिसांचा पेट्या एक' – इसंहोकै ६.

एकपेडी स्त्री. एकदाणी; एकसर. (कु.)
वि. एक पेड असलेली. (वेणी, दोरी)

एकपेशी, एकपेशीय वि. एक पेशी असणारे; एकपेशीमय. (प्राणी)

एक प्रकार, एक प्रकारचा वि. १. निराळ्या प्रकारचा; निराळ्या वर्गाचा; विलक्षण; विचित्र; अनन्यसाधारण : 'लौकिक एकप्रकारें जालिया उत्तम नाहीं'– मरि २.९५. २. एकाच तऱ्हेचा.

एकफणी वि. एका विणीचा; एका तऱ्हेचा. (कपडा)

एकफरमा वि. एका आकाराचा, ठेवणीचा, जातीचा, स्वरूपाचा. (सैन्याच्या रांगा, लिहिण्यातील अक्षरे वगैरे).
पु. आकृती, आकार यांत ऐक्यता; एक स्वरूप; एक आकार.

एकफसली वि. वर्षाला एक पीक देणारी (जमीन); एकपिकी.

एकफावट क्रिवि. एकदा;एकवेळ. पहा: **एकपावटी** (गो.)

एक–ब–एक क्रिवि.१. एकूण एक; सर्व : 'एक–ब–एक हुजुर मालूम जाहलीं.'– ऐलेसं १५.३१. २. एकाएकी; एकदम: 'त्यांनीं मीर इमाम यास जठचरक येथें एक–ब–येक येऊन गांठलें.' – मइसा ५.११४. [फा. यक् ब यक्]

एकबगी क्रिवि. एकप्रकारे : 'परि तें एकबगीं थोडें । केलिया प्रतिकारामाजि वडें ।' – ज्ञा ११.४०४. [एक+बगा=प्रकार]

एकबरी वि. एकेरी पन्ह्याचे, रुंदीचे, डबल पन्हा नसलेले. (कापड)

एकबर्दा पु. तेल विकणारा. ठग लोक याला अशुभसूचक मानीत.(ठगी.)

एकबागी वि. मानेवर एका बाजूला भोवरा असणारा (घोडा). हे घोड्याचे अशुभ लक्षण किंवा खोड समजतात.

एकबाट पु. संकर; सरभेसळ; जमाव; गोकुळ; गोलंकार; खिचडी. क्रिवि. सरभेसळीने; भेदविचाररहित.

एकबाणी वि. ज्याचा कुठलाही बाण व्यर्थ जात नाही असा.

एकबारी वि. १.एकदाच बार, आवाज करणारा, वाजणारा (फटाका बंदूक इ.) २. वर्षाला एकच बहर किंवा बार येणारे (फळझाड). ३. एका बाराचे काढलेले (गुलाबपाणी इ.) ४. सर्व एक रुंदीचा; एकेरी पन्ह्याचें, रुंदीचे. ५. एका दमात गाठायचा, करायचा (पल्ला, दौरा इ.) : 'बंडखोरांपैकी घोडदळाची तुकडी ३६ मैलांचा एकबारी पल्ला मारून दिल्लीजवळ येऊन धडकली.'– सन १८५७.१९७.

एकबाल पु. नशीब; सुदैव; भरभराट.

एकबीच वि. एक टाकून एक, सम. जसे :– २, ४,६, ८.

एक बीच हात (कवाईत) सम अंक (२,४,६) म्हटलेल्यांनी आपला उजवा हात ताठ, जमिनीशी समांतर करून खांद्याच्या पातळीवर समोर, बोटे एकमेकांशी लागलेली, अंगठ्याचा अग्रभाग वर आणि करंगळी जमिनीकडे अशा स्थितीत नेणे.

एकबीज जुळे (वै.) एका फलितांडाचे विभाजन होऊन निर्माण होणारे जुळे भाऊ किंवा बहिणी. फक्त दोन मुले किंवा दोन मुली अशाच जोड्या असतात. फक्त एकबीज जुळ्याचाच वंशदाय सारखा असतो.

एकबुरजी वि. १. एक खांबी (राहुटी, तंबू). २. (ल.) एकाच माणसावर अवलंबून असणारे. (काम, कारस्थान)

एकबुंदकी, एकबुंदी वि. एका जुन्या चलनी रुपयाचे नाव. या रुपयाच्या पृष्ठभागावर एक बुंद (ठिपका) असे.

एकबेक वि. सम–विषम (रंग, पदे).

एकबेरजी स्त्री. १. जमाखर्चाची पहिली नोंद. याच्या उलट दुबेरजी. या नोंदीवरून पुढे खातेवारी दुबेरजी, तिबेरजी केली जाते. उदा. एकबेरजी कलम, रक्कम, लिहिणे, हिशोब. २. एकनोंदी हिशेब; बारनिशी. याच्या उलट दुबेरजी. ३. सर्व रकमांची एकूण बेरीज.
वि. अशा प्रकारे ठेवलेला (हिशेब, प्रकरण इ.)

एकबेरजी दप्तर १. निरनिराळ्या खात्यांचा जमाखर्च, हिशेब व नोंदणी एकत्र ठेवणारी कचेरी, खाते. २. खतावणी; निरनिराळ्या खात्यांच्या खतावण्यांच्या रकमांचे हिशेबी दप्तर. यावरून एकंदर सरकारी जमाखर्चाच्या हिशेबाचे पत्रक तयार करता येत असे.

एकबोटी गंध न. एका बोटाने कपाळाला लावलेले आडवे किंवा उभे गंध. याच्या उलट दुबोटीगंध.

एकभक्त वि. १. एकाच देवाची भक्ती करणारा. २. (ल.) एकाच धन्याची सेवा करून राहणारा; एकाचीच मनधरणी करणारा. [सं.]

एकभाज वि. एकदाच भाजलेले.

एकभाव पु. १. मनाची एकाग्रता; एक विचार; ठाम मत. २. एक दर; एक ठरावीक किंमत.

एकभाषिकता स्त्री. एकच भाषा बोलता, वाचता, लिहिता येणे.

एकभाषित न. एकानेच केलेले भाषण; नाटकातील एकपात्री भाषण. [सं.]

एकभुक्त, एकभुक्ति–क्ती न. स्त्री. दिवसरात्र मिळून एकदाच किंवा माध्यान्ही एकदाच जेवून राहण्याचे व्रत: 'दशमीव्रत एकभुक्त साचार । एकादशी उपोषण हरीजागर ।।'
वि. दिवसातून एकदा जेवणारा. [सं.]

एकभोग वि. जो एकाच माणसाच्या मालकीचा असून त्यात हिस्सेदार नाहीत असा. (भाग)

एकमजला, एकमजली वि. १. एकच मजला असलेले (घर). २. एकच पदर असणारे. (पातळ, लुगडे, पागोटे इ.)

एकमजली क्रिवि. मध्ये न थांबता एकदम मुक्कामापर्यंत (जाणे, चालणे इ.).

एकमत न. मतैक्य; सर्वांची मते जुळणे; अविरोध; एक विचार; अभिन्नता; एकजूट.
वि. एकमताचे, विचाराचे. [सं.]

एकमध्य वि. (ग.) समकेंद्र; एककेंद्र; मध्यबिंदू एक असणारे. [सं.]

एकमय वि. १. सर्वव्यापी; सर्वाधिष्ठित. २. एकरूप : 'तुका म्हणे गंगासागर संगमीं । अवघ्या झाल्या ऊर्मि एकमय ।।'– तुगा ४०१६. ३. सर्व, एक समान (जातीचे प्रकारचे, गुणाचे). जसे :– एकमय धर्म, आचार, स्थिती, प्रकार.
क्रिवि. एकत्र; सर्व मिळून; एकजुटीने. [सं.]

एकमसूदी वि. थोर; अद्वितीय मुत्सद्दी; धोरणी; ज्याबद्दल दुमत होणार नाही असा; अद्वितीय : 'नाना फडनवीस एकमसूदी तर्क त्याने काढिला.'– ऐपो २७६.

एकमंगल, एकमंगळ न. (उप.) अनेक जातीचे लोक एकत्र येणे; सबगोलंकार; संकर; काला.

एकमानपद्धति–ती स्त्री. (ग.) त्रैराशिकाऐवजी एक रीत. या रीतीत प्रथम दिलेल्या प्रमाणावरून एका वस्तूची किंमत काढून नंतर त्यावरून इष्ट राशीची किंमत काढतात. याला एकमान गणित असेही म्हणतात. २. एक हे एकक प्रमाण मानून केलेली मोजमापाची पद्धत. [सं.]

एकमापांकी वि. (ग.) दुसऱ्या एककाशी सहज जुळणारे (परिमाण).

एकमार्गी वि. १. एकाच मार्गाने, रीतीने जाणारा; केवळ आपल्या मताप्रमाणे चालणारा; एककल्ली; चाकोरीतला; आग्रही : 'आमचे बालपणाचे जीवन फारच साधे, बाळबोध व एकमार्गी असे.'– माजी ६. २. एकाच दिशेने चालू असलेली किंवा एकाच दिशेने जाण्याची परवानगी असलेली (वाहतूक). [सं.]

एकमाही वि. एक महिन्याचा (हिशेब, वसूल, रोजमुरा, बेगमी इ.).

एकमांस, एकहाड वि. एका हाडामासाचा; एका रक्ताचा; एका कुटुंबातील; एक पिंड; सपिंड; सगोत्र.

एकमुख क्रिवि. १. सन्मुख : 'तेणे एकांती नेऊनि देख । व्यासासि केलें एकमुख.' – एभा १.५५३. २. तत्पर : 'माझ्या भजनीं एकमुख । माझिया निजभावें अतिभाविक ।।'– एभा १३.७४८.
वि. एक विचाराचे; एक जुटीचे; एक. [सं.]

एकमुखी वि. १. एका तोंडाचा; एका चेहऱ्याचा, रूपाचा, बाजूचा (देवमूर्ती, मुखवटा, रुद्राक्ष वगैरे). २. एकस्वरूपी; एक जातीय; एक तंत्री, एकाच अधिकाऱ्याच्या हाती असणारी (सत्ता) : 'सध्यां हिंदुस्थानांत एकमुखी राज्यपद्धती प्रचलित आहे.'– के २.१२.३० ४. एकाच्याच तंत्राने चालणारा, ज्याला एकच वरिष्ठ आहे असा. ५. एकमताचा; सर्वांचा :'आपण जे जे करू त्याला जनतेचा एकमुखी पाठिंबा आहे.' – आव्हान १२५

एकमुखी रुद्राक्ष पु. १. ज्याला एकच मुख आहे असा रुद्राक्ष. २. (ल.) एकतंत्री; जो एकाकडूनच माहिती, सूचना, सल्ला वगैरे घेतो असा माणूस, राजा, न्यायाधीश, अधिकारी वगैरे : 'सरकारी शाळांच्या एकमुखी रुद्राक्षानें सर्व शिक्षणक्रम सुरू ठेवणें बरोबर नाहीं.' –लोटिकेले ३.३९

एकमुठाण न. एकी; एकमत; जूट; कट ; संघ.

एकमुठी, एकमुठीचा, एकमूठ क्रिवि. १. एका मुठीने; एकरकमी; एका हाताने; एका वेळी : 'एका मुठीनें म्यां हजार रुपये दिल्हें.'–मोल २. कामाच्या किंवा व्यवहाराच्या एका वेळी, एका उरकात, एका झटक्यात.
वि. १. एकाच्याच सत्तेखाली असणारा (राजाच्या, मंत्र्याच्या, मालकाच्या वगैरे) ; एकमुखी. २. एका विचाराचे; पक्षाचे; एकमत झालेले. (वा.) **एकमुठी घालणे** – एकमताने, एकत्र जाणे, वागणे.

एकमुठीने क्रिवि. एकाच्याच हाताने; एकाच वेळी : 'पेरण्या एकमुठीने झाल्या नाहीत.' – गार ३०.

एकमुठीने असणे एकत्र, किंवा एकजुटीने असणे : 'कोणास जाऊं देऊं नये एकमुठीनें सारें असावें.' – ऐलेसं ५५२

एकमुद्राक्षर न. कळफलकाच्या साह्याने प्रत्येक अक्षर साच्यातून स्वतंत्रपणे काढून त्यांची जुळणी करण्याचे यंत्र. एकाक्षर मुद्रणयंत्र. [सं.]

एकमुलाण न. एकमत.

एकमुस्त क्रिवि. एकमुठी; एकदम; एकरकमी : 'सर्व रकम एकमुस्त पाठविली असती तर पेंटीच्या मालकांसहि अंदेशा आल्यावाचून राहिला नसता.'– श्रमसाफल्य ५.३. [फा. यकमुश्त]

एकमुळा वि. एकटा; एकुलता; एकलकोंडा.

एकमुळी स्त्री १. एकच मुळी, एकच रोपटे. कुटुंबात एकच मूल जिवंत राहिले म्हणजे त्याला म्हणतात. (क्रि . राहणे) २. (शेतकरी लोकांत) गावातील एक धान्याचे पीक, शेत, लागवड; शेतकीचा एकच उद्योग.
वि. आपल्याखेरीज दुसऱ्या धान्याला जागा न देणारे (जोंधळा, गहू इ. पीक.)

एकमूल्य वि. (रसा.) संतृप्त उत्कर्षातून एक उज्ज परमाणू निःसारित केल्यानंतर राहणारा संयुक्त मूलक : 'संतृप्त उत्कर्षातून उज्जाचा एक परमाणू काढला असल्यास त्याचा एक अवयव असंतृप्त राहील व त्यास एकमूल्य म्हणता येईल.–' ज्ञाको क १३० [सं.]

एकमेक वि. परस्पर; अन्योन्य : 'एकमेकातें साटोपें लवूनियां विंधिती.' – भुवन ४.१९१. [एकचे द्वि.]

एकमेक, एकमेकाशी, एकमेकात क्रिवि. परस्परांमध्ये; एकमेकांबरोबर; आपआपसांत ; आपणांमध्ये; तुम्हामध्ये; त्यांच्यामध्ये.

एकमेकी स्त्री. मेळ, जम. (गो.)

एकमेव वि. एकच एक; केवळ एक. [सं.]

एकमेळ, येकमेळ पु. हिशेबातील जमाखर्चाचे आकडे जुळणे; मिळणी; ऐक्य; एकजूट; संघ; एकत्रपणा; सर्वांचा एक समूह; एकात एक मिसळून जाणे : 'तिसऱ्या किंवा धाकट्या आळीचा हक्क मागण्याला सर्व पुरुष एकमेळाने शिवारात जातात.' -गांगा.

वि. एकवट; एकत्र : 'प्रळय वन्हितुळ तेजाळ । कीं द्वादशादित्य येकमेळ ।' - मुआदि ५.२५.

एकमेळणी, एकमेळी क्रिवि. सर्व मिळून; एकत्र; एकजुटीने; समुदायाने : 'सच्चिदानंद एकमेळीं । तेचि त्रिवळीं ललाटीं ।' - एरुस्व १.६१.

एकमेळी वि. एकतर्फी; एककल्ली. (गो.)

एकमोडी वि. एकमार्गी; एककल्ली; एक प्रकारचा, स्वरूपाचा, जातीचा.

एकमोल न. एकमंगल; संकर; गोतमकाला. (को.)

एकमोली वि. एकसारखी किंमत असणारा (पदार्थ).

एकमोहरे क्रिवि. एकत्र; एकमार्गी. एका बाजूस वळलेले : 'मन धांवे सैरावैरा । मन मारूनि केलें एकमोहरा ।' - नाम २०२०.

एकयोनि-नी वि. एकाच आईपासून जन्मलेले; सख्खे (भाऊ). [सं.]

एकर पु. जमीन मोजण्याचे एक विशिष्ट माप. ४०४४.८६ चौरस मीटर म्हणजे एक एकर. [इं.]

एकरकम स्त्री. निरनिराळ्या बाबींची एकत्र बेरीज.

एकरकम, एकरकमी क्रिवि. एकदम; एका रकमेने; एकमुठी; एकठोक : 'एकरकमी पुष्कळ पैसा मिळविण्यास देशांतरीं फिरल्याशिवाय इलाज नाहीं.' - माप्र ९.

एकरक्तसंबंध पु. (वै.) सामान्यत: एकाच रक्तसंबंधापासून किंवा सारख्या पूर्वजांपासून निर्माण झालेल्या व्यक्तींचा किंवा प्राण्यांचा एकमेकांशीं असणारा संबंध. [सं.]

एकरदन पु. (एक दात असलेला) एकदंत; गणपती : 'उठोनि वेगी एकरदन । दिधलें सकळांशी दर्शन ।' - गणपतीची भूपाळी ६. [सं.]

एकरस वि. एकाच गोष्टीत सुख मानणारे, पावणारे; एका विकाराचे; एका भावनेचे; समरस.

पु. १. एकात्मता. २. (ल.) परब्रह्म : 'भेदु लाजोनि आवडी । एकरसीं देत बुडी ।' - अमृ १.९. [सं.]

एकरंग, एकरंगी वि. १. एकाच रंगाचा; दोन्ही बाजूंना एक रंग असणारा (पागोटे, सखलाद इ.). २. अंगावर एकच रंग असलेला; दुसऱ्या कोणत्याही रंगाचे ठिपके वगैरे नसलेला; निर्भेळ रंगाचा (घोडा). असा घोडा कुलक्षणी, अशुभलक्षणी समजतात.

स्त्री. न. १. सोंगट्यांच्या तिफाशी खेळातील डाव. प्रतिपक्षाची सही होण्यापूर्वी आपली सही होऊन डाव बसून पक्क्या सोंगट्या उठून गेल्या व नंतर कच्च्या सोंगट्या उठून जाण्यापूर्वी प्रतिपक्षाची सही झाल्यास त्याला एकरंगी असे म्हणतात. २. सख्य; स्नेह; अविरोध : 'नबाब मनसूफ व राव पंतप्रधान यांची कदीमापासोन दोस्ती व एकरंगी, जुदागी नाही.' - मइसा१९.८; 'पुत्रपौत्रपर्यंत एकरंग केलें.' - ऐटि २.८०.

एकराजक वि. एकराज्य; एकतंत्री, एकाच्याच सत्तेखाली असणारे; स्वसत्ताक (राज्यपद्धती) : 'सर्वांच्या तोंडीं लोकसत्ताक संस्थान चांगलें कीं एकराजक चांगलें हा वाद झाला.' -निमा ८३. [सं.]

एकराज्य न. एकसत्ता; एकतंत्री कारभार; एकाच्या हाती असलेली अनियंत्रित सत्ता; एकछत्री राज्य. [सं.]

एकरात्र क्रिवि. १. एका रात्रीचा काल; चार प्रहर; सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंत. २. संबंध दिवस, अहोरात्र, चोवीस तास व्यापून. [सं.]

एकराशि-शी, एकरास वि. १. एकाच राशीचे; ज्यांची रास एकच आहे असे. २.(ल.) एका गुणाचे, जातीचे, पक्षाचे; सारख्या मानाचे; एकसारखे : 'बायकोपासून ममीपर्यंत एकरास.' - फाटक नाट्यछटा. ३. एकाच राशीतील, संघातील, समूहातील (धान्य, पदार्थ इ.); एकजात. [सं.]

एकराष्ट्र न. समान वांशिक, भाषिक, ऐतिहासिक इ. घटक मिळून झालेला लोकसमूह. निरनिराळी वांशिक, सांस्कृतिक इ. पार्श्वभूमी असलेले पण एकाच राज्यात वास्तव्य करून असलेले लोक; या सर्वांचा मिळून झालेला देश: 'छप्पन देश मोडून त्यांचा एकजीव अथवा एकराष्ट्र होण्याचा समय आला आहे.' - लोटिकेले १.४७५. [सं.]

एकराष्ट्रीयत्व न. १. सर्व राष्ट्र (त्यातील सर्व लोक) एक आहे अशी भावना; राष्ट्राभिमान; राष्ट्रभक्ती. २. एकाच राष्ट्राचे नागरिक असल्याची जाणीव : 'एकराष्ट्रीयत्वाची भावना राष्ट्रात निर्माण झाल्यास स्वातंत्र्य काय लांब आहे?'- टिसू ३८. [सं.]

एकरूप वि. एका रूपाचे, आकाराचे; सदृश; समरूप; अविभक्त; न बदलणारे; अविकारी : 'जयजय देवैकरूप । अतिकृतकंदर्पसर्पदर्प ।' -ज्ञा १८.८. (क्रि. होणे.)

क्रिवि.१.एकसारख्या पद्धतीने; बदल न करता; तंतोतंत सारखा. २.यत्किंचितही; बिलकुल : 'तुजे भरवशावर मी आहे ही गुमराई एकरूप मनांत न आणिता सांगितलें' - होकै १६१. [सं.]

एकरूपता, एकरूपत्व स्त्री. न.अभेद; ऐक्य; एक होऊन जाणे; एकजिनसीपणा. [सं.]

एकरूप-रूपांतरण न.(ग.) एका संख्येचे किंवा पदावलीचे दुसऱ्या समान राशीमध्ये होणारे रूपांतर.

एकरूप सट (ग.) एकमेकांशी पूर्ण जुळणारी आकड्यांची मांडणी.

एकरूपीकरण न. १. एकत्रीकरण. २.समरूप, सारखे करणे. ३. संकर.

एकरेषीय रक्तसंबंध पु.(वै.) एकाच पूर्वजापासून क्रमाने झालेल्या संततीमधील रक्तसंबंध.

एकरोखी वि. १. एककल्ली; एकमार्गी; एकाच विषयाकडे चित्ताचा, मनाचा कल असणारा. २.एकाच (वरच्या) बाजूला वेलबुट्ट्या वगैरे भरतकाम केलेले आहे असे. (चीट, वस्त्र)

एकरोखी शिवार न. गावाच्या एकाच बाजूला असलेल्या जमिनी.

एकल वि. १. एकला; एकटा : 'एथ एकलेआ चालतां । भय नाहीं सर्वथा ।' - ऋ ७. २.(बैदुलाचा खेळ) एक या अर्थाने. [सं.]

एकल न. (संगीत) एकट्यानेच गाण्यासारखी किंवा वाजवण्यासारखी चीज; एकपाठी गायन वा वादन.

एकल काजा, एकल कांजा, एकल खाजी (गोट्या – बैदुलाचा खेळ) एक गोटी दुसरीला मारताना मोजण्याच्या कामी एक या संख्येबद्दल योजतात.

एकलकोंडा,एकलकोंड्या,एकलकोट,एकलटिका, एकलटुका, एकलटुरा,एकलनिपशा वि. एकांतप्रिय; एकटा राहणारा; माणूसघाण्या; समाजात न मिसळणारा : 'आदिवासी समाज जंगलात कोंडला गेल्यामुळे एकलकोंडा झालेला आहे.' – भाप्र २३१, मनमिळाऊ नसणारा. हा शब्द निंदाव्यंजक असा वापरतात.

एकलग वि. क्रिवि. १. एकीकडे; बाजूला असणारे. सलग याच्या उलट (घर, झाड इ.) २. सलग; एकास एक चिकटून.

एकलगी वि. एका लगीवर उभारलेले; एकपाखी. याच्या उलट दुलगी.

एकलतान स्त्री. गोट्यांचा एक खेळ : 'येथे मुलांना .... एकलतानीचा खेळ माहीतच नाही.' – गार १५२.

एकलपायी वि. जोडीदार, मदतनीस नसलेला; एकटा : 'एकलपायी कुणब्याने कुणबीक जितकी निभावता येणे शक्य होते.'... गांगा १५९.

एकल सट (ग.) एकचएक, एकाकी संख्या–मेळ.

एकलहरी वि. सापाची एक विशिष्ट जात. हा चावल्याने एक लहर येऊन मृत्यू येतो : 'मेष कुंजर जटिल एकलहरी । आज्ञा होतां घेती झुंझारी । टाळ मृदंग वाजता कुसरी । रागोद्धार करिती पैं ।।' – हरि ३४.१४९.

एकलक्षी वि. ज्यासंबंधी आदर किंवा काही हेतू आहे अशी एकच वस्तू डोळ्यांपुढे ठेवणारा; एकधोरणी; एकमार्गी. [सं. एक+लक्ष्य]

एकलंगी पेच पु. (मल्लविद्या) जोडीदाराच्या दंडावरून आपला हात घालून त्याचा हात आपल्या पाठीवर दाबून धरून जोडीदाराचा हात ज्याबाजूने दाबून धरला असेल त्याच आपल्या पायाने त्याच्या पिंडरीला आपल्या पिंडरीने व पायाच्या चौड्याने धरून आपली मान जोडीदाराकडे वळवून त्याला चीत करणे. फारसी भाषेत पिंडरीला लंग म्हणतात व हा डाव पिंडरीने करायचा असल्याने त्याला हे नाव पडले आहे.

एकलंगीची सवारी (मल्लविद्या) आपल्या एका पायाने जोडीदाराच्या पायात बाहेरून पाय घालून त्याच्या गुडघ्याच्या वाटीजवळ मांडीकडील बाजूला पाय घालून तोच आपला पाय आपल्या दुसऱ्या पायाच्या गुडघ्याच्या लवणीत घालून ज्या आपल्या गुडघ्याच्या लवणीत आपल्या पायाचा पंजा घातला आहे, त्या आपल्या पायाचा पंजा जोडीदाराच्या ढोणशिरेवर टाचेकडील बाजूला घालून त्याला चीत करणे.

एकला वि. १. एकटा; फक्त; केवळ : 'तरी अवधान एकलें दीजे ।' – ज्ञा ९.१. २. सामर्थ्यहीन; एकाकी. [सं. एकल]

एकलाग पु. अनुसंधान.

एकलाधी स्त्री. ऐक्य; एकमत; एकरूपता; एकबुद्धी : 'मग अहंकारासि एकलाधी । करूनि जिवितावधी । वहाविलें बुद्धि । – ज्ञा १३.४९.

एकलासी स्त्री. दिलजमाई; मैत्री; सलोखा : 'राजश्री चतुरसिंग भोसले रास्ते यांची एकलासी ' – ऐलेसं १४.७५५४. [फा. इख्लास्]

एकलि एकटीक अगदी एकटी : 'एकि बाइल एकलि एकटीक.'–गोप्र ४३.

एकलिंग न. पाच कोसांच्या परिघात असलेले एकमेव शिवस्थान. हे विशेष प्रतीचे सिद्धिस्थान समजले जाते. [सं.]

एकलिंगजी पु. मेवाडात उदेपूर शहरापासून एक मैलावर असलेले एक देवस्थान. हे देवस्थान मेवाडात फार प्रसिद्ध आहे. रजपूतलोक भेटीच्या वेळी 'जयएकलिंगजी' म्हणून नमस्कार करतात.

एकलोंब्या वि. एकच लोंबी असलेला(भाताचा, साळीचा एक प्रकार).

एकलौता, एकलौती वि. १. एकुलता–एकुलती; एकटा–एकटी : 'कां एकलौतिया बाळका । वरि पडौनि ठाके अंबिका ।' – ज्ञा १३.५०३. २. एकपुती; एक पोर असलेली : 'गुरु बहुतांची माये । परि एकलौति होऊनि ठाये ।' – ज्ञा १३.४१०. [हिं.]

एकवचन न. १. एकच बोलणे; न फिरणारे वचन. २. (व्या.) नामाच्या ज्या रूपावरून त्याच्या एकत्वाचा बोध होतो किंवा ज्या नामावरून एकाच वस्तूचा बोध होतो ते. [सं.] (वा.) **एकवचनात बोलणे** – अनादराने, एकेरी बोलणे; अरेतुरे करणे, म्हणणे.

एकवचन, एकवचनी वि. १. (व्या.) पदार्थाचे एकत्व दाखविणारा; एकवचनात असणारा. २. वचनाचा धड; बोलल्याप्रमाणे करणारा; सत्यप्रतिज्ञ.

एकवट क्रिवि. एकत्र; एका ठिकाणी; संयुक्त; सर्व मिळून; एकवटून; संमिश्र; एकंदर : 'रथ जोडिले एकवट । – एरुस्व ८.१४. [सं. एक+क. ओड्डो]

एकवटणे अक्रि. एकत्र होणे; गोळा होणे; मिसळणे; मिळणे : 'हे तिन्ही एकवटले । तेथे शब्दब्रह्म कवळलें ।' – ज्ञा १.२०.
सक्रि १. गोळा करणे; एकत्र करणे; जमविणे. २. मिसळणे; काला करणे.

एकवटा पु. १. एकवटलेली स्थिती, अवस्था; संयुक्तपणा. २. एकजूट; संघ, एकोपा; एकी; मिलाफ. ३. एकट्याचा जिन्नस; माल; घाऊक घेतलेला माल; एकवट्याचा, ठोक घेतलेला जिन्नस.

एकवडा, एकवढा वि. एकटा; एकला : 'मग नेणें बहु थोडें । न पाहे मागे पुढें । मार्गामार्ग एकवढें । करीत चाले ।।' – ज्ञा १८.३२५. २. एकेरी. ३. एकत्र केलेला.

एकवडे, एकवट वि. एके ठिकाणी – संयुक्त

एकवत न. १. (बायकी) एकभुक्त; उपास; उपवास. २. एकच पदार्थ खाऊन रहाण्याचे व्रत : 'अलोणी ताकभाताचे एकवत कीजे ।' – लीचपू ३३१. [सं. एकव्रत]

एकवत क्रिवि. एकत्र : 'कोठें नेणों हा फावला एकांत । सदा किलकिल भोवतीं बहुत । दोघे एकवत बोलावया मात । नाहीं लाज धरिली दिला हात वो ।।' – तुगा १११. [सं. एक +वृत्त्]

एकवद न. एकत्र; एकवाक्यता; ऐक्यता; एकवत् : 'एऱ्हवीं मध्योर्ध्व अध । हे नाहीं जेथ भेद । अद्वयासीं एकवद । जया ठायीं ।।' – ज्ञा १५.७३. [सं. एक +वृत्]

एकवर्ण पु. वर्णसंकर; जातिभेद न पाळणे; सबगोलंकार. [सं.]

एकवर्ण, एकवर्णी वि. एकरंगी; एक रंगाचा (बैल, गाय, पक्षी वगैरे).

एकवर्णसमीकरण न. १. (बीज.) समीकरणात अव्यक्त पद असते ते. जसे :– क्ष + अ = ३ ब,याच्या उलट अनेकवर्णसमीकरण. २. ज्यात अव्यक्तपदांचे प्रथम घात मात्र येतात ते. [सं.]

एकवर्णित्र न. (भौ.) एकरंगी प्रकाश प्रक्षेपित करणारे यंत्र, साधन उदा. सूर्यप्रकाशात हिरवा कागद धरल्यास सर्वत्र हिरवे दिसते.

एकवशी, एकवशास पहा : **एकोशी, एकोशास**

एकवसा पु. एकीकडील जागा; एकांतस्थळ; आडजागा. आडवळणी. [सं. एक+वस्]

एकवस्तुवाद पु. (तत्त्व.) सर्व विश्वातील विविध वस्तू, व्यक्ती, घटना एकाच वस्तूपासून निष्पन्न होतात असा सिद्धांत. [सं.]

एकवस्त्र, एकवस्त्रपरिधान, एकवस्त्रस्नान न. तीर्थाच्या ठिकाणी नवरा व बायको यांनी एकच वस्त्र नेसून किंवा दोघांनी तेच वस्त्र नेसून करायचे स्नान. हे तीर्थाच्या ठिकाणी पुण्यकारक मानले जाते.

एकवळा पु. १. एकोपा; ऐक्य; समूह; संघ; जमाव : 'नातरी अंवसेच्या दिवशीं । भेटली बिंबें दोनी जैशीं । तेवीं एकवळा रसीं । केला एथ ।।' – ज्ञा ११.५. २. मैत्री; स्नेह.

एकवंक न. एकनिश्चय; एकवाक्यता : 'याचेनि एकवंके जगासि वादु ।।' – ज्ञा १३.१६. [सं. एक+वच]

एकवंकी स्त्री. एकरूपता; भेदरहितता; सारखेपणा; एकत्व; तादात्म्य : 'मज एकवंकी याची स्थिती । आवडतु असे ।।' – ज्ञा ४.१२.

एकवंकी स्त्री. पायातील एक दागिना : 'निजपादिचेनि ओलें । सोनें पीका निगाले । तें एकवंकी सासिनलें । श्रीचरणक्षेत्री ।।' – ऋ ८७.

एकवंद न. एकमत; मतैक्य : 'एकवंद ऐसें जालें : जें हा वरु होए' – लीचपू ३२.

एकवंशता स्त्री. सपिंडता; सहजातसंबंध. [सं.]

एकवाक्यता स्त्री. १. एकमत; एकार्थ; एक निष्कर्ष (निरनिराळ्या पुस्तकांचा, वचनांचा, विधानांचा); ऐकमत्य. २. ऐक्य; मेळ; जूट : 'सर्व लोकांची, सर्व बाबतीत, सर्व विचारांची एकवाक्यता होणे कधीही शक्य नाहीं.' – लोटिकेले ३.२४६. [सं.]

एकवाट, एकवाटी वि.; क्रिवि. १. एकटा; एकत्र; संयुक्त; समरस : 'तयांमागें कुंजरथाट । गळां सांखळ्या एकवाट ।।' – एरुस्व ६.५२; दृश्य, द्रष्टा आणि दृष्टी । देखतां तिन्ही एकवाटी' – एभा २.३५८. २. एकदम : 'तैसें तें घनदाट । उठावलें एकवाट ।' – ज्ञा १.८९.

एकवाढ स्त्री. जेवणाराच्या पानात पुरेसे अन्न एकदम वाढून ठेवणे.

एकवादी स्त्री. एक वादी असणारी (चप्पल) : 'पट्ट्याचा लेंगा आणि शर्ट, पायात एकवादी ...' – वासू १४६.

एकवार क्रिवि. एकदा; एकवेळ.

एकवार्षिक वि. वर्षातून एकदाच होणारी. (वनस्पती, पीक, वस्तू इ.) [सं.]

एकविचार पु. एकमत; ठाम, निश्चित मत; निश्चय. [सं.]

एकविध वि. क्रिवि. १. एकाच तऱ्हेचा; एकाच प्रकारचा. २. (ल.) एकनिष्ठ (भक्त); सरळ; साधा : 'एकविध आम्ही न धरूं पालट । न संडू हे वाट सापडली ।' – तुगा ७५३. [सं.]

एकविधभाव पु. एकमत; एकविचार; एकभाव; ऐक्य; एकोपा.

एकविध रूपांतरण न. (ग.) एका संख्येचा किंवा संकेतचिन्हाचा त्याच प्रकारात होणारा बदल.

एकविधा भक्ति–क्ती स्त्री. एकाच देवतेवर असलेली श्रद्धा, भक्ती; एकाच ईश्वराची पूजा. [सं.]

एकविषयिका स्त्री. एकाच विषयावर तपशिलाने लिहिलेले पुस्तक, प्रबंध अथवा निबंध.

एकविषयोन्माद पु. (मानस.) एकाच विषयाचे वा वस्तूचे अतोनात वेड; एकाच विषयाच्या मागे लागणे, त्याचा ध्यास घेणे.

एकविसणी वि. एकदाच तापवून निवविलेले; चुलीवरून खाली काढून निवू दिलेले (पाणी).

एकवीरा वृत्ती स्त्री. एकावलंबित्व; कुटुंबात कर्ता पुरुष असला की तो मरेपर्यंत सर्व त्याच्यावर अवलंबून असून त्याला मदत करण्याची अगर त्याचे काम पुढे चालविण्याची वृत्ती नसणे.

एकवीस वि. २१ संख्या; २० अधिक १ ही संख्या.[सं. एकविंशति]

एकवेळ स्त्री. दिवसाच्या दोन (सकाळ, दुपार) भागांपैकी एक, सकाळ किंवा दुपार. [सं. एक+वेला]

एकवेळ पु. मरण.

एकवेळ, एकवेळा क्रिवि. १. एकदा; एकवार. २. एकदम. [सं. एक+वेला]

एकव्यसनी वि. एकमताचे; सारख्याच सवयीचे; एकाच राहणीचे (लोक इ.).

एकशक्तिवाद पु. (तत्त्व.) विश्वातील सर्व घटना एकाच शक्तीमुळे घटित होतात असे मत. [सं.]

एकशफ वि. अखंडखुरी; एकगेळी; खुराला भेग नसलेला (घोडा, गाढव इ.).

एकशय्या स्त्री. १. एकाच अंथरुणावर निजणे. २. (ल.) अतिस्नेह; दाट मैत्री; प्रेमाचे संघटन. [सं.]

एकशरीर वि. एका रक्ताचा, मांसाचा, हाडाचा; सपिंड; सगोत्र. [सं.]

एकशिवडा वि. काटकुळा; सडपातळ; किडकिडीत. (गो.)

एकशिवडा पु. नदीतील एक मासा.

एकशिसाल स्त्री. डोक्याचा एक भाग दुखणे; अर्धशिशी. (गो.)

एकशिक्षकी शाळा स्त्री.एका शिक्षकाने सर्व वर्ग चालवायचे या पद्धतीने चाललेली शाळा.

एकशिंगी वि. एकशिंग असलेला (पशू). [सं. एक +शृंग]

एकशी (एकृशी) वि. एकत्र केलेली; एकवटलेली : 'कमजादा पावतीचा हिशोब करून बरोबर एकशी पावती करावी.' – थोमारो २.१४३.

एकशीरफाल्त वि. शीघ्रकोपी, रागीट (एक +शिर+पोर्तुगीज फाल्त = उणे, इंग्रजी फॉल्ट = दोष). (गो.)

एकशेज क्रिवि. एका ओळीने; रांगेने; एकदंडाळी (बसणे, मांडणे वगैरे).

एकशेवडी वि. सरळसोट, बिनफांद्यांचे (झाड). (को.)

एकशेंगकापशी स्त्री. देवकापशीचे झाड. याच्या बोंडात एकच बी असते.

एकशौक्तिक न. मोती तयार करणारे एकशिंपली कालव. ही गोड्या पाण्यात असतात. [सं.]

एकश्रुति–ती वि. एकाच स्वरातील; एकसुरी : 'नाहींपेक्षा या एकश्रुति संगीतांत त्यांना इतकी गोडी वाटली नसती.' – छिप्र १५०.[सं.]

एकसडी वि. एकच टाहाळा, खांदी असणारा (हरभरा, तूर, मेथीची भाजी वगैरे).

एकसडी वि. एकदाच सडलेले, कांडलेले (तांदूळ).

एकसत्ताक वि. एकाच्याच हाती सर्व सत्ता असलेले (राज्य); एकराज्य; एकराजक. याच्या उलट लोकसत्ताक : 'एकसत्ताक राज्य असल्यास अप्रिय कायद्याच्या योगाने असंतोषजन्य बंड उत्पन्न होण्याचा संभव

असतो.'– लोटिकेले ४.९३. [सं.]

एकसमयावच्छेदेकरून क्रिवि. एकदम; एका काळी; एकाच वेळी.

एकसमयाविच्छिन्न क्रिवि. एकसमयावच्छेदेकरून : 'एकसमयाविच्छिन्न हल्ला करून मोठी लढाई होऊन पराजयातें पावविलें.' – ऐलेसं ७१३७.

एकसमात्र वि. एकाच उभ्या पातळीने दोन सारखे भाग करता येणारा (अवयव). उदा. घेवडा, वाटाणा.

एकसर पु. (बायकी) एकदाणी; एकावली; एकपदरीमाळ. [सं.]

एकसर, एकसरा, एकसरी, एकसरे क्रिवि. १. एका ओळीत, रांगेत, ओघात : 'पळते जाहले एकसरें ।' – रावि २७.९७. २.(ल.) एकदम; एकाचवेळी; एकाएकी : 'हाक दिधली महावीरीं । बाण सुटले एकसरी । – एरुस्व ८.४९. ३. पूर्णपणे; सर्वस्वी : 'तुटे संशयाचें मूळ । येकसरां ।।' – दास १.१.२८.

वि. एकसारखा; निव्वळ; निर्भेळ : 'तें ब्राम्हण एकसर साबडें । माणुस नेणें फुडें ।' – शिव २०४; 'होती देहबुद्धि एकसरी ।' – ज्ञा १०.२१. [क. सरि=साम्य] [सं. एक +सृ – सर]

एकसरणे अक्रि. १. अनुसरणे; एकदम पुढे सरणे; निष्ठा ठेवणे : 'रिगतां वल्लभापुढें । नाहीं अंगीं जीवीं सांकडें । तिये कांतेचेनि पाडें । एकसरला जो ।।' – ज्ञा १३.६०७. २. एकवटणे; एकत्र होणे : 'वाराया धांवे प्रभु तों एकसरोनि सर्व कोपानें । भोजांधक सात्यकिला वेष्टिति अत्यंत मत्त जो पानें ।' – मोमौसल १.५०. ३. एकीकडे सरणे; पाठीमागे पळणे; पाय काढणे. ४. एका बाजूला होणे; फितूर होणे : 'त्याचा यांचा सलामासलाम होऊन येकसरोन आमच्याच लोकावरी फिरले.' – पेद ३४.३७.

एकसरा पु. सराची माळ ;'प्रियेलागी एकसरा । म्हणौनि न बंधेचि दुसरा ।' – उह २६९.

एकसरी जोडणी (भौ.) ज्यामुळे सर्व विद्युतप्रवाह प्रत्येक भागातून त्याचे विभाजन न होता पार होईल अशा प्रकारे केलेली विद्युत्परिपथातील भागांची रचना.

एकसष्ट–सट वि. ६१ ही संख्या. [सं. एकषष्टि]

एकसष्टी स्त्री. एखाद्या व्यक्तीच्या वयाला साठ वर्षे पुरी झाल्याबद्दल करण्यात येणारा घरगुती धार्मिक विधी किंवा सार्वजनिक समारंभ.

एकसहा, एकसा क्रिवि. एकसारखा; अखंड; सर्रास : 'सुपीं तोचि संग घेईं धडपुडी । एकसा गधडी नास केला ।।' – तुगा २६१.

वि. समान; सारखा; एकाच प्रकारचा, जातीचा. [फा. यकसां]

एकसंघ एकसंङ्घ वि. (वन.) फुलातील सर्व केसरदलांचा एकच स्तंभ (जुडगा) असलेले (फूल किंवा केसरमंडल) उदा. जास्वंद.

एकसंध, एकसंधी वि. जोड किंवा सांधा नसणारे; तुकडा नसलेले; अखंड; बिनजोडी (भांडे, नाव, दगड, फळी, वस्त्र इ.); बळकट : 'पक्षनेतृत्व अधिक एकसंध झाले.' – रालो ९०.

एकसंस्थ वि. एका ठिकाणी असणारा; एकस्थानगत : 'कर्तबगारी व उंची एकसंस्थ झाल्याचे अब्राहम लिंकनचे उदाहरण...' – विविवृ २८.२.१९४०. [सं.]

एकसाथ क्रिवि. सर्वांनी मिळून; एकदम. [हिं.]

एकसान, एकसा वि. १. सतत; सारखा. २. अनन्य; एकनिष्ठ : 'धन्याची एकसान चाकरी केली हे सुकृत पदरीं आहे.' – ऐलेसं ४०९.[फा. यकसाँ]

एकसारखा वि. सदृश; साम्य असणारा; एकमेकांप्रमाणे (रूप, आकार, गुण वगैरे) असणारे.

क्रिवि. १. अखंड; न थांबता; सतत; एकसा; एकाच प्रकारे. २. एकाच क्रमाने. [सं. एक +सदृश]

एकसाली वि. एक वर्षाचा; एक वर्ष जगणारा; एक वर्षासंबंधी.

एकसाक्षिक वि. एक साक्षीदार असलेला; एकाने पाहिलेला. [सं.]

एकसांगी स्त्री. एकदा, फक्त एक वेळ सांगणे, आज्ञा करणे.

एकसांज क्रिवि. एक वेळ; एकदा (दिवसातून) : 'शाळेत सुमारे रोज तीन तास एकसांज द्यावे.' – गांगा १८८.

स्त्री. एक वेळ दूध देणे (गाईने).

एकसुईचा वि. शेंडा, बुडखा, देठ, डौल वगैरे एकाच प्रकारचे असणारे (नारळ, सुपारी, गहू, तांदूळ, मका वगैरे पीक); एकसोयीचा; एकसारखा; एकसडा.

एकसुती क्रिवि. एकाप्रकारे; एकसारखे; एकतंत्री; पूर्वीप्रमाणे; अखंड. [सं. एक+सूत्र]

एकसुरा वि. फटिंग; एकटा; कुटुंब, घरदार नसणारा; एकलकोंडा.

एकसुरी, एकसूर वि. एकच सुराचा; कंटाळवाणा; एकचएक; तोचतोच; ज्यामध्ये कधी फरक होत नाही असा : 'यशवंताला या एकसुरी जीवनाचा कंटाळा आला.' – हाकांध ४९.

एकसुरी उच्चारण न.आवाजात बदल न करता परत परत एखादा स्वर उच्चारणे; एकाच सुरात उच्चार करणे.

एकसूत न. एक रांग, पद्धत, रीत वगैरे; एक मासला; एक फरमा.

एकसूत्रता स्त्री. सुसंगतपणा.

एकसूत्रमणी पु. एकाच माळेचे मणी. म्हणजे सर्व सारखेच : 'रांगडे एकसूत्रमणि' – पेद ९.४८.

एकसूत्री वि. सुसंगत; निश्चित तत्त्वाला धरून असलेला. २. एकाच्याच मताने चाललेला. ३. एकाच सुतात ओवलेला. ४. एकच सूत्र, कलम असलेला; एककलमी.

एकसूत्रीपणा पु. सुसंगतपणा; निश्चित तत्त्वाला धरून असणे.

एकसैपाक पु. १. दिवसाचा एकच स्वयंपाक. २. सर्व घराचा एक स्वयंपाक.

एकसोईचा वि. एकनिष्ठ : 'तुमचा कारभार एकसोयीचा' – ऐलेसं ५२४.

एकसोय वि. एक बाजूला; व्यवस्थित; नीट; सोयीस्कर. (व.)

एकसोस पु. जीव, श्वास कोंडणे; आवाज बंद होणे (एखाद्या जोराच्या आवेगामुळे).[सं. एक+श्वस्] (वा.) **एकसोस धरणे** – कंठ दाटणे; गहिवरणे; बोलता न येणे; सद्गदित होणे.

एकस्तर कर (अर्थ.) वस्तूवरील विक्रीकराची आकारणी ही विक्रीच्या प्रथम स्तरावर किंवा अंतिम स्तरावर करणे. मूळ उत्पादन आणि अंतिम ग्राहक या साखळीत वस्तूंची विक्री अनेक स्तरांवरून होते. अशा वेळी प्रत्येक स्तरावर कर आकारण्यापेक्षा एकाच स्तरावर आकारणे हे महसूलप्रमाण, सोय, कार्यक्षमता या दृष्टींनी इष्ट असते.

एकस्पर्शरेषा गाठबिंदू पु.(भूमिती) दोन वक्र ज्या बिंदूत मिळतात तो बिंदू.

एकस्वाधिकार पु. (अर्थ.)एखाद्या वस्तूच्या उत्पादनाचा, एखाद्या

बोधचिन्हाचा, उत्पादित वस्तूच्या विशिष्ट नावाचा कायद्याने स्वाधीन ठेवलेला विशेषाधिकार.

एकहस्त भुजासन (मल्ल.) मल्लखांबाच्या बोंडावर बसून डाव्या हातावर डावा पाय घेऊन हात मागे मानेवर ठेवणे.

एकहात फुगडी स्त्री. मुलींचा एक खेळ.

एकहाती वि.एकाच्याच हाताने बनलेले, पार पाडलेले, चालविलेले; दुसऱ्या कोणाची लुडबूड नाही असा; एकतंत्री; एकसूत्री (कारभार, वहिवाट, काम इ.): 'पहिला एकहाती शब्दकोश फार ...'–पासंग२.

एकहारी वि. एकेरी; एकाच पंगतीत; बरोबरीने : 'हे चैतन्यासे शेजारीं । वसति ज्ञानाच्या एकाहारीं ।'– राज्ञा ३.२५१.

एकहेळा क्रिवि. सहज, एकदम. 'जाइजे वैकुंठी एकहेळा' – नाम ७१७. [क. हेळु=सांगणे]

एकळी स्त्री. एक काटेरी झुडूप.

एकंकार पु. १. जुळणी; जोडणी; मिसळणी. २. सर्व एक करणे; सरमिसळ; संकर : 'याप्रमाणे धर्मासंबंधें एकंकार करणारा हुकूम कलकत्याहून सुटला आहे.' – माप्र १६. ३. गर्दी; गुंतागुंत; गोंधळ; गोलंकार. पहा : **एकाकार**

वि. एकरूप; समान; एकसारखा; एकाकार : 'रावरंक समसमान उंचनीच एकंकारी.' – पला ६५.

एकंग पु. काठीचा खेळ : 'एकंग लकडी, फरीगदका, लाठीचे हात..(विद्यार्थ्यांकडून) करवून घ्यावी.'– संव्या ५२.

एकंदर स्त्री. न. १. एकत्र करणे; एकवट करणे; संमिश्र करणे; एके ठिकाणी आणणे; बेरीज; मिळवणी. २. स्नेह; सोबत; संगत; मैत्री. वि. क्रिवि. १. एकत्र; जुटीत; सहवासात; मिश्रणात : 'तरी वैराग्याचेनि आधारें ।जिहीं विषय दवडूनि बाहिरें । शरीरीं एकंदरें । केलें मन।।'– ज्ञा ५.१५१. २. एकरकमी सर्व; एकत्र करून; एखाद्या; एकूण. जसे : – एकंदर जमा– आकार, ताळा, पक्क, पट्टी; एकंदरीचा हिशोब– बेरीज–वही. ३. सर्व मिळून; ५. एकत्र; एका ताफ्यात: एकवट. ४. ठोक; एकूण; एकगट्टी; एकगोळा. पुन्हा पुन्हा करण्याचे कारण न ठेवता; एकवार; एकदाच (ताकीद, इशारा वगैरे). ६. (नकारात्मक) कधीही नाही; बिलकूल; केव्हाही अशक्य या अर्थाने : 'तू माझ्या घरी एकंदर येऊ नको.'= कधीही, केव्हाही येऊ नकोस.- पया ४८५. [सं. एकत्र]

एकंदर न. प्रत्यक्ष न होता परंपरेने झालेला, अप्रत्यक्ष संबंध, स्पर्श, विटाळ. [सं. एक+अंतर]

एकंदर गट पु.सर्व मिळून एकत्र; एकरकमी; एक जिनसी सर्व; एक जुटीने, मेळ्याने, समूहाने.

एकंदर भाव पु. सरासरी दर; किंमत.

एकंदर विक्री स्त्री. घाऊक, ठोक, एकदम, एकजिनसी विक्री.

एकंदर सरासरी स्त्री. बेरजांची सरासरी (एखाद्या मोठ्या हिशेबाच्या).

एकंदरी स्त्री. १. एकूण; गोळाबेरीज; सर्व मिळवणी; हाशील. २. सारांश; तात्पर्य. (गो.)

एकंदरीत – ने क्रिवि. शेवटी, अखेरीला; थोडक्यात; सारांश; सर्व बाजूंनी पाहिले तर.

एकंदरे वि. एकाग्र. पहा : **एकंदर**

एकंस्थान न. १. पाहिले स्थान (संख्यावाचनातील, एकं, दहं, शतं वगैरेपैकी). रकमेतील उजवीकडील पहिले स्थान हे एकंस्थान असते. २. एकमूल्य; एक प्रमाण; एकक; मूलमान : 'पाणी एकंस्थानी कल्पून म्हणजे विवक्षित आकारमानाच्या पाण्याचे वजन एक असे धरून तेवढ्याच आकाराच्या दुसऱ्या पदार्थांचे वजन त्याच्या कितीपट आहे हे काढितात.'– पदार्थव १.१२०. [सं.]

एका पु. १. (पत्ते, गंजीफा) एक संख्येचा, एक ठिपका असलेला पत्ता; एक्का; एक्क्या. २. (ल.) श्रेष्ठ पुढारी, माणूस; सर्वात अधिक कर्तबगार. ३. (वाद्य) एकताल; ठेका; ४. एकी; एकोपा; सख्य : 'दक्षिणचे सर्व दौलतदार यांचा एका जाला हें वर्तमान इंग्रजांस समजतांच बहुत विचारात पडून सर्द आहेत.'–मइसा १९.१०. [सं. एक]

एकाएक वि. एकटाच : 'पव्हे मार्कंडेयो एकाएकी ।'– राज्ञा ११.१८६.

एकाएकी वि. पूर्णपणे एक; भेदरहित : 'मी तूं म्हणतां वेगळे न हो । मुळीचे आहों एकाएकी ।।'– निगा १७८. [सं. एक–एकक]

एकाएकी क्रिवि. एकदम; अवचित; कल्पना नसताना; अकस्मात : 'मी तपासि गेलिया दूरी । एकाएकीं येईल झडकरी।।'– कथा १.४.५५. [फा. यकायक]

एकाकार १. भेसळ; सरभेसळ; मिसळ; खिचडी; एकरास. २. गोंधळ; गर्दी; बाजार. ३. गोलंकार; भिन्न गोष्टींचे एकीकरण; एकरूपता; संकर (निरनिराळ्या जातींच्या, दर्जाच्या लोकांचा). ४. ऐक्य; एकाकृती : 'मोडूनियां नामरूप मुद्रा । जीव आणिशी एकाकारा ।।'– एभा १९०८.

वि. १. सारखा कस, ओढा, प्रवृत्ती असलेले (मन, वासना इ.). २. अभिन्न; एका आकाराचे, रूपाचे, घडणीचे : 'जीव शिव एकाकार । तैसे मिनले दोन्ही अधर ।।'– एरुस्व १.५७. ३. एकाग्र; दृढ; एकनिष्ठ; स्थिर; निश्चल (मन). [सं.]

एकाकिया वि. पु. एकटा : 'वायु गुरू केला मियां : असे एकाकिया पवनु जैसा'– उगी २७९

एकाकी क्रिवि. एकाएकी ; अकस्मात; एकदम : 'तिसरे मजल्यावरूनि घातली उडी कारंज्यावरि । एकाकीं हालचाल न होतां गेलि वार्ता दुरवरि ।।'– ऐपो ३०८.

एकाकी, एकांकी वि. १. संगत, सोबत नसलेला; एकुलता; तेवढा एकच; एकटा; एकला : 'जैसें कां स्वप्न मोहा । तो एकाकी देखे बहुधा ।'– ज्ञा१४.८५.२.(बीज.)एकपदी.३.(शाप.)सलग (वनस्पतिशास्त्र); असंयुक्त; निर्भेळ (रसायनशास्त्र).[सं. एकाकितम्]

एकाकी गाठबिंदू (भूमिती) ज्याच्या सापेक्ष रेषा वक्ररेषेचे समीकरण पूर्ण करतात असा वक्ररेषेबाहेरचा बिंदू.

एकाकी पदार्थ (भौ.) मूलद्रव्य.

एकाकेच क्रिवि. एकरकमेने : '... रूपये तुमचे येतील एकाकेच सरकारातून अवघी बाकी देतील.'– होइसाखं १२.१७५.

एकाखडी वि. वर्णमालेतील एक एक अक्षर प्रत्येक चरणाच्या आरंभी घेऊन केलेले काव्य. (जसे :– कक, खख, गग) : 'एकाखडी बोला कशि गत झाली बाजीला । कक काशीबाई गहिंवरे । खख खबर गेली

पुनिया रे ।''– ऐपो १२. [सं. एक + अक्षर]

एकाग्र वि. एकतान; एकलय; एकाकडेच ओढले गेलेले (मन, अंतःकरण); एकाच विषयाला वाहिलेले; अचंचल; स्थिर. [सं.]

एकाग्रता स्त्री. एका गोष्टीत पूर्ण लक्ष.

एकाघायी क्रिवि. एका घावात; एका झटक्यात; एका वेळी; एका तडाख्यात.

एकाच नावेत क्रिवि. त्याच परिस्थितीत; त्याच सुखदुःखांना पात्र असे.

एकाची एक वि. एकमत; एकदिल. अनेक व्यक्तींच्या समूहाबद्दल योजतात.

एकाट वि. बाजूला पडलेला; ज्याचा इतरांशी संपर्क नाही असा : 'हे अत्याचार एखाद्या एकाट खेड्यात घडत.'– बंद १५.

एकाटणे अक्रि. एकवटणे; एक होणे. (वा.) **एकाटून येणे** – (जीव) कासावीस होणे. (व.)

एकाड, एकाठ वि. विचित्र; विलक्षण; चमत्कारिक; लहरी; स्वच्छंदी; एककल्ली. (को.)

एकाडा पु. महाराष्ट्रातील न्हावी लोकांची पंचायत.

एका तागडीची पारडी स्त्री.सारख्या कौशल्याच्या, गुणदोषाच्या (चोरांच्या, लबाडांच्या, खोट्यांच्या) जोडीला म्हणतात; समदुर्गुणी माणसे (निंदाव्यंजक); एका माळेचे मणी; पूर्णपणे सारखे.

एका ताटातला एकाच ताटात बसून जेवणारा; अतिशय घरोबा किंवा मैत्री असणारा; एकाच अन्नाचा (मित्र, सोबती); एका ताटी जेवणे.

एकात्म वि. एकजीव.

एकात्म अधिकारश्रेणी स्त्री. अधिकारपदाच्या महत्त्वानुसार क्रमवार एकत्र केलेली श्रेणीबद्ध व्यवस्था.

एकात्म करणे एकजीव करणे; एकभाव निर्माण करणे; भावनात्मक ऐक्य निर्माण करणे.

एकात्मक संविधान न. (राज्य). ज्या राज्यात सत्तेचे एकच केंद्र असते अशा एकमुखी किंवा एकात्म राज्याची घटना. अशा घटनेत मध्यवर्ती शासनसंस्थेत विभागांना भागीदारी नसते. इंग्लंड व फ्रान्स ही अशी राष्ट्रे आहेत.

एकात्मता स्त्री. १.एकपणा; अभिन्नपणा; एकरूपता; बाहेरून वेगळ्या वाटणाऱ्या गोष्टीमागील एकच मुख्य तत्त्व; तादात्म्य; 'उदकपणें पंडुसुता । तरंगाची एकात्मता । न मोडेचि जेवी ।।' – ज्ञा १८.११७१ २.समाजातील सर्व घटक एक होण्याची, समरस होण्याची क्रिया. [सं.]

एकात्मवाद, एकात्मकेश्वरवाद पु. एका परमात्म्यानेच सर्व विश्व व्यापले आहे, ईश्वर एकच आहे, त्या वाचून काही नाही असे मत; अद्वैतवाद. [सं.]

एकात्मीकरण न. भिन्न भिन्न, धार्मिक, वांशिक अगर भाषिक गटांचे एकरूप होणे; वेगळेपणाचा लोप होणे.

एकादश वि. १. अकरा ही संख्या. २. अकरावा : 'आतां यावरी एकादशीं । कथा आहे दोन्ही रसीं ।' – ज्ञा ११.१.३. भागवताचा अकरावा स्कंध : 'कोणी एकादश केला।'– मुक्तेश्वरकृत एकनाथाची आरती.[सं.] (वा.) **एकादशस्थानी असणे –** अतिशय स्नेहभावाने असणे; जीवश्च कंठश्च असणे.

एकादशनी स्त्री. कोणत्याही मंत्राचे अकरा वेळा आवर्तन; विशेषतः रुद्राची अकरा आवर्तने, यांत नमक अकरा व चमक एक वेळा म्हणतात.(विरू.) एकादसणी. [सं. एकादश]

एकादश भाव पु. (ज्योति.) कुंडलीतील ११वे स्थान. याला आय, लाभ असेही म्हणतात.

एकादश रुद्र पु. शिवस्वरूप अकरा देव. पहा : **अकरा रुद्र**. या अकरा रुद्र देवतांची साधारण नावे अशी – वीरभद्र, शंभू, गिरीश, अजैकपात्, अहिर्बुध्न्य, पिनाकी, अपराजित, भुवनाधीश्वर, कपाली, स्थाणू व भव.

एकादशी स्त्री. शुक्ल व वद्य पक्षाच्या प्रतिपदेपासून अकरावी तिथी. हिचे स्मार्त आणि भागवत असे दोन प्रकार आहेत. ज्या वेळी दोन दिवस एकादशी असते त्यावेळी पहिली स्मार्त आणि दुसरी भागवत असे धरतात. दर महिन्यातील शुक्ल आणि कृष्ण पक्षातील एकादशीची जी निरनिराळी नावे आहेत ती अनुक्रमे पुढीलप्रमाणे – चैत्र–कामदा, पापमोचनी; वैशाख – मोहिनी, वरूथिनी; ज्येष्ठ – निर्जला, अपरा; आषाढ – शयनी, योगिनी; श्रावण – पुत्रदा, कामिका; भाद्रपद – परिवर्तिनी, अजा; अश्विन –पाशांकुशा, इंदिरा; कार्तिक – प्रबोधिनी, रमा; मार्गशीर्ष – मोक्षदा, फलदा; पौष – प्रजावर्धिनी, सफला; माघ – जयदा, षट्तिला; फाल्गुन – आमलकी, विजया. [सं.] (वा.) **एकादशी घडणे** – एकादशी नसून उपास करावा लागणे; खायला न मिळणे.

एकादशीवात स्त्री. चार बोटांच्या रुंदीवर २५० फेरे घेऊन (५००सुताची) कापसाची एक वात तयार करतात. अशा दोन वाती आषाढी एकादशीपासून एक वर्षभर एकादशीला लावतात.

एकादा– एकाध– वि. कोणीएक; एखादा: 'तेवीचि एकाधा प्रासादु । कां करावा अश्वमेधु ।।'– ज्ञा १४.२३०.

एकाधा क्रिवि. एकदा :'एकाधा कापडवीये आसन होए' – लीच १.४९.

एकाधिकार पु. कुलमक्ता; एकाच व्यक्तीच्या, संस्थेच्या हातात अधिकार, सत्ता असणे; एखाद्या बाबतीत एकाच व्यक्तीला सर्व अधिकार देऊन इतरांना मना करणे; पूर्ण ठेका :'नवीन मनूंत कै. गणपतराव यांच्याइतका वाकबगार नट एकहि नसल्याकारणाने त्यांच्या नाटकांचा एकाधिकार म्हणजे मोनापली नसतांहि त्यांची नाटकें कोणीच करण्यास धजत नसत.' – गणपतराव जोशी २०९. [सं.]

एकाधिकार खरेदी एखाद्या संस्थेस, व्यक्तीस, विशिष्ट वस्तू खरेदी करण्याचे सर्व अधिकार असणे. इतरांस ती खरेदी करण्यास मनाई असणे. सामान्यत: जनतेस आवश्यक अशा वस्तूंची किंवा शेतकऱ्याला रास्त भाव मिळावा म्हणून शासन अशा वस्तू, धान्य इ. खरेदी करते.

एकाधिकार प्रमाण (अर्थ.) विशिष्ट वस्तूचे उत्पादन व विक्री याविषयी असलेल्या अधिकाराचे प्रमाण.

एकाधिकारी पु. एखाद्या वस्तूच्या निर्मितीचा, विक्रीचा व इतर व्यवहाराचा पूर्ण अधिकार असलेली व्यक्ती.

एकाधिकारी भांडवलशाही (राज्य.) भांडवलशाहीच्या विकासाची विशिष्ट अवस्था. या अवस्थेत उत्पादनाची व वितरणाची सर्व व्यवस्था

काही थोड्या मोजक्या भांडवलदारांच्या किंवा परस्परावलंबी महामंडळाच्या हाती केंद्रीत होऊन औद्योगिक क्षेत्रातील त्यांचे इतर लहान प्रतिस्पर्धी अस्त पावतात.

एकानएक, एकानेक क्रिवि. झाडून सर्व. पहा : **एकूणएक**

एकानुसंधानी वि. एक अनुसंधान, ध्येय, उद्देश असणारा; एकावधानी; एकदृष्टी; एकदेशी. [सं. एकानुसंधान]

एकान्न न. १. एक जेवण; दिवसातून एकच वेळ जेवून राहणे. २. एकधान्य; कोणत्यातरी एका धान्यावर राहणे. ३. एकत्र जेवणखाण करणे. (कर.)

एकापक्ष, एकापक्षी क्रिवि. एका अर्थी; एका बाजूने, दृष्टीने.

एका पायावर तयार असणे अत्यंत उत्सुक असणे.

एकापासोळीचा, एकाफासोळीचा वि. लुकडा; रोड; अशक्त. याच्या उलट दुहेरी हाडाचा, लंगर हाडाचा.

एकामतीएकाजती क्रिवि. करार करणाऱ्या सर्व व्यक्तींवर व्यक्तिश: व सामुदायिक बंधनकारक होईल अशा रीतीने.

एकामी, एकामे क्रिवि. १. विराम न घेता; इतर काहीही न करता; ताबडतोब; सर्व उरकून; आटपून; एका झटक्यात; दुसरीकडे न वळता (उरकणे, सुरू करणे, करणे). २. एकदाच; पुनरावृत्तीची वेळ येणार नाही अशा प्रकारे (जाणे, करणे). ३. एकदम; सर्व मिळून; एकत्र; एका वेळी; युगपत्; (येणे, जाणे, करणे) :'वर्षति एकामेंचि प्राणहर प्रखरनैकशस्त्र गणीं ।' – मोकर्ण (पराडकर प्रत) १९.२१.

एकामेळी क्रिवि. एकत्र.

एकायतन न. १. एकस्थान; एकमेव ठिकाण; अधिष्ठान; आश्रयस्थान :'जे तपोतेजाचिया राशी । कीं एकायतन ज्ञानासी ।' – ज्ञा ४.६२. २. (ल.) ब्रह्म. [सं.]

एकार पु. रस्त्याची (दुसरीपेक्षा) उंच असणारी बाजू; एका बाजूला उंचवटा असणारा असा रस्ता. (व.)

वि. १. (ओझ्यामुळे) एका बाजूला कललेला, खचलेला. २. एककल्ली (माणूस).[सं. एकीकृत; एक+कार.] (वा.) **एकार जाणे, एकार होणे, एकार कलणे** – एकीकडे खचणे; खाली येणे (जनावराच्या पाठीवरील ओझे, गलबत, होडी); झोक जाणे; पुढे येणे. (वा.) **एकार बसणे** – १. कलून, रेलून बसणे. २. (ल.) अलग राहणे; बाजूला राहणे; एकीकडे बसणे.

एकारणी स्त्री. पहिली नांगरणी. [सं. एक]

एकारणे अक्रि. १. एकांगी बनणे; एकाच बाजूचा विचार होणे :'आमचे वाङ्मय लष्करी शिस्तीत जणू एकारले.' – नप्रप्र ९५. २. (ओझे अधिक झाल्यामुळे) एकीकडे झुकणे, कलणे, दबणे; (गोणी, पडशी, गलबत यांचे) एक अंग खाली येणे. ३. गुंतागुंत होणे; सर्व एक होणे; एकवटणे (दोरी इ.) ४. एकीकडे फुगणे; खाली येणे; लोंबणे; मोठे होणे (वृषण इ.).

सक्रि. एकत्र करणे; रास करणे; गोळा करणे.

एकारत, एकारती स्त्री. एका वातीचे, आरतीचे निरांजन. [सं.]

एकारलेपणा पु. एकाच पक्षाला, धर्माला, बाजूला, मताला प्रमाणाबाहेर महत्त्व देणे, असणे; एकांगी दृष्टिकोन असणे :'हिंदुस्थानात जातीयवाद, अलगपणा ... एकारलेपणा यांना स्थान राहणार नाही.' – नौतेने २२५.६.

एकारी स्त्री. एक चाकोरी खोल असलेला रस्ता; एका बाजूने उंचवटा असणे :'अधूनमधून एकारीचा रस्ता लागला होता.' – पेरणी २०.१. पहा : **एकार**

एकार्णव पु. कल्पांतीचा जलप्रलय; प्रलयकाळी सर्वत्र पाणीच पाणी होऊन झालेला महासमुद्र : 'जो एकार्णवातेंही जिरवी ।'– ज्ञा १०.२७१. २. एक जमाव; एक घोळ; अनेक लोकांचा जमलेला समूह, ज्यामध्ये जातगोत वगैरे भेद करता येत नाही असा. [सं.]

एकावटणे अक्रि. एक होणे; एकत्र येणे; संघटित होणे :'हे मार्ग तरी दोन्ही । परी एकवटतीं निदानीं ।' – राज्ञा ३.३८.

एकावद स्त्री. कीर्ती :'तेणें कोळियें त्रिजगती । एकावद केली ।।' – राज्ञा १८.१७०९.

एकावदी स्त्री. ऐक्य :'मग अहंकारेंसिं एकावदी । करूनि जीविता अवधी ।' – राज्ञा १३.५०.

एकावन, एक्कावन्न वि. ५१ ही संख्या; पन्नास आणि एक मिळून होणारी संख्या. [सं. एकपंचाशत्]

एकावयवी (भाषा) एकच अवयव (उच्चारणक्षमता) असलेला (शब्द.)

एकावली स्त्री. १. एक अर्थालंकार; पदांची श्रेणी. यांत पहिल्या वस्तूशी दुसऱ्या वस्तूचा, दुसरीशी तिसरीचा असा साखळीप्रमाणे विशेषणरूप संबंध असतो :'राज्यांत समृद्ध पुरें, उंच पुरांतिल गृहें, गृहात जन। उद्योगशील सारे, उद्योग स्तुत्य देति विपुल धन ।।' (यात राज्य, पुरे, गृहे, जन, उद्योग आणि धन अशा सहा पदार्थांची एक श्रेणी.) – अर्थालंकारांचे निरूपण १७९. २. पहा : **एकावळी** :'नवरत्नांचें देवाचें पदक आणखी एकावली कोठें आहेत?' – नाना ८३.[सं.]

एकावळी स्त्री. गळ्यातील एक अलंकार; एक पदरी माळ; कंठा, हार: 'जेथ अहंकारा उरवी जाहली । एकावळीची काढली । दोरी जैसी ।।' – ज्ञा १३.५३१. [सं. एक+आवली]

एकाश्म वि. अखंड दगडाचा, एकाच दगडाचा (खांब). [सं.]

एकासणे सक्रि. ग्रासणे :'लोटे एकासिलें उदक' – एभा ११७७.

एकासरे क्रिवि. एका पद्धतीने, वृत्तीने :'तुका म्हणे तरे । भवसिंधु एकासरें ।' – तुगा १९७०.

एकासीती संख्या वि. एक्याऐंशी :'एकासींती प्रकारी.' – गद्य २४९.

एकाह पु. एक संबंध दिवस; चोवीस तास. [सं.]

एकाहत्तर वि. ७१, सत्तर अधिक एक ही संख्या. [सं. एकसप्तति]

एकाहार क्रिवि. १. एकीकडे; अलग; पृथक (होणे, असणे). २. एकाजवळ (अनेकांपैकी) असणे; एकाच्या ताब्यात. [सं.]

एकाहार पु. एक ओळ, पंक्ती; ऐक्य :'उबगला आर्दी एकाहारा । येवों पाहें ।।' – ज्ञा १८.२९१.

एकाहारठी, एकाहारसून क्रिवि. वि.एकीकडून; एका शेवटाकडून; एका बाजूने. (कु.)

एकाहारी वि. एकाच ओळीतला; सारख्याच योग्यतेचा :'चारुस्थळी एका हारी । एकांगाची ।।' – अमृ १.२.

एका हिशेबी क्रिवि. एका अर्थी; एका प्रकारे; एकांशी.

एकाक्ष वि. एका डोळ्याचा; एकडोळ्या; एका डोळ्याने आंधळा. पु. (ल.) १. कावळा. २. शुक्राचार्य. [सं.]

एकाक्षर, एकाक्षरी वि. एका अक्षराचा; एक अक्षर असलेला. जसे :- एकाक्षरी कोश. [सं.]

एकाक्षर यमक (अलंकार) श्लोकाच्या सर्व चरणात अखेरीस येणारे समान एक अक्षर. उदा. स्वजन गवसला तो त्याजपाशी नसे तो । कठिण समय येता कोण कामास येतो ।' रनल

एकांक पु. लीळाचरित्रातील चक्रधरस्वामींच्या एकाकीपणाचा कालखंड.

एकांककार पु. सर्वांना सारखे करून टाकणे; बरीवाईट वैशिष्ट्ये नष्ट करून टाकणे; सबगोलंकार.

एकांकिका स्त्री. एक प्रवेश किंवा एक अंक असलेले नाटक. [सं.]

एकांकिता स्त्री. एकटेपणा :'तोडुनि आसेचे सूत्र : साधावी एकांकिता.' – मूप्र २३८०.

एकांग न. एक अंग, अवयव.
वि. पहा : **एकांगी**

एकांग झुंज द्वंद्वयुद्ध; दोघांचे युद्ध :'एकांग झुंजें झुंजती । एकमेकां निकरेंसीं ।' – मुआदि ४४.७२.

एकांगबाजी स्त्री. पट्ट्याच्या कसरतीपैकी एक. यात फक्त एकाच हातात पट्टा किंवा तलवार घेऊन हात करावयाचे असतात.

एकांगवीर पु. १. अनुयायी, सैन्य किंवा कोणी मदत नसलेला; मदतीची अपेक्षा न करणारा; कोठल्याही सैन्यपथकात सामील नसलेला; एकांडा वीर. काश्मिरातील राजतरंगिणीत 'एकांगवीर' या लढाऊ कामगाराचे वर्णन येते. पहा : **एकांड्या** :'सन्नद्धकरितां दळभार । येथें लागेल उशीर । मी एकला एकांगवीर । भीमकी घेऊनि येईन ।।' – एरुस्व ५.१. २.(ल.) वादात कोणाची मदत न घेता एकटाच स्वसमर्थन करणारा :'पांचही दर्शनांशीं झुंजार । हा वेदांतासि साजे बडिवार । जो एकांगवीर । ख्यातिवादियां ।।' – विसिंपू ७.१४. ३. कोणाच्या मदतीची अपेक्षा न करणारा, धाडसी, उत्साही माणूस. [सं.]

एकांगी वि. १. एकाच बाजूला सुंदर रंग, बेलबुट्टी वगैरे असलेले (चीट, रेशीम, मलमल, कापड इ.) २. एकालाच पुरेसा (पलंग, चटई इ.). ३. एकच गुण, बुद्धी, व्यवहार, ज्ञान इ. असलेला; एकदेशी; एकाच बाजूकडे लक्ष देणारा; दुसरी बाजू न पाहणारा. ४.कृश; सडपातळ; बारीक.(राजा.) [सं.]

एकांगी स्त्री. द्वंद्वयुद्ध; पृथक्‌युद्ध :'समागमें दहापंधरा तोफा घेऊन आपली फौज सोडून एकांगीस यावें याजप्रमाणें बाहेर आले.' – भाब १३४.

एकांगी स्त्री. १. तरवारीच्या खेळातील एका हाताचे नाव. २. धाडस : 'तुम्ही भेटीस येऊन हिंमत धरून एकांगी करून कार्य संपादणे.' – मदरू १.२७.

एकांगी खण एक बाजू चांगली असणारा चोळखण. उदा. मुंग्यांचा खण.

एकांगी घर एकाच बाजूला उताराचे छप्पर असलेले घर; एकपाखी घर.

एकांगी झाड एका बाजूला वाढणारे, फुटणारे झाड.

एकांगी पान एकाच बाजूला चांगले असणारे (विशेषत: केळीचे किंवा विड्याचे) पान.

एकांगी भांडण ज्यात एकच पक्ष भांडत आहे असे भांडण; भांडणातील एका बाजूची कैफियत.

एकांगी होणे एकट्याने धाडसाने पराक्रम करणे :'येक आंगी वीर होऊन इंग्रजांचे पारपत्य यांजकडून पडणें दिसत नाहीं.' – हिंदखं २.७८.

एकांगुळ वि. एक डोळा गारोळा आणि एक पांढरा असणारा (घोडा); एक मंडलिया. ही एक घोड्याची खोड आहे – अश्वप १.९४.

एकांडा पु. एकटा स्वार :'नित्य नवे गणतीस लागती एकांडे देशावरले.' – प्रभाकर-खड्र्याचा पोवाडा.
वि. इतरांत न मिसळणारा; एकटा राहणारा; अगदी एकटा: 'कुणबिकीच्या कामात एकांडा माणूस निरुपयोगी असतो.' – काआ ७१.

एकांडा शिलेदार स्वत:च्या हिंमतीवर सर्व काही करू पाहणारा; दुसऱ्याचे सहकार्य न घेणारा कार्यकर्ता, राजकीय पुढारी इत्यादी.

एकांडेपणा पु. अलगपणा; एकलकोंडेपणा; फटकून वागणे :'मुंबईच्या नेमस्त प्रांतिक कमिटीच्या एकांडेपणाचा तीव्र निषेध करून... काँग्रेसचे द्वार सर्व राजकीय पक्षांस यामुळें मोकळें झालें.' – लोटिकेले ३.३३१.

एकांड्या पु. १. ज्यांचे अंड विभागलेले न दिसता एकच दिसते किंवा ज्यांचे अंड एका बाजूला लोंबत असते असा घोडा. असे अंड असणे हे एक अशुभ लक्षण समजतात. – अश्वप १९६. २. पहा: **एकांगवीर** कोणत्याही पलटणीत सामील झालेला नसून स्वतंत्रपणे लढणारा; स्वतंत्र शिलेदार; शूर, धाडसी पुरुष :'नित्य नवे गणतीस लागती एकांडे देशावरले.'– ऐपो २१६. ३. एकटाच काम पार पाडणारा; दुसऱ्याची मदत न घेणारा (हरदास, गवई इ.) [सं.]

एकांत पु. १. खाजगी जागा; गुप्त जागा; वर्दळीपासून अलिप्त असलेली जागा; कोणाचा उपद्रव होणार नाही असे स्थळ; निवांत स्थान :'बहुतकरूनि एकांतें । बैसिजे गा ।।' – ज्ञा ६.१८०. २. निश्चित स्थान; कायम स्थान :'जें आकाराचा प्रांतु । जें मोक्षाचा एकांतु ।' – ज्ञा ६.३२२. ३. खाजगी मसलत; खलबत; एकीकडे विचार; गुजगोष्ट. लोकांत याच्या उलट.[सं.] (वा.) **एकांत करणे –** १. खलबत, गुजगोष्टी करणे :'नळें तुजशीं एकांत काय केला' – नल ११७. २. एकांतात, एकमेकांच्या सहवासात असणे; अगदी सलगी करणे; एखाद्याजवळ एकटे राहणे :'सुशीलेनें काफशीं एकांत केला व तेथें ती त्याच्या अगदी जवळ बसली.' – सुदे २३०.

एकांत कोठडी एकीकडची, निर्जन खोली (तुरुंगातील तळघर वगैरे); अंधारी; अंधाऱ्या कोठडीत कोंडण्याची स्थिती; एकांत तुरुंगवास.

एकांतर–रा वि. एक सोडून एक असे; एक दिवसाआड (ज्वर).
न. एक दिवसाआड जेवण्याचे व्रत; धरणेपारणे :'अथवा एकांतरा कृच्छ्री । चांद्रायणें मासोपवासीं । शोषोनि गा धातुराशी । करिती तपें ।।' – ज्ञा १७.३६४. [सं.]

एकांतर खंड (भूमिती) (वर्तुळाचे वगैरे) एकाआड एक असे विभाग.

एकांतरित गट (ग.) एकाआड एक असे आकडे घेऊन केलेला गट.

एकांतिक वि. १. परब्रह्मी लीन; ब्रह्मरत. २. अतिरेकी; दुसऱ्या बाजूकडे पूर्ण दुर्लक्ष करणारा. [सं.]

एकांतिक धर्म ज्यात विष्णू हाच अंत म्हणजे अंतिम तत्त्व मानला जातो असा भागवत धर्म :'हा भागवत किंवा नारायणीय धर्म त्यासच सात्वत किंवा एकांतिक धर्म अशी दुसरी नावे आहेत.' – गीर.१०.

एकांतिकपणा पु. एकाच गोष्टीची अतिशयितता; अतिशयोक्ती: 'एकांतिकपणा हा विनोदात हृद्य असला तरी तो शास्त्रात हृद्य न होता उव्देगजनक होतो.'- के १४.५.४०

एकांतिक राज्यघटना मध्यवर्ती कायदेमंडळाचा सार्वभौम अधिकार व तदितर गौण विभागांना अधिकाराचा अभाव; सार्वभौमाधिकार अविभक्त असून मध्यवर्ती संस्थेखेरीज इतर कोणालाही कायदे करण्याचा अधिकार नसणे.

एकांती क्रिवि. खाजगीत; गुप्तपणे.

एकांती लोकांती क्रिवि. खाजगी व सार्वजनिक रीतीने. क्वचित एकांत लोकांत असाही प्रयोग करतात. (वा.) **एकांती लोकांती सांगणे** - एकीकडे व प्रसिद्धपणे, चारचौघांत सांगणे.

एकांशिक, एकांशी वि.एका भागासंबंधी; एकांगी; मर्यादित स्वरूपाचा; विशिष्ट विषयापुरता; संकुचित [सं. एकांश]

एकांशी क्रिवि. काहीसे; एका तऱ्हेने; एका बाजूने; एका बाबतीत.

एकिहेळा क्रिवि. १. एक वेळ; एकदा :'ते एकिहेळां घे पां आपवें ।' - ज्ञा ९.२९९. २. एकदम; अकस्मात् :'हें लटिकें केवीं म्हणिजें । एकिहेळां ।।' - ज्ञा ४.३९.[एक + हेळा; तुल. प्रा. हेला= शीघ्रता.]

एकिंदा पु. एकी; ऐक्य; सख्य; मैत्री; जूट :'मुख्यांचा एकिंदा साबित आहे. विलग पडणार नाही.' -मइसा १०.१२१. [सं. एकता]

एकी स्त्री. १. ऐक्य; सख्य; मैत्री; स्नेह; गट्टी; एकमेळ; एकदिल. २. अभेद; अद्वैत; अविभक्तता (हेतू, भाव, हित, उद्योग यामधील). ३. (एकीबेकी खेळात) विषम संख्या. ४. लघ्वी; मुतणे; लघुशंका. शाळांतून विद्यार्थी लघ्वीला जाताना परवानगी मागताना (एक बोट दाखवून) म्हणतात. ५. एक याचे अनेकवचन :'एकी म्हणती काय झालें?' - राजवाडे ग्रंथमाला. [सं. एक]

एकी क्रिवि. एकाने गुणून. उदा. एक एकी एक. पाच एकी पाच पाढ्यात म्हणतात.

एकी शअ. बाबतीत :'सगळं गाव म्हणतं मास्तर यळंला येतो; मग माझ्याएकीच का असं?' - बनगर ४१.

एकीकडचा, एकीकडील वि. एका बाजूचा, (दिशेचा, भागाचा वगैरे) मुख्य रस्त्यापासून लांब असलेला.

एकीकडून, एकीकडने क्रिवि. १. एका बाजूने, दिशेने, भागाने; एका बाजूला, अंगाला, भागाला. २. एकदम सर्व मिळून; एकंदर सगळे.

एकीकडे, एकीकडेस क्रिवि. १. अनेक कडा, बाजू यांतून एका ठायी, एका अंगी. २. एका बाजूला. पहा : **एकीकडून** १. ३. बाजूला; वहिवाटीच्या रस्त्यापासून दूर; लांब; पलीकडे. ४. (ल.) प्रस्तुत भाषणादींचा प्रस्तावक्रम, त्यापासून अलग, दूर.

एकीकरण न. १. संमिश्रण; संकलन; मिश्रण, एक करणे; मिलाप करणे. २. अभेद; अद्वैत; एकाकार; एकरूप; ऐक्य. [सं.]

एकीकाष्ठा क्रिवि. एकत्रपणे; तौलनिक पद्धतीने विचार करून; पराकाष्ठेने विचारदृष्ट्या; तात्त्विकदृष्ट्या :'तैसें दृश्य कां द्रष्टा । या दोन्ही दशा वांझटा । पाहतां एकी काष्ठा । स्फूर्तिमात्र तो ।।' - अमृ ७.२४४. [सं. एक+काष्ठा =दिशा, सीमा]

एकीन स्त्री. खात्री; विश्वास; दृढमत :'व -वाजिबी ताकीद होईल हे एकीन समजोन.' - मइसा १५.१५२. [फा. यकीन]

एकीबेकी स्त्री. १. बायका-मुलांचा समविषम ओळखण्याचा एक खेळ. (सरी ब्यस्सा खेळ, सम विषमांकांचा खेळ) यात मुठीत पैसे वगैरे घेऊन दुसऱ्याला ते सम आहेत की विषम आहेत असे विचारतात, त्याने सांगितलेले (मोजून पाहता) खरे ठरले तर मुठीतील सर्व पैसे इ. त्याला द्यायचे, खोटे आल्यास दुसऱ्यापासून तितके आपण घ्यायचे. 'एकीबेकी पोरा सांग झडकरी' - भज ११४. २. जूटफूट; समेट आणि भांडण.

एकीभवन न. दोन किंवा अधिक पदार्थ एकजीव होणे; पूर्णपणे मिसळणे; संकलन; संमिश्रण; एकीकरण. २. (समाज.) दोन संस्कृती, समाज यांचे एकीकरण. [सं.]

एकीय वि. एकटा; एकला; एकासंबंधी. [सं.]

एकीसवा क्रिवि. १. एकसारखा; एकत्र. २. एका बाजूला; एकीकडे :'सकळहो तुम्ही व्हा गे एकीसवा । तुका म्हणे जीवा धीर नाहीं ।' - तुगा २.

एकीहेळा क्रिवि. अकस्मात.

एकुटपणा पु. एकटे राहणे; एकाकी पडणे :'पण अशी एकुटपणाची वेळ त्याला (मेंढक्याला) क्वचित येत असे.'- बनगर२३.

एकुणऐंशी वि. (८०-१)=७९ ही संख्या. सत्तर आणि नऊ मिळून होणारी संख्या. [सं. एकोनाशीति]

एकुणचाळीस वि. (४०-१)= ३९ ही संख्या; तीस आणि नऊ मिळून होणारी संख्या. [सं. एकोनचत्वारिंशत्]

एकुणतीस वि. (३०-१)= २९ ही संख्या; वीस आणि नऊ मिळून होणारी संख्या. [सं. एकोनत्रिंशत्]

एकुणनव्वद वि. (९०-१)= ८९ ही संख्या; ऐंशी आणि नऊ मिळून होणारी संख्या. [सं. एकोननवति]

एकुनपन्नास, एकुणपन्नास वि. (५०-१)= ४९ ही संख्या; चाळीस आणि नऊ मिळून होणारी संख्या. [सं. एकोनपंचाशत्]

एकुणवीस, एकुणीस, एकोणीस वि. (२०-१)=१९ ही संख्या; दहा आणि नऊ मिळून होणारी संख्या. [सं. एकोनविंशति]

एकुणशंभर वि. (१००-१) ९९ ही संख्या; नव्वद आणि नऊ मिळून होणारी संख्या; नव्याण्णव.

एकुणसत्तर, एकुणहत्तर वि. (७०-१)=६९ ही संख्या; साठ आणि नऊ मिळून होणारी संख्या. [सं. एकोनसप्तति]

एकुणसाठ वि. (६०-१)=५९ ही संख्या; पन्नास आणि नऊ मिळून होणारी संख्या. [सं. एकोनषष्टि]

एकुणात, एकुनात, एकुणहात स्त्री. १. हिशेब पुरा केल्यावरची, अखेरची, एकूण रक्कम; हिशेबा अखेरी रक्कम, शिल्लक :'शेवटी एकुणात देत जावो.' - खाजगी खातें अंमलदाराचे अधिकार (बडोदे) १८५. २. या पुऱ्या केलेल्या रकमेवर मालकाने करायची सही किंवा रेघ, लेख. ३. या सहीवर एक विशिष्ट खूण म्हणून काढतात ती रेघ.४. (ल.) भाषणातील प्रमाणभूत सार; सार-सिद्धांत; तात्पर्य.

एकुनएर, एकुणयेर, एकुनेर क्रिवि. परस्पर; एकमेक : 'लोक पुसती एकुनेराला ।' - ऐपो १३०.(कुण.)

एकुलता, एकुलता एक वि. एकटाच.

एकूक वि. क्रिवि. प्रत्येक; सर्वांपैकी प्रत्येक वेळी एक याप्रमाणे. (कु.).

एकूटपण न. एकाकी राहणे :'देवा, आता हे एकूटपण पुरे.' – काआ ७४.

एकूण, एकून क्रिवि. १. तर मग; असे आहे तर; सारांश; एकंदरीत :'एकूण त्या वृषलीच्या भाच्याला राज्यावर बसविण्याकरिता तूं असला नीचपणा केलास काय?' – चंद्रगुप्त १७९. २. सर्व मिळून एकंदर संख्या किंवा बेरीज :'पांचा जणांनी पांच पांच रुपये दिले एकूण पंचवीस झाले.' – मोल. ३. अट्टल (बोलण्याचा निष्कर्ष काढून आलेले मत म्हणून); पक्का; वस्ताद. उदा. एकूण लबाड – लुच्चा – सोदा – मूर्ख. [सं. एक +अनु]

एकूणएक क्रिवि. १. एकच; तेच ते; सर्व सारे एकच. २. प्रत्येक; कोणी न वगळता; सर्वजण.

एकूणएकच क्रिवि. सारखेच.

एकूणजमा, एकूणबेरीज स्त्री. (अनेक रकमांची) एकंदर बेरीज; एकंदर रक्कम. (वा.) **एकूण क्षेत्रफळ सारखेच–** (लांबी कमी करून रुंदी त्या मानाने वाढविली तरी क्षेत्रफळ सारखेच राहणार या वरून)एकूण एक = एकीकडे कमी तर दुसरीकडे जास्त; एकंदर बरोबरी.

एकूणीस क्रिवि. एकंदरीत :'एकूणीस हरएक प्रकारे दौलतेस अपाय ..' – ऐलेसं ९९.

एके (ग.) एकवेळा; एकाने गुणायचे असताना योजायचा अवयव; पाढ्यात एकपट दाखविण्यासाठी वापरायचा शब्द. जसे : – तीन एके तीन.

एकेक, एकेकटा प्रत्येकजण; एकएकटा; एकामागून एक.

एकेचाळ, एकेचाळीस, एकेताळ, एकेताळीस वि. ४१ ही संख्या. चाळीस आणि एक मिळून होणारी संख्या. [सं. एकचत्वारिंशत्]

एकेठंय क्रिवि. एका ठिकाणी; एके जागी; एकत्र. (कु.)

एकेरा, एकेरी वि. १. दुहेरी, घडीचा किंवा पिळलेला नव्हे असा; एक पदरी (कापड, कागद, सूत वगैरेला लावतात); विरळ विणीचे (सणंग). २. कोता; बारीक; दुबळा (गाण्याच्या कामी गळा आवाज वगैरे). ३. एकवचनी; अरेतुरे असा सलगीचा (उल्लेख, संबोधन) : 'तूं मला शिवकुमारी या एकेरी नांवाने हाक मार गडे!' – विवि ८.२.३०. ४. एक एक; स्वतंत्र, दोन दोन, तीन तीन अशा प्रकारे संबद्ध नव्हे असा. (वा.) **एकेरीवर येणे –** अरे तुरे म्हणणे, एकेरी नावाने संबोधणे (अनादरयुक्त) २. (ल.) चिरडीस जाणे, चिडणे.

एकेरापट पु. (मल्लविद्या) एक पेच; जोडीदाराच्या एका पायाला गुडघ्याच्या लवणीत हात घालून उचलून आपले डोके जोडीदाराच्या बगलेजवळ छातीला दाबून जोडीदाराला चीत करणे.

एकेरा हुलकस (मल्लविद्या) एक पेच. आपण आपल्या जोडीदाराला खाली आणून त्याची मान आपल्या छातीने दाबून आपला एक हात जोडीदाराच्या बगलेत घालून आपल्या दुसऱ्या हाताचे कोपर जोडीदाराच्या बाहेरील मुंढ्यावर ठेवून आपल्या दोन्ही हातांनी मिठी घालणे व ज्या बाजूचा आपला हात जोडीदाराच्या मुंढ्यावर ठेवला असेल त्या बाजूचा आपला पाय जोडीदाराच्या गुडघ्यापासून घोट्यापर्यंत तटवणे व जोडीदाराच्या बगलेतून घातलेल्या हाताने झटका देऊन जोडीदारास चीत करणे.

एकेरी वि. एकएक वस्तू (धागा, फूल, मणी) वापरून केलेला; फक्त एकाच साधनाने काम करणारा; एकच पदर असलेला (हार, इ.).

एकेरी आवाज कोता आवाज.

एकेरी कथानक (सास.) ज्यामध्ये मूळ कथेला जोडून उपकथानक येत नाही अशी कथा; कथेची मांडणी.

एकेरी करणे सलगी दाखविणे :'त्यानं एकेरी केल्यावर पाटणकरनं एकदम चमकून पाहिलं.' – झाकोळ ७०.

एकेरी कारकून १. हलक्या दर्जाचा कारकून. याला शिपाई, प्यादे इ. नेमणूक नसते. याचे काम निव्वळ कारकुनीपलीकडे काही नसते. २. (निंदाव्यंजक) धोपटमार्गी.

एकेरी नोंद १. जिथे एकाच खात्यात व्यवहार नोंदले जातात अशी साधी हिशेब नोंदण्याची पद्धत. २. (अर्थ.) व्यापारव्यवहारातील फक्त एकाच बाजूची दखल घेणारी लेखापालनाची पद्धत. यामध्ये रोखीची आणि ऋणको व धनकोची व्यक्तिगत खाती यांची नोंद असते.

एकेरी पाड (स्था.) गवंड्यासाठी बांधलेला एकेरी विटांचा माळा.

एकेरी फूल (वन.) पाकळ्यांचे एकच वर्तुळ असलेले फूल.

एकेरी येणे १.चिरडीस येऊन अरे–तुरे म्हणणे. २. अनादराने संबोधणे.

एकेरी वहिवाट कीर्दीत (जमाखर्च) एकदाच बार करणे.

एकेरी सरकत (ग.) एकपाती; एकभागी; एकेरी प्रमाणभाग; वाटणी.

एकेरी होन होन या नाण्याचा एक प्रकार.

एकेश्वरवाद पु. ज्यात एकाच ईश्वराचे अस्तित्व (विधान) असते, त्याला एकेश्वर असे नाव आहे. जग निर्माण करणारी व त्याचे नियंत्रण करणारी एकच सर्वश्रेष्ठ शक्ती आहे असे मत. [सं.]

एकैक वि. १. प्रत्येक; एकामागून एक; विलक्षण असे एकेक:'हें सांघों काइ एकैक । देखैं श्वासोश्वासादिक ।' – राज्ञा ५.४५. २. एकएक; एकेक :'एकैके वेळें जाते दुखणें । ते आम्ही केले पुसवणें ।।' – शिव ८१६. [सं.]

एकैकसमाकारी वि. (ग.) एकसारखा आकार असणारी.

एकोटी स्त्री. भाकरी भाजण्यासाठी तव्याप्रमाणे उपयोगात आणायची वाटोळी मातीची खापरी. (खा.) [सं. एकवर्ती]

एकोणीस वीसपेक्षा एक कमी; १९ अशी लिहिली जाणारी संख्या.

एकोणीस विश्वे एकशेएक हिश्यांनी. १८ विश्वे ही कमालमर्यादा. त्याहीपेक्षा एक विश्व्याने अधिक :'यावरून १९ विश्वे तर नानांस विदित नसता ...' – मशियांका २८६.

एकोता पु. एक कुळाचार. हा विधी एका रात्रीत उरकायचा असतो. यात पूजा करणाराला 'भगत', स्त्रियांना 'गवरणी', जेवणाला 'भोजन भरणे' हरभऱ्याच्या डाळीच्या केलेल्या मुटकुळ्याला 'नारळे' व भाताला 'मोगरा' म्हणतात. महाएकोता असा आणखी एक प्रकार आहे.

एकोत्तर वि. एकाने अधिक; वेगळा असा एक. [सं.]

एकोत्तरा, एकोत्रा पु. द.म.द.शे. एक रुपया व्याजाचा दर, व्याजाचा हफ्ता प्रांरभीच कापून घेण्याची रीत :'जे एकोत्तरेयाचिया वाढी । जळतिये आगी घालिती उडी ।' – ज्ञा ९.५४. [सं. एक+ उत्तर]

एकोत्तिष्ठता स्त्री. एकोद्दिष्ट श्राद्ध; प्रेतनिवृत्यर्थ करायचे श्राद्ध. [सं.]

एकोत्री, एकोत्रे स्त्री. उजळणीचा एक प्रकार, संख्यांच्या वर्गाचा पाढा. जसे : – बे बे चार, तीन त्रिके नऊ, चार चोक सोळा, पाचा पाचा

पंचवीस इ.

एकोदर वि. सोदर; सख्खी; एका आईची; एकाच उदरातून उत्पन्न झालेली (मुले) :'कच बोले आदरें । तुम्ही आम्ही एकोदरें ।।' – पांप्र ५.९९. [सं.]

एकोदरशे, एकोदर्शे वि. एकशे एक (१०१). हुंडी, लेख वगैरेतून हा शब्द येतो :'अश्वपति नरपति राजे होती । एकोदर्शे राणी तया वर्णू नाही मिती ।' – वसा १३.

एकोद्दिष्ट न. १. मृताच्या उत्तरक्रियेत सपिंडी श्राद्ध होण्यापूर्वी अकराव्या दिवशी करायचे श्राद्ध. २. चुलता, भाऊ इ. निपुत्रिक मृत झाले असल्यास केवळ त्यानाच उद्देशून (म्हणजे त्रयीचा उल्लेख न करता) हे श्राद्ध केले जाते. एकोत्तिष्ठ असाही शब्द रूढ आहे. [सं.]

एकोन्माद पु. (मानस.) एकाच विशेष विषयाचे वेड. [सं.]

एकोपा, एकोवा पु. एकी; एकमत; जूट; संघटना :'राष्ट्राच्या अभ्युदयाकरिता एकोप्याने प्रयत्न करण्याची जरुरी आहे.' – लोटिकेले ३.२४६.

एकोशास, एकोशा, एकोस क्रिवि. एकीकडे; आडवळणी; एकांती; रस्त्यापासून बाजूला (गाव वगैरे). [सं. एक+वस्]

एकोसा पु. जनावरांच्या आचळास होणारा एक रोग.

एकोळ क्रिवि. एकवेळ; एकदा :'जें जन्मशतीं ओळगिजे । एकोळ यावेया' – ज्ञा ९.२०५.

एकोळा वि. एकसमूह; एकवट :'एकोळा करोनि लागु वळावीला ।' – भात्रे १०.३.११४.

एक्कडेन क्रिवि. एकीकडे; एकत्र. (गो.)

एक्कल काजा मुलांचा गोट्यांचा खेळ. एक या अंकाबद्दल म्हणतात.

एक्का पु. तबल्यावरील एक ठेका. (को.)

एक्का पु. १. एक दिवस अहोरात्र भजन; भजनसप्ता; खळ न पडता एक दिवस अहोरात्र करायचे नामस्मरण, भजन. (व.) २. एकी; एकमत; जूट; एकविचार :'पुढें स्वराज्यामधीं असून एक्का नसून बेबंदी झाली होती.' – गापो ९४. [सं. एक]

एक्का पु. हातावर तोलून धरण्याचा लाकडी मल्लखांब.

एक्का पु. मेणबत्तीची बैठक; भिंतीला लावून ठेवायचा दिवा.

एक्का, एक्या पु. १. पत्त्यातील पानांपैकी ज्यावर एक चिन्ह आहे असे पान (गंजिफ्यात प्रत्येक रंगाचा एक एक्का असतो). हे पान सर्वात भारी मानण्यात येते.'एक्का म्हणे राजालाही मारतो.' – के २६.७.३०. २. (ल.) अद्वितीय, श्रेष्ठ माणूस. [सं. एक]

एक्का पु. एका बैलाची (क्वचित घोड्याची) गाडी; छकडा : '(दिल्ली येथील) श्रीमंत लोक प्रात:काळी मोठाले बैलांचे रथ किंवा येक्के यांत बसून यमुनास्नानास जातात.'– तीर्थयात्रा प्रबंध ६९. [सं. एक]

एक्का करून बसणे एकत्र जमून बसणे :'... फौजेने एक्का करून बसल्यावर मागती बक्षीं वगैरे आणिले.' – ऐलेसं ५३५५.

एक्कुलगा पु. रानडुक्कर :'भला जंगी एक्कुलगा रान सोडून बाहेर धावला.' – श्रीयो १.३०२.

एक्केचाळीस वि. चाळीस अधिक एक ही संख्या; ४१ ही संख्या.

एक्बालपन्हा वि. दैववान; नशीबवान. [फा. इकबालपनाह]

एक्याण्णव वि. नव्वद अधिक एक, ९१ ही संख्या. [सं. एकनवति]

एक्यांयशी वि. ८१, ऐंशी अधिक एक मिळून होणारी संख्या.

एक्रार पु. करार; कबुली; इक्रार :'ऐसें स्पष्टवादें पुसतां मुल्जीम होऊन एक्रार केला.' – मइसा २०.६५. [फा. इक्रार]

एक्सान, एकसा वि. क्रिवि. एकसारखा :'जमाना एकसा नाही.' – मइसा ५.८५. [फा. यक्सान्]

एखरा पु. कोळिस्त्याचे बी, त्यास तालीमखाना असेही म्हणतात.

एखाद, एखादा वि. कोणीतरी; कोणीएक; अनेकांपैकी (कोणताही) एक; अमुक; विशिष्ट नव्हे तो; एकादा–एकाधा :'एखादें फुटकें नशीब म्हणूनी प्रेतास शृंगारिते.' – वाग्वै. २. (अध्याहार होऊन) एखाद्या वेळी; एखाद्या प्रकारे:'एखाद्या होईलसुद्धा.' – रथ १९४.

एखाददुसरा वि. कोणी एखादा (क्वचित आढळला तर); एकदोघे आणखी; कदाचित एक जास्त (आतापावेतो सांगितल्यापेक्षा).

एख्लास, एख्लासी (एखलास्, एख्लासी) पु. स्त्री. स्नेह; आदर; मैत्री. पहा : **इख्लास** [फा. येख्लास]

एगान स्त्री. (जरतार धंदा) एकेरी तार. एकाच तारेला पीळ दिलेला असल्यास तिला एगान म्हणतात.

एगानगत स्त्री. ऐक्य; स्नेह :'दुनियाईंत दोंही दौलतींची एगानगत मषहूर.' – मइसा ५.३१. [फा. यगानगत्]

एजोब पु. (ख्रि.) वनस्पतिविशेष. जुन्या कराराच्या काळी याच्या डहाळ्यांचा उपयोग शुद्धीकरणाच्या विधीमध्ये रक्त किंवा पाणी शिंपडण्याकरिता करीत असत :'एजोबाने स्वच्छ करा मज निर्मल ते मी होईन हो.' – उसं १८४. [हिब्रू]

एटक न. १. गाडीची साटी आणि बुटे यांना जोडणारा दांडा. २. खूबी; युक्ती; तंत्र.:'ज्याला माहीत नाहीं हें एटक त्यानें गाडी उलटविली म्हणून समजा !' – खेस्व १७१.

एटाल न. विटेचा तुकडा; विटकर :'ते टाकीति एटाले । पैशून्याचिं ।।' – राज्ञा १६.३१९.

एटोळ क्रिवि. इतका वेळ; वाढूळ. पहा : **एढोळ.**(व.)

एठ, एठा, यठ क्रिवि. येथे; या ठिकाणी :'तंवं भणे यादवराओ । एठ हाचि उपाओ।।' – शिव ७४१. [सं. इत्थ]

एठाठी क्रिवि. येथून. (चि.) [सं. इत:+इत:]

एड स्त्री. टाच. घोड्याला मारण्याकरिता टाचेच्या मागच्या बाजूला लावलेली दातेरी. (क्रि. देणे.) [हिं.एडी=टाच]

एडका पु. १. मेंढ्याची एक जात. याला शिंगे येतात, ती मजबूत असून त्याला टक्कर देऊन लढण्याला शिकवितात :'एडका मदन तो केवळ पंचानन.' – भज ११२. २. मुंग्या पकडण्यासाठी धुळीत वाटोळी खळी करून तिच्यात बसणारा किडा, याला मोर असेही म्हणतात. [सं. एडक]

एडगुळबेडगुळ वि. ओबडधोबड.(व.) [बेडगुळचे द्वि.]

एडला क्रिवि. एव्हाना; एवढ्या वेळात. (चि.) [सं. इयत्वेला]

एडिपस गंड (मानस.) लहान मुलाच्या आईवर असणाऱ्या वाजवीपेक्षा

अधिक प्रेमामुळे निर्माण होणाऱ्या मानसिक विकृतीला फ्राइड या मानसशास्त्रज्ञाने हे नाव दिले आहे.

एडी स्त्री. टाच. पहा : **एड** (व.) [हिं. एडी]

एडी स्त्री. घोड्याची दुडकी चाल.

ए डी सी पु. उच्च पदस्थाच्या तैनातीला असणारा लष्करी अधिकारी. (हा अधिकारी त्याच्या सर्व सुखसोयींकडे लक्ष देऊन त्यांची बडदास्त ठेवतो); शरीरसंरक्षक; अंगरक्षक. [इं.]

एडुक, एडूक पु. हाडे, दात, केस वगैरे काही स्मारक म्हणून पुरून झाल्यावर त्यावर उभारलेला मनोरा किंवा इमारत; स्तूप; डागोबा. बुद्धाच्या अवशेषांची अशी एडुकस्थाने असतात :'एडूकचिन्हा पृथिवी न देवगृहभूषिता.' – गीर ५५६. [सं.]

एढवळ, एढोळ, क्रिवि. आतापावेतो; एवढा वेळ; इतक्या उशिरापर्यंत; वाढूळ. पहा : **एटोळ.** [सं. इयत्वेला]

एढा क्रिवि. येथे. पहा : **एठ, एठा.** (राजा.)

एढाढी क्रिवि. येथून. (राजा.)

एणाक्षी स्त्री. मृगनयना; हरणासारखे डोळे असणारी सुंदर स्त्री. [सं.]

एणांक पु. चंद्र; ज्यावर हरिणाचे चिन्ह आहे तो; मृगलांछन:'होता द्रोण कृपाख्ययुक्त सह तो एणांक तारांगणीं ।' – वामन–विराट ५.१३. [सं.एण= हरिण+अंक = चिन्ह]

एणे सना. तृतीया १. येणे; याने :'कथितो सर्वार्थपद जप्य महामंत्र मी तुला एणें । वश होइजेल देवें जेविं मधुरगीत मोहितें एणें ।' – मोअनुशासन ५.१३. २. या; अशा. उदा. एणेकरून, एणेपरि वगैरे रूपे होतात :'एणेंपरि परिसतांच तया अनन्या ।' – नल १२१.

एतत्, एतद् सना. हा, ही, हे. पुढीलप्रमाणे समासात हा शब्द येतो. एतदतिरिक्त (एतत्+अतिरिक्त) = याहून वेगळा, याहून वरचढ. एतदंतर्गत = यात समाविष्ट झालेले; यातील; याचे. एतत्कृत = याने केलेले. एतदर्थ = याकरिता; म्हणून. एतदर्थक = या अर्थाचा. एतदनंतर = यानंतर. एतदनुरूप = या प्रकारे; याप्रमाणे. एतदवधि = येथपर्यंत; इतके. एतदारभ्य = यापुढे वगैरे. [सं.]

एतदर्थ वि. विशिष्ट कामापुरता नेमलेला.

एतद्देशीय वि. या देशातील; या देशात, येथील लोकांकडून होणारी (पुस्तके, इतर कामे वगैरे) :'एतद्देशीय ग्रंथावर साहेब मजकुरांनी जो टीकालेख लिहिला....' – लोटिकेले २.१९३. [सं.]

एता क्रिवि. आता. (राजा.)

एतादृश वि. यासारखा; असा. [सं]

एतावत वि. इतका; एवढा. उदा.एतावत्काल. [सं.]

एतावता क्रिवि. १. म्हणून; एकंदरीत; यामुळे; इतक्याने; येवढ्याने : 'एतावता निष्पन्न काय होतें कीं, औरस पुत्र नसल्यास स्वर्गप्राप्तीसाठीं दत्तकपुत्र घेण्याची जरूर नाहीं.' – लोटिकेले ४.१५. २. तथापि; असे आहे तरी; अद्याप. [सं.]

एतावधि–धी क्रिवि. एथपर्यंत; एथपावेतो; होताहोईतो; एवढा; इतका. [सं. एतद्+अवधि]

एतुला वि. एवढा; इतका; असा :'लाडका करिसी यास एतुला.' – आकृ २८. [सं. इयत्]

एथ सना. १. सर्व. २. मी. चक्रधरस्वामींनी स्वत:बद्दल केलेला प्रयोग. एथौनि= माझ्याकडून :'ते एथौनि तुम्हांसि सांघिजैल.' – लीच १.२.

एथ हे ठिकाण या अर्थाचा मूळ शब्द. त्याला प्रत्यय लागून अव्यय व विशेषणे तयार होतात. जसे : – एथुनि, एथे, एथला, एथपर्यंत इ.

एथ याठिकाणी; या स्थळापासून :'एथ मृत्युसी ही करूनि चढावा ।' – राज्ञा ११.३८३.

एथचा, एथला, एथील वि. या जागेचा, भागाचा, प्रांताचा, दिशेचा वगैरे; येथील. [सं. अत्र]

एथपर्यंत, एथपावेतो, एथवरी, क्रिवि. हा पावेतो; या (वेळ किंवा स्थळ) पर्यंत; हा काळ पावेतो; एवढा वेळ; एढोळ.

एथून, एथोन क्रिवि. यापुढे; या स्थळापासून किंवा काळापासून पुढे.

एदगिरी वि. नागपूर जवळ असलेल्या एदगीर गावचे (शेला, धोतरजोडी इ. वस्त्र).

एदेन –अदन वि. ख्रिस्ती पवित्र शास्त्रात वर्णिल्याप्रमाणे मानवाचे मूळ पूर्वज आदम व हव्वा यांना ज्या बागेत ठेवले होते त्या बागेचे नाव; आनंदोद्यान; नंदनवन :'परमेश्वर देवानें त्यास एदेन बागांतून काढून लाविले.' – उत्प २.२३.[हिब्रु एदेम=आनंद किंवा सुख; इं. इडन.]

एदो वि. एवढा. (गो.) [सं. इयत्]

एधवळा, एधोळ, एधोळा क्रिवि. एव्हाना; इतका वेळ; एवढा वेळपर्यंत; एढवळ; एढोळ; एवढ्यावेळी. (कुण.)

एधवा क्रिवि. (काव्य) आता; यावेळी. [सं. अद्य]

एधष्ट, एधष्ठ क्रिवि. पाहिजे तितके; यथेष्ट; भरपूर; पुरेपूर. [सं. यथेष्ट अप.]

एनकेन(तेन) प्रकारे क्रिवि. कोणत्यातरी प्रकाराने; कशाही रीतीने; वाटेल तसे; कशामुळे तरी; कसे तरी; कसेही. [सं. एनकेनप्रकारेण]

एनातीमामूल स्त्री. ठरावीक देणगी. [अरबी इनायत + फारसी मामूल]

एनिमा पु. बस्ती; बस्तीचे एक औषध किंवा पिचकारी; शौचविधीचे एक साधन. [इं.]

एन्हा घेणे अक्रि. हिसका घेणे; व्यर्थ त्रास घेणे. (व.)

एप्रिल पु. इंग्रजी वर्षाचा चवथा महिना. हा मराठी चैत्र–वैशाखाच्या सुमाराला येतो. [इं.]

एर (एऱ्) वि. बाकीचे दुसरे इतर (विशिष्ट सांगितल्यानंतर राहिलेले); अन्य; भिन्न :'एर परिवारू अपारू। तो कवनु जाणे ।' – शिव ५२. २. (ल.) गौण; किरकोळ; सटरफटर. ३. क्रिवि. एरवी :'एर सिद्ध तैसा येथें । उपाये मी ।' – ज्ञा १८.१२२२.

एर, एरी पु. एका जातीचा मासा. हा भरलेल्या पोत्याच्या आकाराचा असून पाण्यात कोलांट्या घेत फिरतो. त्याची एकच बाजू पाण्यावर दिसते.

एर–री–रु–रे सना. तो; ती; हा; ही :'मग एरी कानिआं परतली ।' – शिव १७५; 'शिर लोटिलेयां जैसें । एर आंग ।।' – राज्ञा १८.१२७; 'एरें उवाइलेनि चित्तें । बाह्य सख्य यया सुखापुरतें ।' – राज्ञा १०.६२६. [सं. अपर]

एरएर सर्व; एकमेक :'ऐसें एराएरीं अवघें गोसावीयांपुढें सांघितले ।' –

लीचपू ४१४.

एरक स्त्री. तंबाखूची जुडी. (खा.) [सं. एरका = तृणविशेष]

एरका, एरिका स्त्री. एक प्रकारचे गवत; लव्हाळा; मोथा:'ब्रम्हशापाची एरिका । तीरीं निघाली होती देखा । ते मुष्टीं घेऊनि क्रोधतवका । एकमेकां हाणिती ।' - एभा ३०.१४६. [सं . एरक]

एरकान पु. घोड्याचा एक रोग. याला पिळा असेही म्हणतात. हा रोग खोकल्यापासून होत असून याने शरीर पिवळे होते. - अश्वप २.२३०.

एरखाई स्त्री. मुलींचा सागरगोट्यांचा एक खेळ.

एरझारणे अक्रि. आतबाहेर, वरखाली करणे :'तो एकला प्राण एरझारे ।' -ऋव ६२३.

एरडबेरड वि. बेडौल; प्रमाणशीर नसणारा.(मा.) [बेरडचे द्वि.]

एरडवती स्त्री. एरंडाची पाने :'एरडवती लुगडां बांधौनि.. आंग सेकिजे.' - वैद्यवल्लभ ३.

एरडा न. एका जातीचे मासे. (कु.)

एरणी स्त्री. (केसांची) वेणी; पेड. [क. एरळ्.]

एरणी स्त्री. वरातीपूर्वी वरमातेला देण्याची ऐरण; झाल :'एरणी सोनयाचीं पदकीं ।' - मधउ ४२.

एरमीठ न. नेहमीचे खाण्याचे मीठ. समुद्रमीठ (शेंदेलोण वगैरे खनिज नव्हे).

एरये सना. **एकमेक** :'एरयेहीं वस्त्रें वाइलीं.' - लीच १.३५.

एरवण स्त्री. (प्रभु समाजात) वरातीत लागणारी रोवळी; झाल.

एरवती स्त्री. मालतीची वेल, फूल :'चंदनलता चंद्रपुष्पीं : एरवतीया अनंगचांपी.' - रुस्व ८१८.

एरवा, एरव्हा क्रिवि. तेरवाच्या पुढचा दिवस; चालू दिवसांपासून मागे किंवा पुढे चौथ्या दिवशी. कोणी पाचवा दिवस समजतात, कोणी तेरवा म्हणजे एरवा मानतात. [सं. अपरश्वस्]

एरवाळी क्रिवि. १. नेहमीच्या वेळेच्या अगोदर : 'नानी, भुका तरी लागायला नकोत एवढ्या एरवाळी.' - व्यंमाक २७. २. लवकर; अगोदर :'तिनं एरवाळी निगायला बजावलं व्हतं.' - मळणी ७८.

एरवी, एरव्ही, एरी, एऱ्हवी, एऱ्ही क्रिवि. १. उगीच; सहज; कारणाशिवाय. २. सहजासहजी; अचानक; श्रमाविना. ३. नाहीतर; किंवा :'ऐसें बसता कोपाल । एऱ्हवीं पुढें पळाल ।' - शिव ४८४. ४. इतर बाबतीत; हे सोडून.

एरशेर वि. असातसा, फालतू; सामान्य (माणूस, गोष्ट). [एरचे द्वि.]

एरंड पु. एक औषधी झाड. याच्या मोगली व सुरती (तांबडा व पांढरा) अशा दोन जाती आहेत. सुरती एरंडाच्या बियांचे (एरंड्यांचे) तेल काढतात. मोगली एरंड शेताच्या कुंपणाला लावतात.

एरंड पु. मुलांचा एक खेळ.

एरंडकाकडी स्त्री. पोपई. नागपूरकडे एरणपपई असे पपईला नाव आहे.(माळवी)

एरंडमूळ न. सुरती एरंडाचे मूळ, मुळी. ही मुळी औषधी असते.

एरंडासारखा वि. (ल.) उंची असणारा पण निरुपयोगी.

एरंडी स्त्री. १. सुरती एरंडाचे झाड; एरंडाची एक वेगळी जात.२. एरंडाचे बी. हे एक गळिताच्या मुख्य धान्यांपैकी आहे. याच्या तेलाचा उपयोग दिव्यासाठी व औषधासाठी आहेच पण त्यापेक्षा यंत्रांना वंगण म्हणून विशेष होतो. [सं. एरंड]

एरंडे न. एक हलके रेशीम (सोवळ्यांच्या वस्त्रांसाठी); टसर रेशीम. (रेशमाचे किडे एरंडाची पाने खातात यावरून). [सं. एरंड]

एरंडेल न. एरंड्यांपासून काढलेले तेल. हे रेचक म्हणून घेतात.

एरंड्या साप सापाची एक जात. एरंडीच्या बीवर जसे ठिपके असतात तसे ठिपके या सापावर असतात.

एरांस पु. दाय; वारसा; जमीनजुमला. [इं. इन्हेरिटन्स]

एरिद पु. यारीद; सहायक; दुय्यम अधिकारी. कारकून :'बाजीच्या एरीदियास हुजूर तूर्त पाठविणे.' - मइसा १७.९.

एरिंग स्त्री. कानातील एक लोलकासारखा दागिना; डूल; कर्णभूषण. [इं. इअरिंग]

एरीकडे क्रिवि. इकडे; तिकडे; दुसरीकडे :'एरीकडे श्रीचक्रपाणी । काई करिते जाले ।' - शिव ८५२.

एरीमोहरे क्रिवि. उलट बाजूला; दुसऱ्या तोंडाकडे :'जैशी ते शुकाचेनि आंगभारें । नळिका भोविन्नली एरी मोहरें ।' - ज्ञा ६.७६.

एरीवानी क्रिवि. दुसऱ्या बाजूला :'मग एरवानी उलथे : तव एर अंग सावध होए' - लीचउ १२१.

एरुमेर परस्पर; एकमेक. (कु.)

एरोदस पु. गोड ओवा. ही पर्शियामधील वनस्पती आहे.

एल पु. एका जातीचा मासा. हा सर्पाकृती असतो. [इं.ईल]

एलकडी वि. एकेरी; एककडीचा :'घोड्याचे लगाम बहुधा एकेरी किंवा एलकडी असतात.' - भूभ ३९.

एलकाक्रीडित भौमिचारी न. (नृत्य.) पायाच्या अग्रतलावर नीट उभे राहून व उंच उडी मारून पुन्हा जसेच्या तसे उभे राहणे. अशी क्रिया वारंवार करणे.

एलकावणे अक्रि. शेंदणे; वर घेणे; ओढणे (विहिरीतून किंवा खड्ड्यातून पाणी वगैरे).

एलकी स्त्री. चमक; वेदना; उसण. (क्रि. भरणे). [प्रा.]

एलगार, एल्गार पु. निकराचा हल्ला; निश्चयपूर्वक जोराचा प्रयत्न; चढाई; दौड :'दर्यातून आरमार व खुस्कीने लष्कर घालून चौतर्फा एलगार करून अवकाश घेऊ न देता त्याने आक्रमिली स्थळें ....' - मराआ ६. [फा. इल्गार = मोहीम, तुर्की ईल्घार]

एलची, एलाची स्त्री. वेलदोड्याचे दाणे; वेलदोडा. [सं. एला]

एलची, येलची वि. व्रात्य; खोडकर; फाजील; पाणचट.(व.) [सं. एला]

एलटी, एलाटी स्त्री. (विणकाम) चाळ्याच्या (वहीच्या) खालवरच्या दोन पट्ट्या. या चाळ्यातून ताण्याचे दोरे जातात.

एलणे, एलावणे अक्रि. १. चेष्टा करणे; नखरा करणे. २. स्वैर वागणे. (व.) [सं. एलायति]

एलपाड्या वि. (ना.) नाना तऱ्हा करणारा; नकल्या; चेष्टा करणारा.

एला स्त्री. मोठ्या बीचा वेलदोडा; वेलदोड्याचा दाणा किंवा झाड. वेलदोड्यात एला आणि एलणी असे दोन किरकोळ भेद आहेत. [सं.]

एलानदाज पु. जासूद; पत्र किंवा हुकूम नेणारा :' मग मुजरह एलानदाज व महार देऊन रुपये १५०० सेवेसी पाठविले.' – ब्रच २०१. [फा.]

एलापा, एलाफा पु. तांदळाचे एक पक्वान्न; घारगा. (गो.)

एलिफंट घास (पशु.) एक प्रकारचे गवत; गजराज गवत. याच्या काड्या जोंधळ्यासारख्या असतात व पात जोंधळ्यापेक्षा लांब असते. याचा गुरांच्या चाऱ्यासाठी उपयोग करतात.

एलु पु. ठगाशिवाय एखादा मनुष्य. (ठगी)

एले न. (नांगर, कुळव किंवा पाभर यांची) दांडी व जोखड यांना एकत्र बांधायची कातड्याची वादी. ही कोडकातून ओवलेली असते. [सं. वल्ली]

एल्वी पु. दूत; वकील; प्रतिनिधी; हेजीब :'शाहमजकुरास तोफा-तायफ देऊन एल्वीची रुख्सत करणार आहे.' – दिमरा २.५. [तुर्की ईल्ची]

एल्हावणे अक्रि. ढोंग करणे.(ना.)

एवढा वि. १. इतका मोठा; इतक्या आकाराचा, परिमाणाचा. २.पहा : **इतका.** (एवढा, जेवढा, तेवढा, केवढा वगैरे शब्दांचा वर्ग आणि इतका, जितका, तितका, कितका वगैरे शब्दांचा वर्ग यात फरक असा की, पहिला आकार, गुण परिमाण दाखवतो तर दुसरा संख्यापरिमाण दर्शवितो). (वा.) **एवढ्याचे एवढे करून सांगणे** – फुगवून, तिखटमीठ लावून सांगणे. [सं. इयत्]

एवढेपणी क्रिवि. या वयात :'एवढेपणी मुसलमानणीखेरीज कोणी मेंदी लावीत नाही.' – पाक २४.

एवढ्यांदा क्रिवि. इतक्या मोठ्याने, जोराने किंवा मोठा आवाज करून; दण्दिशी.

एवं क्रिवि. याप्रमाणे; याप्रकारे; असे :'एवं थितिया मातें चुकले ।' – ज्ञा ९.३३०. [सं.]

एवंगुणविशिष्ट वि. अशा गुणांचा; अशा गुणांनी भरलेला. [सं.]

एवंच क्रिवि. सारांश; एकूण; तात्पर्य; मिळून; एकंदरीत. [सं.]

एवंप्राय वि. अशा प्रकारे.

एवं वा पर्याय :'परमेश्वरशास्त्रीं एवं वा नाही' – लीचउ ४८४.

एवंविध वि. या प्रकारचा :'जी एवंविधा तूंतें । मी देखतसें हें निरुतें ।' – ज्ञा ११.२१२. [सं.]

एवंसंज्ञ पहा : **एवंविध** :'अर्जुना एवंसंज्ञ । सर्वत्र जाण यज्ञ ।' – राज्ञा १६.९८.

एवाका, एवांका पु. अधिकाराची व्याप्ती; आवाका; विस्तार; सार :'ते महासिध्दांचा एवाका । सिद्धांतकक्षा अनेका ।' – राज्ञा १८.१२३६.

एवाडी वि. एका पायास अधिक (पाचवा) पाय फुटला आहे असा (घोडा). हे घोड्याचे अशुभ लक्षण मानले जाते.

एवाळे न. पाणसाप; वयाळे; हेवाळे. (गो.) [सं. व्याल]

एवि, एवीं क्रिवि. असे; या तऱ्हेने; याप्रमाणे :'मार्कंडराय ऋषि एविं बोलतीं ।' – वसा ११. [सं. एवम्]

एवीच, एव्याच क्रिवि. मुकाट्याने; स्तब्धतेने; उगीच (पाहणे, लक्ष देणे):'आपुलाले तुम्ही पुसा । सेवा एव्याच सरिसा । स्थिरावल्या कैसा । काय जाणों विचार ।।' – तुगा ३१६१. (को.)[सं. एवम्]

एवीतेवी क्रिवि. कोणत्याही प्रकारे; कसेही झाले तरी; काही असले तरी (होऊ नये झाले, आता जसे होईल तसे होऊ दे असा भाव) :'एवीतेवी अग्रलेख डोंगऱ्यांच्याच नावावर खपणार होता.' – अक्षर १३१.

एवैम अ. एकूण :'एवैम (गद्याण) १०' – पांढरशिला ३.३०.

एव्हा क्रिवि. आताच्याआता; या वेळी; तूर्त; या समयी.

एव्हा एव्हा क्रिवि. सुमारे हा वेळ; या घटकेला (मागे). (राजा.)

एव्हाना क्रिवि. हा वेळ पावेतो; आता पावेतो.

एव्हाशी क्रिवि. आता; या घटकेला; आताच; इतक्यात :'खबरदार मला एव्हाशीच आपली म्हणाल तर!' – बाय ४.३.

एशेल, एषेल न. खाण्याचे तेल; गोडे तेल. (व.)

एषणा स्त्री. मिळण्याची इच्छा. [सं.]

एषा स्त्री. ईर्षा; बरोबरी. [सं. ईर्षा]

एषादिक सना. विशिष्ट लोक दर्शविण्यासाठी व्याजोक्तीने हे सर्व लोक, हे मोठे लोक, शिष्ट. 'अस्मादिक' प्रमाणे रूप. [सं.]

एष्य वि. १. आगामी; भावी. २. (ज्यो.) अनुपभुक्त; जिच्यामधून अद्यापि ग्रह गेला नाही अशी (रास). [सं. इ = जाणे]

एसकर वेशीवरील पहारेकरी. (वेसकर).

एसणा, एसना वि. असा; असला; इतका; अशा तऱ्हेचा; एवढा :'तव बलिभद्रु बोलिला । एसना तुं जुझारू भला ।'– शिव ९१९; 'एसणी आंगीं असता प्रौढी ।' – गीता १.१४७२. [सं. अदस् एष]

एसाळ पु. त्वेष; आवेश :'स्वामी विंधितो एसाळें । साही कोदंडें विशाळे ।'– उह १५२०.

एसी स्त्री. जवस; अळशी :'एसी आपजवीलीया … एसी घालौनि कीजती तीए एसौलें' – लीचपू ५८२.

एसूर स्त्री. कांदा घालून केलेली मिरच्यांची पूड; काळे तिखट.[क. एसर]

एसोले न. धिरड्यासारखा एक खाद्यपदार्थ :'धीडरें काइसें जी : ये एसोले म्हणीजेति तीयें एसोलें : उडीदां जोन्हळेयांची तीयें ढीडरीं :' – लीच ४.४९.

एहतियात स्त्री. १.सावधगिरी; दक्षता; जागरूकता २. (ल.) दूरदृष्टी; काळजी :'करनूल संस्थान इकडील व तिकडील सालाबाद पेचकषीचे, याजकरितां येयाची एहतियात करणे आवल म्हणोन बोलिले.' – मइसा ७.३७. [फा.]

एहसान स्त्री. १. कृपा; उपकार:'इतके दिवस परभारें दौलतीवर एहसान होत गेली.' – मइसा ५.३१. २. साऱ्याची माफी. [अर. इहसान]

एहसानमंद वि. कृतज्ञ; आभारी :'पातशहा आपला एहसान्मंद होऊन पातशाहीचा बंदोबस्त आपले हातून करून घेई ऐशी कारस्ती जी होईल ती करावीच करावी.' – ऐच ११५.

एहंकी, एहेंकी क्रिवि. असे; याप्रमाणे :'लोक मान आलस्यो साम्यो ऐहंकी आखताहा । = लोक मला आळशी शाम्या असे म्हणतात.' – भिल्ली भाषा ३०.

एहेंडे क्रिवि. याप्रमाणे; असे; अशी :'बाय इं बोरें एहेडें काहा? = बाई, ही बोरे अशी का?' – भिल्ली भाषा २७.

एहेंतेहें क्रिवि. इकडे तिकडे; येथे तेथे :'आन एहेतेंहे फिरतलो = आणि इकडे तिकडे भटकलो.' – भिल्ली भाषा ३६.

एळ स्त्री. समुद्रकाठ. (गो.)[सं. वेला]

एळ वेलदोडा. पहा : **एला.** (गो.)

एळकोट, एळकोटभेर पु. (खंडोबाचे भगत देवापुढची तळी उचलताना किंवा भिक्षा मागताना एळकोट किंवा एळकोटमल्हार असे ओरडतात त्यावरून) एकजुटीने प्रयत्न; निकराचा प्रयत्न. २. (निंदाव्यंजक) गोंधळ; गडबड; अव्यवस्था. [क. एळु=सात]

एळकोटमल्हार पु. नाश; उचलबांगडी :'मी इकडे जयवंतरावाचा एळकोट मल्हार करतो.' – चंद्रग्रहण नाटक ६१.

एळणी स्त्री. मातीचे भांडे (थाळी, वाटीसारखे). (व.)

एळव उद्गा. कंटाळा, नापसंती दर्शविणारा उद्गार.(तंजा.) पु. अमंगळ काम. [त. एळवु]

एळवणी स्त्री. आमटी. पहा : **अळवणी** (माण.)

एळागोट पु. अव. दंडातील व हातातील दागिने :'जिजाने .. एळागोट विकले.' – आआशे ११७.

एळिया, एळयाबोळ पु. एक औषध; बोळाचा एक प्रकार; काळा बोळ. [सं. एलीयक]

एक्षकर्दम पु. एक उटी :'ऐसा एक्षकर्दमु गोसाविया कारणें करीति' – गोप्र ९९.

एंकोळ पु. स्त्री. एक सरळ वाढणारे मोठे झुडूप.

एंगरट वि. अक्कलशून्य. (व.)

एंडी स्त्री. एरंडीची पाने खाऊन वाढणाऱ्या किड्यापासून मिळणारे रेशीम. त्या रेशमापासून केलेल्या वस्त्रांना एंडी म्हणतात :'फिकट पिवळ्या रंगाची एंडीची मेखला नेसून ..' – सीपो १२७.

एंडी स्त्री. मासे धरण्याचे पोत्यासारखे एक जाळे. (गो.)

ॲ

ॲ इंग्रजी भाषेच्या संपर्कामुळे मराठीमध्ये हा उच्चार आलेला आहे. 'अ' स्वरावर अर्धचंद्र स्वरूपात हा उच्चार दाखवला जातो. उच्चारस्थानाचा विचार करून 'ए' नंतर हा स्वर घेतला जातो. काही भाषाशास्त्रज्ञ त्याचे स्थान 'अ' नंतरचे मानतात. वर्णक्रमानुसार अकरावे स्थान.

ॲटहोम पु. मित्रमंडळींना छोटी मेजवानी, फराळ, उपाहार. या वेळी पदार्थ मांडून ठेवलेले असतात. पाहुण्यांनी लागेल ते खावे. गाणे नाच, खेळ वगैरे करमणुकीचे प्रकारही फराळासोबत असतात :'त्यांना या औपचारिक गोष्टी आवडतच नसत. ॲटचे नाव काढले कीं, अंण्डरसन साहेबांचे डोके उठत असे.' – नपुक २३. [इं.]

ॲडमिरल पु. नौसेनेचा आरमारांवरचा प्रमुख अधिकारी. [इं.]

ॲहं उद्गा. नापसंती, असंमती, नकारदर्शक उद्गार.

ऐ

['ऐ' ने सुरुवात होणारे काही शब्द येथे न आढळल्यास 'अइ','अय', 'आइ' खाली पाहावेत.]

ऐ मराठी वर्णमालेतील बारावे अक्षर. आघातयुक्त अ चा नंतर येणाऱ्या आघातरहित 'इ'शी संयोग होऊन झालेला संयुक्त स्वर. आघातरहित स्वर व्यंजनाकडे झुकत असल्यामुळे उच्चारदृष्ट्या अय् असा. कित्येक शब्दांत तसे पर्यायी लेखनही संभवते. जसे : – भैया, भय्या.

ऐ उद्गा. अगबाई; दु:ख, शोक याचा उद्गार. पहा : **अइ** : 'मज हरिपु ऐ जहर कहर करी लहर आलि बाई धराधरा ।' – राला.

ऐकटपत्र न. दोघांच्या संमतीचा कागद; समेट पत्र: 'आमच्या दोघांच्या सहीचें ऐकटपत्र लिहून मागीतलें.'– मानृ २८८.[सं. एक+ पत्र]

ऐकणा वि. ऐकणारा; ज्याला चांगले ऐकू येते असा; कानाचा धड : 'कान वचन मीचि श्रोता । मीचि जाण शब्दार्थता । ऐकणाहि मज परता । नाहीं तत्त्वतां श्रवणाचा ।।'– एभा १३.३४५.

ऐकणे उक्रि. १. कानांनी शब्द, ध्वनी जाणणे, समजणे; कान देणे; श्रवण करणे. २. लक्षपूर्वक ऐकणे; काळजीने श्रवण करणे; अवधान ठेवणे. ३. लक्ष देणे; मान्य करणे (एखादी सांगितलेली गोष्ट); ध्यान ठेवणे; नीट चित्त देणे; बरहुकूम वागणे; आज्ञा पाळणे; हुकूम मानणे. [सं. आकर्णन] (वा.) **ऐकून घेणे** – १. दुसऱ्याचे बोलणे सहन करणे. २. लक्षपूर्वक पूर्णपणे ऐकणे.

ऐकभट्टी स्त्री. (विनोदाने) ऐकण्याचे काम; कर्णद्वारे ग्रहण करणे (याच्या उलट अभ्यासाने ग्रहण करणे); ऐकण्याचा अभ्यास; ऐकीव अभ्यास. वि. ऐकीव; केवळ कानावर आलेली (जनवार्ता, अफवा, बातमी).

ऐकमत्य न. सर्वांचे एकमत असणे; कोणताही मतभेद नसणे; मतांचे, विचारांचे, आवडीनिवडीचे एकस्वरूप; एकीकरण; एकवाक्यता; एकी; एकोपा : 'राष्ट्रीय सभेत ऐकमत्य होण्यापूर्वी, प्रत्येक प्रांतात, प्रत्येक जिल्ह्यात, प्रत्येक खेड्यात तें झालें पाहिजे.' – टिसू ४०. [सं.]

ऐकवणी स्त्री. १. ऐकायला लावणे; कबूल करायला लावणे. २. विवरण; विवेचन; फोड. (क्रि. करणे.)

ऐकवणे ऐकू शकणे; ऐकून काही परिणाम, त्रास न होणे.

ऐकवणे उक्रि. (ऐकणे प्रयोजक.) १. ऐकायला लावणे; म्हणून दाखवणे. २. स्पष्ट शब्दांत सांगणे; सुनवणे.

ऐकाहिक वि. १. एका दिवसाचे; उरकण्यास एक दिवस लागणारे (काम). २. एकच दिवस पाळायचा (उपास वगैरे). ३. एकच दिवस टिकणारे; क्षणिक; क्षणभंगुर. ४. दररोज येणारा; रोज थोडाबहुत असणारा; सान्निपातिक (ज्वर वगैरे). [सं. एक + आहिक (अहन्)]

ऐकांतिक वि. १. अतिरेकी; टोकाचा; दोन परस्परविरोधी मतांत तोल न राखणारा : 'या दोन ऐकांतिक प्रणाली असून...' – सासं ३२९. २. (तत्त्व.) एकाच मताचा पुरस्कार करणारा; एकाच बाजूने विचार करणारा; एकच बाजू पाहणारा. [सं.]

ऐकीव वि. १. ऐकलेले; ऐकून माहीत झालेले; दुसऱ्याकडून समजलेले; स्वत: न पाहिलेला किंवा अनुभवलेला. २. (ल.) प्रत्यक्ष पुरावा, साधन नसणारे; कमी विश्वासार्ह.

ऐकीव पुरावा १. प्रत्यक्ष पाहिलेली हकीगत न सांगता केवळ ऐकलेली गोष्ट सांगणे; सांगोवांगी गोष्ट. २. (कायदा.) साक्षीदाराने प्रत्यक्ष जी घटना पाहिली नाही, पण इतरांकडून तोंडी समजली आहे अशा गोष्टींवर आधारलेला पुरावा. हा सामान्यत: विश्वसनीय समजला जात नाही.

ऐक्य न. १. एकरूपता; एकोपा; एकी; अद्वैत; सारखेपणा; एक होणे : 'ऐक्याचें ऐक्यपण सरे । जेथ अद्वयकणु हों विरे ।'– राज्ञा १८.९९९. २. एकदिल; एकचित्त; एकभाव; मिलाप; जूट; ऐकमत्य (उद्देश, स्वभाव, इच्छा वगैरेचे). ३. (तत्त्व.) ऐक्यमत; ऐकज्ञान; जीवात्मा व परमात्मा यांचे अद्वैत असते असे मत; सृष्टी व परमेश्वर यांची एकरूपता; ईश्वरमयत्ववाद. ४. (वेदांत) ब्रह्म; अद्वैत : 'ऐक्य जीव तो ब्रह्मांश । जेथें पिंडब्रह्मांड निरास ।' – दास ११.१.३५. ५. (ग.) बेरीज; जमा; रास. [सं.] (वा.) **ऐक्यास येणे**– एकत्र होणे; संमीलन होणे; परस्पर जुळणे : 'कीं वेदांतशास्त्रींच्या श्रुती । ऐक्यास येती परस्परें।।'

ऐक्यता पहा : **ऐक्य १,२** : 'ऐक्यता नाही म्हणजे इंग्रजी राज्यास त्यापासून कांहीं भय नाहीं' –लोटिकेले २.१५.

ऐक्यत्रयी स्त्री. सत्यम्, शिवम्, सुंदरम् ही तीन अंतिम मूल्ये. ही मूल्ये ज्या साहित्यकृतीत एकत्र येतात ते वाङ्मय श्रेष्ठ प्रतीचे समजले जाते.

ऐक्यभंग पु. दुफळी; दुभंगणे; एकी नाहीशी होणे.

ऐक्यभाव पु. १. (राज्य.) विशिष्ट उद्देश व हितसंबंध यासाठी एखाद्या वंशाचे, वर्णाचे झालेले एकमत, दृढ ऐक्य. २. एकरूपता; ब्रह्मरूपता: 'अथवा ऐक्यभावाचेनि पैसें । दुजे मानुनि आत्मा ऐसें ।' – ज्ञा १६.७१. [सं.]

ऐक्याकार वि. एकाकार पहा : **एकंकार** : 'दुजे शिळेवरी रेखीं मकार दोहीस करी ऐक्याकार ।'– रावि २३.१५६. [सं.]

ऐगूबैगू पु. अलबतेगलबते; ऐबतेगैबते; कोणीतरी माणसे.

ऐचण, ऐंचण, ऐतण स्त्री. १. पडझड; अडचण; अडगळ; सटरफटर वस्तू. २. खेचाखेच; गर्दी. ३. अडचणीची, गर्दीची अवस्था, जागा. ४. गवत, रान, झाडझुडूप माजलेली जागा.

ऐचेआ वि. आजचा; विद्यमान; चालू : 'जें येती वरूसेंवेरी । ते ऐचेआ दिवसा भितुरी । दाविले तुवां ।।'–ख्रिपु २.२.१५९. (गो.)

ऐच्छिक वि. १. इच्छिलेले; इष्ट. २. मर्जीवर ठेवलेले; पाहिजे ते; मर्जीनुसार. ३. स्वच्छंदी; अविचारी; बेलगाम; उच्छृंखल. ४. नियमबद्ध नसलेले; मर्जीनुरूप; वैकल्पिक; वाटेल तसे; काहीतरी; लहरी; अशास्त्रीय. ५. हेतुपुर:सर, बुद्धिपुर:सर केलेले; पूर्वयोजनेनुसार, योजून केलेले; जाणूनबुजून केलेले. ६. (शिक्षण.) नेमून दिलेल्या विषयांतून निवडून घ्यायचा (विषय.) [सं.]

ऐच्छिक क्रिया स्वत:च्या इच्छेनुसार करता येणारी क्रिया. उदा. बोलणे.

ऐच्छिक वर्तन (मानस.) इच्छेनुसार केलेले वर्तन.

ऐच्छिक विषय (शिक्षण) परीक्षेकरता नेमलेल्या दोन किंवा अधिक विषयांपैकी आपल्या इच्छेने निवडलेला विषय : 'एम्.ए. च्या परीक्षेस देशी भाषा या विषयाची निदान ऐच्छिक म्हणून तरी गणना करण्यात आली.'– केले १.९२.

ऐच्छिक स्नायू (वै.) आपल्या इच्छेने मज्जातंतूंकडून संवेदना मिळताच आकुंचन –प्रसरण पावून शरीराची हालचाल करण्यास मदत करणारा स्नायू.

ऐजन सदर.(ऐति. शब्दकोश.)

ऐट, ऐटा, ऐटी स्त्री. १. अक्कडबाजी; रुबाब; भपका; दिमाख; छानछोकी; डौल; तोरा. २. नखरा; आविर्भाव (मुद्रेचा, वागण्याचा, चालण्याचा, कृतीचा). ३. तडफ.

ऐटणे अक्रि. ऐट करणे.

ऐटबाज वि. भपकेबाज; नखरेबाज; दिमाख दाखवणारा; नखरा, आविर्भाव करणारा; छानछौक; अक्कडबाज.

ऐटबाजी स्त्री. भपका; छानछोकी; नखरा; डौल.

ऐटूपणा पु. आपला अधिकार, पैसा, देखणेपणा यांचे प्रदर्शन: 'सेक्रेटरीचा हा ऐटुपणा....'– जुआ ११४.

ऐडैणे अक्रि. वेड्यासारखे होणे : 'अवस्था देखौनि उद्धवदेव ऐडैल'– श्रीकृच ३४.

ऐतखाऊ, ऐतगब्बू, ऐतमारा, ऐताजी, ऐतोळा पहा: **आयतोबा**

ऐतखोरपणा पु. काम न करता चैनीने राहण्याची सवय; आळशीपणा : 'आम्ही आमचा ऐतखोरपणा टिकविण्याचा प्रयत्न करीत आहोत.'– आआशे २६९.

ऐतरेय पु. १. एक वैदिक ऋषी; इतरा नावाच्या स्त्रीचा मुलगा. २. ऋग्वेदाच्या शाकलशाखेचे (आरण्यक). ३. ऐतरेय आरण्यकाच्या दुसऱ्या भागातील (उपनिषद).४. ऋग्वेदाचा ब्राह्मण ग्रंथ. या ग्रंथाचे कर्तृत्व ऐतरेय ऋषींकडे आहे.

ऐतवार पु. आदितवार; रविवार; सूर्याचा वार : 'आठ दिसाच्या ऐतवारी कापूर माझ्या हाती.'– जसा ६५.

ऐता सना. तो, ती, ते; हा, ही, हे; हा येथे; हा एक; इथे (तो,ती, ते) आहे. (कुण.)

ऐतार वि. श्रेष्ठ; अधिकतर; उच्चतर : 'सौंदर्य देखोनि ऐतार । श्रीमूर्ती वेधले मुनीश्वर ।'– रुस्व ३३४. [सं. उच्चतर]
पु. स्त्री. श्रेष्ठत्व, उच्चत्व : 'या गाता तरंगाचिया नदी : चढती ऐतारा पै' – रुस्व १५९.

ऐतिहासिक वि. इतिहासाशी संबंध असलेला; इतिहासातील घटनांवर आधारलेला.जसे:–ऐतिहासिक पोवाडे, कादंबरी; ऐतिहासिक सत्य. [सं.]

ऐतिहासिकता स्त्री.एखादी गोष्ट पौराणिक किंवा दंतकथा नसून ऐतिहासिक वस्तुस्थिती असणे;इतिहाससिद्धता;ऐतिहासिक खरेपणा.

ऐतिहासिक भाषाविज्ञान (भाषा.) भाषेत कालानुक्रमाने होणाऱ्या बदलांची नोंद करणारे शास्त्र.

ऐतिहासिक भौतिकवाद(राज्य.)१.अर्थकारण हे सर्व समाजव्यवस्थेचे मूळ असून यात वर्गसंघर्षाद्वारे बदल घडतो व नवा सत्ताधारी वर्ग उदयास येतो हे सांगणाऱ्या मार्क्सवादी तत्वज्ञानाचा भाग.२.जगातील

घटनांच्या इतिहासावर (जे खरोखर आहे व घडते त्यावर)आधारलेल्या अभ्यासातून मिळणारे तत्वज्ञान.

ऐतिहासिक समाजशास्त्र(समाज.)सामाजिक जीवनाचा उगम,त्यातील अवस्था आणि त्यांचे नियम व कायदे यांचा अभ्यास करणारे शास्त्र.

ऐतिह्य न. लोकपरंपरेचा प्रवाह; परंपरा; परंपरागत गोष्ट; लोककथा; दंतकथा. [सं.]

ऐती, ऐतिका स्त्री. तयारी. पहा : **आयती** 'तेथें होमांची ऐती करिती।'– वसा २१ (गो.); 'प्रधानेसी म्हणे इओसे । यांथे मंधिरी नेइजे । भोजनाची ऐतिका करविजे । तैयां कारणें ।'– ख्रिपु १.१४.११.

ऐदान स्त्री. न. पहार : भली दांडगी एक ऐदान आणली.' – ऊन ३९.

ऐदी वि. आळशी; जड; मंद; सुस्त; अजागळ; अव्यवस्थित; कामाचा कंटाळा असणारा; खुशालचेंडू : 'ऐदी होण्याची चटक मलाही थोडीशी लावशील तर बरें होईल.'– बाय २-२.

ऐन पु. एक वृक्ष, झाड. पहा: **अइन**

ऐन अ. जोर दाखविण्यासाठी या उपपदाचा उपयोग करतात. अचूकपणा, पूर्णता, अतिशयितता वगैरे अर्थ हा शब्द लागल्यापासून होतात. जसे:- ऐन उन्हाळा, ऐनवेळ इ. प्रधान, मुख्य, मूळ, आरंभीचे, मूलभूत वगैरे अर्थ 'ऐन' हे उपपद शब्दास लावल्यास होतात. जसे :- 'ऐन कर्ज, ऐन खर्च इ.'
वि. पूर्ण भर असलेला मूळ; प्रत्यक्ष मुख्य; सर्वोत्तम; सर्वांत महत्त्वाची : 'बातमी चहूंकडील राखोन हुशार राहून टिपूचे मुलखात हंगाम सुरू करावा ही ऐन मसलत आहे.' – ऐलेसं ४३५०.

ऐन स्त्री. चांगली कुळी; चांगली वर्तणूक; सभ्यपणाचे वागणे.

ऐन न. (जुने रूप यैन) १. मुद्दल; मूळ रक्कम; भांडवल.(कर्ना. को.) २. मूळचा ठरलेला शेतसारा: 'साठ लाखांची बेरीज यैन व इजाफा मिळोन सिद्ध केली.'– मइसा ७.५३.

ऐनक पु. न. चष्मा; डोळ्याला लावायची आरशी; उपनेत्र. [अरबी ऐन= डोळे]

ऐन कमाविशी जमा शेतसाऱ्याशिवाय, इतर उत्पन्नाच्या बाबी पूर्वीपासून चालत आलेल्या असतील त्या.

ऐन कारभारी वरिष्ठ (व्यवस्थापक, मंत्री, कोठारी, घटक इ.)

ऐन काळी जमिनीवरील सारा, कर.

ऐन घाई घाईचा, गडबडीचा कळस, परमावस्था.

ऐन जमा १. ठरलेला किंवा नेहमीचा वसूल, सारा; अवांतर सोडून मुख्य वसूल. याच्या उलट खेरीज जमा; शिवाय जमा; कमाविस जमा. २. मूळचा, नेहमीचा वसूल (एखाद्या वर्षी कमीजास्त झालेला नव्हे असा).

ऐन जमाबंदी साऱ्याची आकारणी.

ऐन जिन्नस १. जमिनीचे धान्यादी उत्पन्न. याच्या उलट नक्त सारा. उत्पन्न विकून पैसा केलेला नव्हे तर जसाच्या तसाच सरकारात भरायचा शेतीतील माल. सामासिक शब्दात– ऐनजिन्नसधारा, ऐनजिन्नसवसूल. २. (ल.) खुद्द; जातीने : 'तरी ऐन जिन्नस पदाजी यादवाचे दोघे बेटे एकोजी व कुसाजी गनिमाकडे आहेती.'– मइसा १५.१.

ऐनजिन्नसी, ऐनजिनसी वि. १. प्रत्यक्ष मालाच्या रूपात ऐनजिनसासंबंधी (धारा, वसूल, जकात वगैरे): 'स्वराज्यातील नेमणुकीचा बहुतेक भाग ऐनजिन्नसी मिळत असल्यामुळे ...'– गांगा १४३. २. त्याच जातीचे, प्रकारचे (धान्य, कापड, दागिना वगैरे शब्दांबरोबर योजतात.) ३. खुद्द. पहा : **ऐनजिन्नस २**
क्रिवि. मुद्देमालासह; प्रत्यक्ष कृती करीत असता.

ऐनत स्त्री. उधार दिलेला माल (अधिक किंमत आकारून); रक्कम व्याजी देण्याच्याऐवजी उधार दिलेल्या मालावरच अधिक किंमत आकारून देणे.

ऐन तरम जमिनीच्या वर्गवारीप्रमाणे बसविलेला मूळ धारा, सारा.

ऐनदानी वि. उदार मनाचा. [फा.]

ऐन नक्द, ऐन नकद, ऐन नगद, ऐन नक्त पैशाच्या रूपाने येणारा सारा किंवा ऐनजिनसी साऱ्याची पैशात किंमत.

ऐनपैन, ऐणपैण स्त्री. १. निर्वाळा देणे; खात्रीपूर्वक सांगणे. (क्रि. करणे, घालणे, पडणे). २. हुज्जत; हेकटपणाचे बोलणे.

ऐनफाजील जमाबंदी हिशेबातील एक सदर. यात शेतकी किंवा बागाईतखेरीज येणारे जादा उत्पन्न येते. जसे :- आंबराई, टरबुजवाडी, पाणभरा जमीन, कुरण वगैरेचे उत्पन्न.

ऐन बाबती सरकारला द्यायचा मुख्य कर; राजाला द्यायचा चतुर्थांश.[फा.]

ऐन मुलकी मूळ धारा, वसूल, सारा.

ऐन मोकासा चौथाईतील सरदारांची नेमणूक बाब. पहा: **चौथ**

ऐन वाफ पेरणीचा हंगाम; ऐन वेळ; पेरणीचा नक्की हंगाम; पेरणीचा भर.

ऐन वेळ १. अगदी आणीबाणीचा प्रसंग; मोक्याची वेळ. २. अगदी योग्य वेळ.

ऐन सोदा अट्टल लुच्चा; लबाड; हरामी; ऐन अट्टल.

ऐना पु. १. आयना; आरसा : 'ऐना निंदितसे निर्नासिक ।' – दावि २६३. २. (ल.) शोभादायक वस्तू; अलंकरण; भूषण : '--- करून निघे निज मंदिरचा ऐना.'– प्रला १२३. ३. विशेषत: अव. – ऐने, चष्मा, उपनेत्र, डोळयांची आरशी. [फा.]

ऐना की बैना शिमग्यात वर्गणी गोळा करायला निघालेल्या मुलांनी म्हणायचा संकेत.

ऐनात स्त्री बक्षीस :'घोडा त्यांचा त्यास ऐनात करून दिला.'– नाग २.११२.

ऐनाती स्त्री. मूळ ठरविलेल्या शेतसाऱ्याचा प्रकार; ऐन-आकार. [फा.]

ऐनी वि. लोखंडी : 'ऐनी गोळे १०,००० खर्च झाले.'– ऐलेसं ११९४.

ऐनेमहाल, ऐनामहाल पु. आरसेमहाल; आतून सर्व बाजूंनी मढविलेला दिवाणखाना : 'ऐनामहाल जो रत्नखचित ।' – दावि ३५८; 'त्याचप्रमाणें ती सुभानजीबरोबर नागोज्याच्या गढीत त्याच्या खास ऐनेमहालांत आली.'– स्वप ३९.३. [फा.]

ऐनेर, ऐनेर न. लहान मुलांचा एक रोग. याने गर्भिणी आईचे स्तनपान करणाऱ्या मुलाला श्वास, अग्निमांद्य, ओकारी, ग्लानी, खोकला, घेरी येणे ही लक्षणे होतात. पोट मोठे होते. याला वैद्यकात पारिगर्भिक असे म्हणतात.

ऐपत स्त्री. संपन्नता; आर्थिक सामर्थ्य, शक्ती, योग्यता, साधन; मालमत्ता; पैसाअडका :'जो तो आपल्या ऐपतीप्रमाणे काहीतरी (देवाला) अर्पण

करीत असतो.'– एल्गार ८. [फा. आफियत]

ऐब पु. १. व्यंग; दोष; चूक; खोडः अपूर्णता. पहा: **अयब** : 'नाक लागलें तर फारसा ऐब दिसणार नाही.'– ऐलेसं ४.६५०५. २. कमीपणा. (क्रि. लागणे) [अर.]

ऐबतेगैबते, ऐबूगैबू वि. साळकोजी माळकोजी; सटरफटर; कोणीतरी; ज्यांचा काही संबंध नाही असे. पहा: **ऐगूबैगू**

ऐबी वि. १. खोडकर; व्रात्य. (ना.) २. ओशाळा; मिंधा. (कु.)

ऐम, ऐमा स्त्री. मुसलमानी राज्यात धार्मिक किंवा विद्वान मुसलमान लोकांना दिलेल्या इनाम जमिनी. या जमिनी ब्रिटिश सरकारने इनाम, तबदिली हक्कासुद्धा मान्य केल्या. [फा.]

ऐममौझा धार्मिक इनाम गाव. [फा.]

ऐरण स्त्री. सोनार, लोहार वगैरेंचे एक हत्यार; घडकाम करण्याचे साधन. यावर धातूचे जिन्नस ठोकून त्याला पाहिजे तो आकार देतात. सामान्यत: ८ ते १० शेर वजनाचा व ५ इंच लांबी व रुंदीचा, वर रुंद व चौकोनी असून खाली निमुळता असलेला लोखंडी ठोकळा एका लाकडी लांबट ठोकळ्यात बसविलेला असतो. याला वरच्या बाजूला एक इंच जाडीचा पोलादी भाग असतो : 'जैसे ऐरणीवरी घण । तैसे हाणिती उसणपण ।।'– कथा १. १३.९८.[सं. अरणि, अघरिणी] (वा.) **ऐरण देणे –** एखाद्याला 'ऐरणी दिव्य' करायला लावणे. तापून लाल झालेली ऐरण मोकळ्या हातांनी उचलून काही पावले चालून दाखवणे. आपण गुन्हेगार नाही असे सिद्ध करण्यासाठी किंवा आपल्या एकाद्या हक्काच्या शाबितीसाठी अशा प्रकारचे दिव्य करून दाखविण्याची जुन्या काळी वहिवाट होती : 'खून फरादिया केलियावरी हर दो नफरीं नेम केला जे सिषेस यैरण द्यावी. जो खरा होई तेणें खावी.'– शिचसाखं २.११४.

ऐरण स्त्री. शेताच्या बांधावर असणारा, हद्द दाखविणारा दगड किंवा मातीचा ढीग.

ऐरण, ऐरीण स्त्री. १. इरण; नरवेल. २. आयरणी; सोनामुखीची एक जात. [सं. अरणि]

ऐरण गारणे (सोनारी) ऐरणीला ठोकून ठोकून गुळगुळीतपणा आलेला असतो, तो घालविण्यासाठी कुरुंदाचा चुरा हातोड्याने ऐरणीवर घासणे.

ऐरणघण सांधा वि. शरीरातील सांध्याचा एक प्रकार.

ऐरण मेघ वादळी पाऊस ज्यापासून निर्माण होईल असा ढगाचा शिरोभाग. हवेचे ऊर्ध्वगामी प्रवाह स्थितविराच्या (स्ट्राटोस्फियर) तळापर्यंत गेल्यावर तेथे या ढगांच्या माथ्याची बऱ्याच वेळेस पसरण होऊन ऐरणीसारखा आकार तयार होतो. ह्यामधील हिमकणांच्यामुळे ऐरणीचा आकार थोडासा पसरट होतो.

ऐरणमैरण स्त्री. एक वनस्पती. हिची पाने यकृताच्या आकाराची असून त्यांचा यकृतविकारावर उपयोग होतो.

ऐरणरिकीब सांधा शरीराच्या सांध्याचा एक प्रकार. याच्या आकारामुळे याला हे नाव मिळाले आहे.

ऐरणी पहा : **ऐरण** : 'सर्पाची जे वाकली फणी । तेचि पिटावया ऐरणी। कातरी केलिया जोडोनि । सर्पाच्याच ।।'– कथा ३.१७.९२.

ऐरणी, ऐरिणी स्त्री. १. लग्नात वरातीच्या पूर्वी वेळूच्या परडीत (झालीत) कणकीचे दिवे लावून त्यात उमामहेश्वराची पूजा करून वरमातेस दान करतात ते पात्र : 'भीमकें मांडिले विंदान । भव ऐरणी संपादन । कृष्णासी वंशपात्रदान । विधि विधान वेदोक्त ।।'– एरुस्व १६.१५८. २. अग्निपात्र : 'विरहा नलें तातली । चंद्रकळा होए चुळचुळी । ते ऐरणी करतळी । घेईन मी ।।'– शिव १९६. [सं. अरणि]

ऐरणीदान न. लग्नात वंशवृद्धीसाठी वधूपक्षाकडून वरमातेस दिले जाणारे वंशपात्राचे (झालीचे) दान.

ऐरणीपूजन न. ऐरणीदान करण्यापूर्वी वंशपात्राचे करायचे पूजन.

ऐराण १. ओसाड मैदान. २. एकलकोंडेपणाची भावना.

ऐरावत पु. इंद्राचा हत्ती; समुद्रमंथनातून काढलेल्या चौदा रत्नांपैकी एक : 'अर्जुना मी गा ऐरावतु ।–ज्ञा १०.२३८. [सं.]

ऐरावती लक्ष्मी गजांत लक्ष्मी; हत्ती बाळगण्याइतकी श्रीमंती : 'मदमत्त झालेल्या द्वीपेंद्रानें एखादे वेळीं क्वचित् प्राणनाश केला म्हणून ऐरावती लक्ष्मीचा अनादर करणें योग्य नाही.'– किरकोळ लेखसंग्रह (चिपळूणकर).

ऐऱ्हा क्रिवि. या बाजूला : 'आधीं अविवा ऐऱ्हां नीरसे तेहळीं सुधु आल्या ब्रम्ही पैसे ।'– ज्ञाप्र ६४२.

ऐल, ऐला, ऐलाड, ऐलाडी, ऐली वि. अलीकडचा; अलीकडला : 'उताराचिये सांगडी । ठाके ते ऐलीच थडी ।' – ज्ञा १८.२५५. क्रिवि. १. या बाजूला; अलीकडे : 'प्रवृत्ति माघौति मोहरे । समाधि ऐलाडी उतरे ।' – ज्ञा ६.१९१. २. आधी; अगोदर, पूर्वी :'तेवि तो उडुनाथ । केवल श्रीकृष्णप्रीत्यर्थ । सांडूनि काळ नियत । ऐलाडचि उदैला ।।'– रास १.१०७.

ऐलपैल क्रिवि. या व त्या बाजूला; जवळच्या व दूरच्या दोन्ही काठांवर; अलीकडे पलीकडे.
वि. (अलीकडचा व पलीकडचा) इतर; अवांतर; किरकोळ; मिश्र; सटरफटर; क्षुल्लक (वस्तु, काम, शब्द, मनुष्य इ.)

ऐलफैल स्त्री. १. बंड; उठाव; बेभानपणाचे, आज्ञा मोडण्याचे कृत्य. २. खोड्या; उपद्व्याप; बेमुर्वत वर्तन; उद्दाम भाषण. (क्रि. करणे, बोलणे.) [फैलचे द्वि.अर. फियल = कर्म]

ऐलसैल वि.मोकळा; दडपण दूर झालेला. [सैलचे द्वि.]

ऐलाड पु. अलीकडील भाग :'ऐलाड हुडाचे, पैलाड हुडाचे.'– ज्ञागा२७.

ऐलाडिल वि. या बाजूचा :'गोसावी ऐलाडिल वडवेऱ्हीं बीजें केलें.' – लीच ४.६.

ऐलान पु. शासन; कायदा; वटहुकूम.(माळवी) [अर. एअलान]

ऐलीकड स्त्री. ही बाजू (इहलोक); अलीकडची बाजू.

ऐलीकडचा, ऐलीकडून, ऐलीकडे पहा : **अलीकडचा,अलीकडील** : नाणावे पैलाड येतां हि जीव । ऐलिकडे उठता न्यावें घरा ।' – दावि १४८

ऐलीकडी क्रिवि. १. पूर्वी; अलीकडे :'जेवीं वसंताऐलीकडी । वृक्षासि होय पानझडी ।' – एभा ३.१५५. २. अंत:करणाकडे.

ऐवज पु. १. मालमत्ता; संपत्ती; द्रव्य; किंमती वस्तू; मौल्यवान पदार्थ; रोकड किंवा माल :'पाडुरंग आणितां ध्यानांत । तों ऐवज आठविला मनांत ।'. २. सुस्थिती; टिकाऊपणा; भक्कमपणा; दमदारपणा.

३. तत्त्वांश; सामर्थ्य; उत्साह; उमेद; पाणी. ४. किंमत; मूल्य (कोणत्याही वस्तूची पैशाच्या रूपात). ५. रोख वसुली; रोख उत्पन्न, जमा; एकंदर रक्कम. [फा. इवझ्=बदला]

ऐवजदार, ऐवजशीर वि. समर्थ; उपयुक्त; चांगल्या स्थितीत असणारा; कार्योपयोगी (वस्तू, पदार्थ, पशु वगैरे).

ऐवजमोबदला पु. १. एखाद्याच्या मालकीची वस्तू दुसऱ्याच्या ताब्यात त्याच्या वस्तूबद्दल असणे; ऐवजाची अदलाबदल करणे. २. देवघेव; मोबदला देणे. (क्रि. करणे). ३. ठेवीवर पैसा उसनवार काढणे; गहाणकर्ज. (क्रि. करणे, देणे, ठेवणे. याच्या उलट हातावर आणणे, काढणे, येणे).

ऐवजमोबदल्याचे लिहिणे हिशेबाचे एक खाते; ठेवी ठेवल्याचे व पैसे उसने आणल्याचे हिशेब ठेवणे; निरनिराळ्या प्रकारच्या वसुलीपोटी, ठेवीपोटी, कर्जापोटी दिलेल्या घेतलेल्या रकमांचा हिशेब ठेवणे.

ऐवजी शअ. बदली; जागी; मोबदल्यात. [फा. एवझ]

ऐवट वि. १. भरीव; जड (दागिने वगैरे); अवजड; मोठा अवाढव्य; अजस्र (झाड, खांब, इमारत वगैरे); जाड; दणकट; ओबडधोबड (कापड वगैरे). हा शब्द पुष्कळ वेळा फार व्यापक अर्थानेही योजलेला दिसून येतो. जसे :- अगडबंब - थोराड माणसांना, असभ्य, ग्राम्य, असंस्कृत भाषणाला, विविध प्रकारच्या व्यापक कामाला, दिखाऊ मोठ्या वस्तूंना हे विशेषण लावलेले आढळते. २. जड; मंद; मूर्ख; ओबडधोबड (माणूस).

ऐवार न. रानातील गुरांचा वाडा.

ऐश न. आमिष :'ऐंशाचिया आसा । मिनु झोंबिनला जैसा ।' - ख्रिपु १.१७.३७. (गो.) [सं. आमिष]

ऐश, ऐष स्त्री. चैन. [अर.]

ऐश-आरा वि. चैनीची सजावट करणारा.

ऐशआराम, ऐशाराम, ऐशारामी पु. स्त्री. चैन, सुख आणि स्वास्थ्य; ख्यालीखुशाली; वैषयिक सुखोपभोग; करमणूक; विलास; मनोरंजन. [अर. ऐश्+फा.आराम्]

ऐशानी स्त्री. ईशान्य दिशा; उत्तर व पूर्व यामधील दिशा. [सं.]

ऐशी, ऐंशी वि. दहाच्या आठपट; ८० ही संख्या. [सं. अशीति]

ऐशी उद्गा. आनंदोद्गार. भले शाबास; वाहवा; छान.

ऐशी वि. १. अशी; यासारखी. २. (ल.) अतिशय; फार (निंदाव्यंजक)

ऐशीतैशी स्त्री. एखाद्या गोष्टीची आपण पर्वा करत नाही, तिला किंमत देत नाही हे दाखवण्यासाठी वापरण्यात येणारा शब्द :'तर भाषेची ऐशीतेशी, उलटीसुलटी करीन मीहि.' - मर्ढे ११८.

ऐश्वर वि. ईश्वरी; दैवी; ईश्वरासंबंधी :'ऐश्वरकळा साजती । पाहुन शत्रु लाजती ।' - ऐपो ३१८. [सं.]

ऐश्वर्य न. १. वैभव; प्रतिष्ठा; सत्ता; इच्छित प्राप्तीचे सामर्थ्य :'आइका यश श्री औदार्य । ज्ञान वैराग्य ऐश्वर्य ।' - ज्ञा ६.३७. २.प्रभुत्व; वर्चस्व :'तुज विश्वेश्वराचिया ठायीं । ऐश्वर्य केलें ।।' - ज्ञा ११.५६९. ३. ईश्वरी अंश, गुण, सामर्थ्य :'हा आमुचा ऐश्वर्ययोगु । तुवां देखिला कीं चांगु ।' - ज्ञा ९.८७. ४. समृद्धी; संपत्ती. [सं.]

ऐश्वर्यपीठ न. ऐश्वर्यस्थान; संपत्तीचे, वैभवाचे माहेरघर :'की ऐश्वर्यपिठींची देवी सुंदर.'

ऐश्वर्ययोग पु. ईश्वरी सामर्थ्य; वैभव. पहा **: ऐश्वर्य** ३.

ऐश्वर्यवान वि. १. मोठा; विख्यात; प्रतिष्ठित. २. संपत्तिमान; भरभराटीत असणारा. ३. भाग्यशाली.

ऐश्वर्याचा प्राणी पु. देवाची कृपा असणारा; भाग्याचा पुतळा; दैवाचा भोपळा.

ऐषमहाल पु. करमणुकीच्या व चैनीच्या साधनांनी सज्ज ठेवलेला महाल. [अर. ऐशमहाल]

ऐष्टिक वि. यज्ञीय; हव्य; इष्टीसंबंधी (कर्म वगैरे). [सं.]

ऐस न. आमिष. पहा : **ऐश** (कु.)

ऐसपैस क्रिवि. १. विस्तीर्ण; प्रशस्त; अमर्याद; मोकळाढाकळा. २. आसमंतात. पहा : **आसपास**

ऐसपैस पु. लपाछपीच्या एका खेळाचे नाव.

ऐसा, ऐसे वि. क्रिवि.१.असा; असे :'ऐसेआ आपदा अनिर्वाच्या । भोगितातिआ ।' - ऋ १०. २. सारखा :'लोकबंधू जो होय रवी ऐसा ।' - नल ७. [सं. ईदृश]

ऐसात येणे अक्रि. कोणतीही (अयोग्य) गोष्ट करण्याच्या भरात, जोरात, आवेशात येणे. (कु.)

ऐहिक, ऐहलौकिक वि. या लोकातील; इहलोकासंबंधी (सुख, भोग इ.); पृथ्वीवरचा. पारलौकिक याच्या उलट:'तेसें ऐहिक तरी न नशे ।' - ज्ञा २.२३३. [सं. इह-ऐहिक]

ऐहिकनिष्ठ वि. (समाज.) धर्मनिरपेक्ष; पारलौकिक नव्हे तर या जगाशी संबंधित; इहवादी.

ऐहेर पु. अहेर :'नाना दीठि घालूनि ऐहेरा । आवंतुं जाइजे सोइरा ।' - राज्ञा १७.२८५.

ऐहेव स्त्री. अविधवा; सुवासिनी; सौभाग्यवती स्त्री :'आघवेनि गांवदारी । ऐहेव जैसी ।।' - राज्ञा १३.८२०.

ऐंडा, ऐंडी, ऐंढा पु. भात झोडण्यासाठी हातात घेतलेली कवळी. पहा: **आयंडा**

ऐंद्र वि. १. (ज्यो.) सत्तावीस योगांपैकी सव्विसावा योग. हा अशुभ मानला जातो. २. इंद्रासंबंधी; इंद्रलोकातील. [सं.]

ऐंद्रजाल न. इंद्रजाल; जादुगिरी; गारुड. [सं.]

ऐंद्रजालिक पु. जादूचे खेळ करणारा; गारुडी.
वि. जादूसंबंधी; इंद्रजालासंबंधी. [सं.]

ऐंद्रस्थान न. (नृत्य.) दोन्ही पाय वाकडे करून आडवे ठेवणे व यात अंतर चार ताल ठेवणे, कंबर गुडघ्यांच्या रेषेत येईल इतकी वाकविणे, हत्ती सारख्या प्राण्यावर चढणे वगैरे गोष्टी या स्थानात उभे राहण्याने सूचित केल्या जातात. [सं.]

ऐंद्राग्न वि. इंद्र व अग्नी - देवतांसंबंधी. (पुरोडाश, ऋचा इ.) [सं.]

ऐंद्रिय, ऐंद्रियक वि. इंद्रियासंबंधी (व्यापार); इंद्रियग्राह्य; इंद्रियसंवेद्य.

ऐंद्रिय साधन ज्ञानवाहक संवेदनस्थानांना मदत करणारे उपकरण.

ऐंद्री स्त्री. १. इंद्राधिष्ठित दिशा; पूर्वदिशा. २. इंद्रपत्नी. ३. (ज्यो.) ज्येष्ठा.